आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...



७


१०


२३



६ जून २०११ | वर्ष २८ | अंक ५


# शेतकरी संघटक


स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹ १२.५०


# प्रस्तावित भूसंपादनविरोधी
# प्रचंड संघर्ष



शेतीविषयक जवळजवळ अडीचशे कायदे घटनेच्या नवव्या परिशिष्टामध्ये टाकण्यात आले. या परिशिष्टानुसार शेतकऱ्यांना आपली जमीन लोकोपयोगी कामासाठी सरकारला देणे बंधनकारक ठरले. ही जमीन देताना ती जमीन द्यावी किंवा नाही, तिचा भाव काय असावा?, किती जमीन द्यावी? याचा कुठलाही अधिकार शेतकऱ्यांकडे राहिला नाही. अशा कामांसाठी शेतकरी बेदखल झाल्यास त्याचे पुनर्वसन करण्याचे बंधन सरकारवर आहे; पण हे बंधन कधीच पाळले जात नाही. अगोदर त्याची जमीन काढून टाकली जाते आणि नंतर २५-३० वर्षे त्याच्या पुनर्वसनाचे काम चालते. ते कधीच पूर्ण होत नाही. शेतकरी देशोधडीला लागतो.



शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ५ । ६ जून २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठरचना/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :**
कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक,
जनशक्ती वाचक चळवळ,
२४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१,
फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको-औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

आजकाल
**प्रस्तावित भूसंपादनविरोधी प्रचंड संघर्ष**
ज्ञानेश्वर शेलार ........ ३

विशेष
**वनखात्याच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी ऐतिहासिक घटना**
अ‍ॅड. सुभाष खंडागळे ........ ७

कॉमन नॉन सेन्स
**मनमोहना बडे झुटे**
सुधाकर जाधव ........ १०

कथा
**दोन चेहरे**
सुधीर सेवेकर ........ १२

मधोमध
**राष्ट्र‘वादी’ की राष्ट्र‘भेदी’ ?**
दत्ता जोशी ........ १६

मुद्दा
**जमीन अधिग्रहणासाठी पाच उपाय**
संघटक ब्युरो ........ १९

वाङ्मय शेती
**हत्या करायला शीक**
गंगाधर मुटे ........ २०

‘भारत’ की जुबानी
**सांप्रदायिक हिंसा विरोधी कानून या देश का बँटवारा**
अ‍ॅड. दिनेश शर्मा ........ २३

(उ)संतवाणी
**नभाच्या कल्याणा द्रविडी विभूती**
‘थंडा’ महाराज देगलूरकर ........ २६

**शेतकरी संघटना वृत्त** ........ ३०

**पत्र**
सहभाग : अ‍ॅड. अशोक पटेल, मा. शरद जोशी,
अ‍ॅड. द. गं. गोदमगावकर ........ ३२

# आधी आण्णा, मग ताई, आता बाबा... तोबा तोबा !!

अण्णा हजारे यांच्या उपोषणानंतर मेधा पाटकर यांनी उपोषण केले. या दोघांच्या नंतर 'उपोषण-उपोषण' खेळात आता रामदेव बाबा उतरले आहेत. भारताने लोकशाही स्वीकारली. १९५२ पासून थोड्याफार फरकाने; पण तरीही बऱ्याचशा नियमितपणे निवडणुका होत आल्या आहेत. आज जी काही व्यवस्था आपल्याला दिसते आहे. त्यासाठी आपण सर्वच जबाबदार आहोत. असे असताना या लोकशाही व्यवस्थेवर अविश्वास दाखवत अण्णा हजारे, मेधा पाटकर आणि आता रामदेव बाबा यांनी उपोषणाचं हत्यार कशासाठी उगारले आहे. मेधा पाटकरांना तर सर्वोच्च न्यायालयाने चुकीच्या माहितीसाठी नुकतेच फटकारले आहे. त्यांच्या उपोषणाला आण्णा आणि बाबा यांच्या इतकी प्रसिद्धीही मिळाली नाही. या उपोषणांना फार मोठ्या प्रमाणावर माध्यमांतून प्रसिद्धी दिल्या जात आहे आणि असा आभास निर्माण केला जातो आहे, की प्रचंड जनमत यांच्या पाठीशी आहे. वस्तूतः निवडणूक प्रक्रियेवर हे लोकं ज्या पद्धतीने अविश्वास दाखवत आहेत, तीच मोठी गंभीर बाब आहे. कित्येक विचारवंतांनी याची दखल घेऊन योग्य ती टीका या उपोषणांवरती केली आहे. खरेतर ज्यांना कुणाला समाजाची काळजी आहे आणि भारताचं हित व्हावं असं वाटत असेल, तर त्यांनी पहिल्यांदा मूलभूत समस्यांना हात घातला पाहिजे. भ्रष्टाचार, काळा पैसा हे प्रश्न तर गंभीर आहेतच; पण हे उद्‌भवले कुठून गेल्या ६३ वर्षांत सरकारशाहीची जी अफाट वाढ झाली, नोकरशाहीच्या हातात प्रचंड अधिकार एकवटले. या सगळ्यांतून आज दिसत असलेल्या समस्या मोठ्या होत गेल्या. खाल्लेले पैसे तर सोडाच कागदोपत्री ही नोकरशाही उत्पन्नाचा ७५% इतका हिस्सा अधिकृतपणे पगाराच्या नावाखाली गिळंकृत करते. कर्ज व त्यावरील व्याज यापोटी जवळपास २०% इतकी रक्कम मोजावी लागते. आता साधा गणिताचा प्रश्न समोर येतो. शंभरातले ९४ पैसे पगार आणि व्याजातच खर्च होत असतील, तर ६ टक्क्यांमध्ये देश चालणार कसा? रामदेव बाबांना सरकारशाहीच्या या मूलभूत मुद्द्याला का हात घालावा वाटत नाही. शासन जेव्हा खुल्या व्यवस्थेतही लायसन्स, कोटा, परमिटचा खेळ खेळत राहतं, मग काळा पैसा निर्माण होणार नाही तर कसं? कापसाचे भाव निर्यातबंदी नसताना ७ हजारांपर्यंत जातात आणि निर्यातबंदी केली, की ३ हजारांच्याही खाली कोसळतात. ग्रामीण भागात राहणाऱ्या आणि बहूजन समाजाचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या आण्णा हजारे यांना कापसाचा प्रश्न का नाही महत्त्वाचा वाटत?



कॅगच्या अहवालामध्ये सहकार क्षेत्रावरती मोठ्या प्रमाणावर ताशेरे ओढल्या गेले आहेत. हे सगळं सहकार क्षेत्र फक्त सरकार आणि सरकारच्या सावलीनेच वाढलेले आहे. या सहकार क्षेत्राच्या जीवावरच महाराष्ट्रात अणि विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात राजकीय पक्षाच्या धुरीणांनी आपलं भलं करून घेतलं, हे आण्णा हजारेंना दिसत नाही का? पाण्यात बुडणाऱ्या आदिवासांसाठी खोटे आकडेवारी देणाऱ्या मेधा पाटकरांना सहकाराच्या नावाखाली पैशांत आकंठ डुंबणारे राजकीय नेते दिसत नाहीत का?

१९९१ मध्ये खुली व्यवस्था स्वीकारली असं नुसतं म्हटलं गेलं; पण अजुनही विशेषतः शेतीक्षेत्राला खुलेपणाचा फायदा पुरेसा मिळालेला नाही. स्वाभाविकच शेतकऱ्याच्या नावाखाली मोठमोठ्या योजना आखणे आणि त्यांचा पैसा गडप करणे हा एक कलमी कार्यक्रम सरकार राबवत आहे. यातूनच काळ्या पैशांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होते आहे. शेतकऱ्यांसाठी असलेल पॅकेज अधिकारी आणि बँका खाऊन टाकतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी निघालेले कारखाने सबसिडी खाऊन बुडवले जातात. हे या समाजसेवकांना दिसत नाही का? साखर कारखान्याची परवानगी मंत्रालयातून मिळणार नसेल आणि त्याला कुठलीही सबसिडी असणार नसेल, तर एकतरी राजकीय नेता कारखाना काढेल का? कारखानाच काढला नाही, तर मग त्यात भ्रष्टाचार होईल कुठून? स्वाभाविकच भ्रष्टाचार आणि काळा पैसा यांचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. भ्रष्टाचार आणि काळा पैसा या गंगा यमुनांचा उगम दिल्लीच्या मंत्रालयनामक हिमालयतच होतो. तोच जर रोखता आला तर पुढे यांचा प्रवाह मोठा होणारच नाही. खुल्या व्यवस्थेतसुद्धा बहुतांश अधिकार सरकारनी आपल्या बुडाखाली दाबून ठेवले आहेत. साध्या शिक्षकांच्या बदलीसाठीही मंत्रालयात खेटे मारावे लागत असतील, तर भ्रष्टाचार का नाही वाढणार? अधिकारांचं योग्य प्रमाणात विकेंद्रीकरण केलं, निर्णयात पारदर्शकता आणली आणि मुळातच शासनाचा हस्तक्षेप किमान ठेवला, तर भ्रष्टाचार आणि काळा पैसा यांना स्वाभाविकच आळा बसू शकेल; पण याकडे दुर्लक्ष करून फक्त आरडाओरडा करून आण्णा आणि बाबा काय साधू पाहत आहेत? मूलभूत समस्यांना हात घालण्यासाठी त्यांचा अभ्यास असावा लागतो. स्वतः आण्णा किंवा रामदेव बाबा राजकीय, सामाजिक, आर्थिक अभ्यासासाठी प्रसिद्ध नाहीत. अशा क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी त्यांना सल्ला मसलतही करावी वाटत नाही. देशपातळीवर आंदोलन उभं करत असताना त्याची प्राथमिक, वैचारिक बैठकही यांना पक्की करता आलेली नाही. म्हणजे एकीकडून राज्यकर्ते भ्रष्टाचाराने लडबडलेले, दुसरीकडून विरोधक तेही संगनमत करून असलेले आणि तिसरीकडून समाजसेवक वैचारिक गांभीर्याचा अभाव असलेले. अशा परिस्थितीला काय म्हणावं? सत्ताधारी आणि विरोधक भ्रष्ट असण्यापेक्षाही समाजसेवकांचं हे बुद्धिदारिद्र्य जास्त घातक आहे, असं आम्हाला प्रामाणिकपणे वाटतं.

# प्रस्तावित भूसंपादनविरोधी प्रचंड संघर्ष



**शेतीविषयक जवळजवळ अडीचशे कायदे नवव्या परिशिष्टामध्ये टाकण्यात आले. या परिशिष्टानुसार शेतकऱ्यांना आपले जमीन लोकोपयोगी कामासाठी सरकारला देणे बंधनकारक ठरले. ही जमीन देताना ती जमीन द्यावी किंवा नाही, तिचा भाव काय असावा?, किती जमीन द्यावी? याचा कुठलाही अधिकार शेतकऱ्यांकडे राहिला नाही. अशा कामांसाठी शेतकरी बेदखल झाल्यास त्याचे पुनर्वसन करण्याचे बंधन सरकारवर आहे; पण हे बंधन कधीच पाळले जात नाही. अगोदर याची जमीन काढून टाकली जाते आणि नंतर २५-३० वर्षे त्याच्या पुनर्वसनाचे काम चालते. ते कधीच पूर्ण होत नाही. शेतकरी देशोधडीला लागतो.**

उत्तर प्रदेशातील नोएडा ते आग्रा या १५० कि.मी.च्या एक्स्प्रेस हायवेसाठी शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहण करण्यात येत असून बहुतेक काम पूर्ण झाले आहे. भट्टा-परसोल या गावातील शेतकऱ्यांनी मात्र तीव्र आंदोलन करून जमीन अधिग्रहणास विरोध केला आहे. 'यूवराज' राहुल गांधी यांनी या आंदोलनात उडी घेतली आहे. अगदी सुरुवातीच्या काळात शरद जोशी ज्याप्रमाणे पोलिसी पहारा चुकवून मोटर सायकल, पायी अशा विविध मार्गांनी आंदोलन स्थळी जाऊन आंदोलन यशस्वी करीत असत. ३० वर्षांनंतर राहूल गांधींना पोलिस बंदोबस्तातून आंदोलन स्थळी जाण्यासाठी अशाचप्रकारे मोटर सायकलवर प्रवास करावा लागला. शेतकरी संघटनेचे आंदोलनाचे मार्ग काँग्रेसी युवराजाला वापरण्याची वेळ आली. गेल्या तीन पिढ्यांचे पापक्षालन आपल्या या आंदोलनाने करण्याचा युवराज प्रयत्न करीत आहेत. याच गावात काही स्त्रियांवर बलात्कार झाल्याचा व काही शेतकऱ्यांना पोलिसांच्या गोळ्यांनी मृत्यू आल्याचा ठपकाही युवराजांनी ठेवला आहे. आता या सर्व बलात्कारांचे आणि गोळीबारात मृत्यू पडलेल्या शेतकऱ्यांचे पाप त्यांच्याच डोक्यावर जाणार आहे का?

### प्रारंभ

इंग्रजांनी महसूल जमा करण्याच्या सोयीसाठी जमीनदारी पद्धत सुरू केली. त्यांनी नेमलेले जमीनदारच मालक होऊन बसले. ते स्वत: जमीन न कसता कुळांना कसण्यासाठी जमिनी दिल्या. कुळांनीही हा आतबट्ट्याचा धंदा न करता पोटकुळे ठेवून आपला महसूलातील वाटा कायम केला. अशी मध्यस्थांची रांगच तयार झाली. स्वातंत्र्यानंतर ही पद्धत मोडून काढण्यासाठी कूळकायदा



ज्ञानेश्वर शेलार

करण्यात आला. त्याची तीन उद्दिष्टे होती. जमीनदारी संपवणारे कायदे करणे. कुळांना जमिनीची मालकी देणे आणि जमीनधारणेवर मर्यादा घालणे. हे कायदे मोठे लोकप्रिय झाले. नेहरूंच्या कार्याचा उदो उदो करताना यांचेच उदाहरण दिले जाते. शेतीत भांडवल येण्याऐवजी तिचे आणखी छोटेछोटे तुकडे करून ते अत्यंत हलाखीत जीवन जगणाऱ्या कुळांमध्ये वाटल्याने शेतीत साठ वर्षांनंतरही भांडवलाचा शिरकाव झालेला नाही. १९५५ मध्ये एकूण शेतजमिनीपैकी २०% जमीन अधिकृत कुळांकडे, तेवढीच जमीन कागदोपत्री नोंद नसलेल्या कुळांकडे, म्हणजे एकूण ४०% जमीन कूळ पद्धतीने कसली जात होती. १९६१ मध्ये हेच प्रमाण ७०% जमीन स्वत: कसणाऱ्यांच्या हाती, तर ८% कुळांच्या आणि १५% मिश्र व्यवस्थेत होती.

### राज्यकर्त्यांची भाबडी आशा

या पद्धतीतून जमीनदारांना हटवून शेतीची दुरावस्था संपेल अशी भाबडी आशा तत्कालीन राज्यकर्त्यांना वाटली. खरे कारण हे येथील जमीनदार, जमीनमालक, सावकार हे नव्हते,

तर लंडनहून हलणारी शोषणाची सुत्रे होती. फुले, रानडे, दादाभाई नौरोजी अशा थोडक्या पुढाऱ्यांनाच याची जाणीव होती. जमीनदार संपले म्हणजे सगळी दुःखे दूर होतील असे नव्हते. महात्माजींनीसुद्धा सावकार जमीनदार यांची भूमिका फार स्पृहणीय नसली, तरी शेतकऱ्यांचा लढा त्यांच्या विरोधात नाही हे चंपारण्याच्या आंदोलनात स्पष्ट केले : ''शहरातील व्यापारी वर्ग इंग्रजांच्या मदतीने रयतेचे शोषण करतो आणि त्या पापाबद्दल त्याला एक दिवस परमेश्वराच्या दरबारी झाडा द्यावा लागेल,'' असे महात्माजींनी परखडपणे म्हटले आहे. जमीनदारी नष्ट करणे आणि कूळ कायदा आणणे हे केवळ निमित्तमात्र आहे. राज्यकर्त्यांना खरे तर सर्वंकष अशी जमिनीची मालकी सरकारच्या ताब्यात असावी आणि सरकारमध्ये बसलेल्या सर्वांना त्याचा मुक्त उपभोग घेता यावा अशीच भावना होती. १९६१ मध्ये जमिनीच्या धारणेवर कमाल मर्यादा घालण्यात आली. १९७५ मध्ये त्यात पुन्हा काही बदल करण्यात आला. सामाजिक न्यायाची गरज फक्त शेतीच्याच क्षेत्रात होती असे नव्हे शहरातील विषमता त्याहीपेक्षा विक्राळ होती; पण शहरी जमीनधारणेवर मर्यादा घालण्यात आली नाही. आता जे भूखंडखोर उदयाला आले आहेत. त्याची बिजे तेव्हाच रोवली गेली.

### उफराटी पूर्वानुलक्षी पद्धत

या जमीनविषयक कायदांना वेळोवेळी न्यायालयांनीही फटकारले आहे. घटनेतील संपत्तीच्या मूलभूत हक्काच्या हे विरोधात होते. त्यासाठी वेळोवेळी घटनेत दुरुस्ती करून मोडतोड करून त्यांना संरक्षण देण्यात आले. १९५० च्या अगोदरच्या कायद्यांनाही संरक्षण देण्यात आले. युवराजांच्या पणजोबांच्या काळात ही उफराटी पूर्वानुलक्षी पद्धत वापरण्यात आली. इंग्रजी काळातील कायद्यांनाही संरक्षण देण्यात आले. १९५५ मध्ये चौथी घटना दुरुस्ती करून दिला जाणारा मोबदला पुरेसा आहे, की नाही हे न्यायालयाच्या कक्षेतून काढून टाकण्यात आले. शेवटी टोकाला जाऊन ४४ व्या घटनादुरुस्तीने मालमत्तेचा हक्कच नष्ट करून टाकण्यात आला. सर्व जमीनविषयक कायदे नवव्या सूचीमध्ये टाकून त्यांना कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. ही नववी सूची हेच आता शेतकऱ्यांच्या दृष्टीने मोठे दुखणे होऊन बसले आहे.

### संघटनेचा पहिला लढा

शेतकरी संघटनेने १९९३ मध्ये 'जमीन आमची, भाव आमचा' म्हणत या जमीन अधिग्रहण कायद्यांविषयक पहिला लढा पुण्याजवळील चिखली येथे दिला. पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गापासून नाशिककडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या बेचक्यात चिखली-कुदळवाडी हे छोटे खेडे. शेजारीच टाटांच्या टेल्को कंपनीचा ट्रक तयार करण्याचा कारखाना आहे. टाटांना आपल्या कारखान्याच्या विस्तारासाठी जमीन हवी होती. ही जमीन एमआयडीसीने चार हजार रुपये प्रति एकर भावाने घेण्याचे ठरविले. शेतकऱ्यांनी त्याला तीव्र विरोध केला. १०० एकर जमीन देण्याचे ठरले असताना एमआयडीसीने १८८ एकर जमीन देण्याचे जाहीर केले. टेल्कोला घाऊक गिऱ्हाईक म्हणून जवळजवळ ११ लाख रुपये प्रति एकर आणि शेतकऱ्यांना मात्र ४,००० रुपये प्रति एकर असा भाव ठरविण्यात आला.

शेतकऱ्यांच्या हातातून जमीन गेल्यानंतर लगेच तिचा भाव एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढला, शेतकऱ्यांना मात्र त्याचा काहीही फायदा होणार नव्हता. उलट त्यांच्या उत्पन्नाचे साधनच कायमस्वरूपी हिरावून घेण्यात येणार होते. शेतकऱ्यांनी लढा उभारल्यानंतर यामध्ये थोडा फरक करण्यात आला व केवळ काही हजारांच्या फरकाने जमीन देण्याचे ठरले. यातही अडचण आली, ती नवव्या परिशिष्टाची. तत्कालीन मुख्यमंत्री यांनी तर गर्जनाच केली, ''ही जमीन द्यायचे ठरले आहे. आम्ही ती देणार आहोत. या जमिनीवर शेतकरी शेती करीत असतील तर ते अतिक्रमण आहे. जमीन देण्यास विरोध केला तर तो आम्ही मोडून काढू...''

### उद्योगांसाठी 'सेझ'

१९९१ नंतर देशात आर्थिक सुधारणा सुरू झाल्यानंतर उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर जमीन अधिग्रहण करणे आवश्यक होते. उद्योगांसाठी २००६ ला खास कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे उद्योगांना हजारो एकर जमीन एकाच वेळी विकसित करता यावी, एकाच प्रकारच्या उद्योगांचे पॉकेट्स तयार व्हावेत यासाठी सेझचा कायदा करण्यात आला. शेतकऱ्यांच्या साठी असलेल्या कायद्यांमध्ये मात्र काहीही बदल करण्यात आला नाही. सरकारची वेगवेगळी खाती जमीन अधिग्रहणामध्ये आपली भूमिका कायम ठेवून आहेत. उद्योगांना मात्र करात सवलत मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदी करणे, कच्च्या मालाच्या आयातीसाठी पक्क्या मालाच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन देणे, कामगार कायदे लागू न करणे, विदेशी भांडवलाला मर्यादा नसणे अशा अनेक सवलती देण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या जमिनी कमी किमतीत घेण्याचा कायदा मात्र तसाच ठेवण्यात आला. या सेझचे वर्णन तत्कालीन वाणिज्य आणि उद्योगमंत्री कमलनाथ यांनी 'सेझ म्हणजे विकासाची इंजिने आहेत,' असे म्हटले. प्रसिद्ध उद्योगपती राहुल बजाज यांनी मात्र 'शेतीला अशा प्रकारे दाबून ठेवून फक्त उद्योगांना मुभा दिल्याने कुठलाही आर्थिक विकास होणार नाही. यातून मोठे जमीन घोटाळे, भूखंड घोटाळे होतील. एकूणच सेझ म्हणजे मोठे भूखंड घोटाळे,' अशी भविष्यवाणी केली.

शरद जोशींनी यावेळी 'आमचा सेझला विरोध नाही; पण ज्यांना जमीन विकत घ्यायची असेल त्यांनी बांधावर बसून आमच्याशी सौदा करावा. योग्य किंमत आल्यास शेतकरी स्वतःहून जमिनी देतील,' असे म्हटले. यावेळी औरंगाबाद परिसरातील आडगाव, गांधीली, बाळापूर वगैरे पाच गावांची साडेसहा हजार एकर जमीन व्हिडीओकॉनला देण्याचा घाट सरकारने घातला. या गावातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन उभारले. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे नजीकच्या गावात कार्यक्रमासाठी आले असताना कार्यकर्त्यांनी दगडफेक व घोषणाबाजी करून कार्यक्रम उधळून लावला. संध्याकाळी विलासराव व व्हिडीओकॉनचे मालक धूत यांनी हॉटेलमध्ये या जमिनी देण्याच्या करारावर सह्या करण्याचे ठरले. कार्यकर्त्यांना हे माहीत पडल्यावर मोठ्या संख्येने कार्यकर्ते हॉटेलवर चाल करून गेले आणि तेथेही दगडफेक झाली. आमच्या जमिनींचा सौदा करणारे विलासराव कोण? असा सवाल कार्यकर्त्यांनी विचारला. त्यानंतर स्वतः शरद जोशी यांनी आडगाव येथे सभा घेऊन एक इंचही जमीन शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय सरकारला दिली जाणार नाही अशी घोषणा केली. त्यावेळी ही जमीन शेतकऱ्यांकडून ८० हजार रुपये प्रति एकर या भावाने घेण्याचे ठरले. स्थानिक लोकप्रतिनिधींनी आता हा सरकारी मामला आहे, जमीन तर द्यावीच

## जमीन अधिग्रहणविरोधी प्रचंड संघर्ष

देशात सध्या वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या कारणांसाठी जवळजवळ ३.६९ लाख एकर जमीन ४० जिल्ह्यांमध्ये आणि १७ राज्यांतून प्रस्तावित आहे. पैकी तपशिलवार आकडेवारी तक्त्यात देत आहोत.

| राज्य | जिल्हे | प्रस्तावित जमीन (एकर) |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | अलिगढ, आग्रा, चांदोली, जी.बी.नगर, | १,७६,३३६ |
| महाराष्ट्र | नागपूर, रायगड, रत्नागिरी, पुणे | ४५,६०० |
| छत्तीसगढ | बस्तर, जंजगीर-चंपा | ४२,०६३ |
| ओरिसा | जगतसिंगपूर, जाजपूर, कालाहंडी, गंजम | ४१,८०० |
| झारखंड | कुंती, गुमला, हजारीबाग | २१,००० |
| गुजरात | भावनगर, कच्छ | ६,५२९ |
| हिमाचल प्र. | कुलू, किन्नौर, श्रीमौर, चंबा | २,८१७ |
| बिहार | औरंगाबाद, मुझफ्फरपूर | १,७४४ |
| हरयाणा | फतेहबाद | १,५०० |
| पंजाब | मोहाली | ७७० |
| चंदीगढ |  | १६७ |
| मेघालय | पूर्व खासी | १११ |
| केरळ | कोची | १०० |
| आंध्रप्रदेश | पूर्व गोदावरी, मेहबूबनगर, श्रीकाकूलम, निल्लोर, विशाखापट्टनम | २१,७३९ |
| तामिळनाडू | मदुराई, तिरूवेल्लूर, तुतीकोरीन | ५,००० |
| कर्नाटक | डी. कन्नडा | १,८०० |

(दै. टाइम्स ऑफ इंडिया २१ मे २०११ मधून साभार)

लागेल. तरीपण आम्ही काहीतरी प्रयत्न करतो असे सांगितले. मोबदला वाढवून देऊ अशी लालूच शेतकऱ्यांना दाखविली आणि तो वाढवून मिळाला, तो किती तर एक लाख रुपये एकर... म्हणजे एकरी फक्त वीसहजार रुपये वाढले. त्याचवेळी ही गावी औरंगाबादच्या महानगरपालिका हद्दीला जोडून असल्याने येथील जमिनीचा भाव १५ ते २० लाख रुपये एकर होता आणि शेतकऱ्यांना मिळणार होते फक्त १ लाख रुपये. संघटनेच्या आंदोलनामुळे व्हिडीओकॉनचे सेझ कायमचेच बारगळले. आता या परिसरात जमिनीचा भाव ४५ ते ५० लाख रुपये एकर एवढा चालू आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अंदाजच लावायचा म्हटला तर डोळे पांढरे व्हायचीच वेळ आहे.

### फक्त जमीनच फुकट का पाहिजे ?

उद्योग उभारताना त्यांना लागणारे सिमेंट, पोलाद, मशिनरी, भांडवल, कामगार हे सर्वच बाजारभावाप्रमाणे घ्यावे लागते. सरकार सबसिडीच्या रुपाने पाणी आणि वीज कमी भावात घेते करांमध्ये काही सवलत देते; पण वरील ज्या गोष्टी बाजारभावाने घ्याव्या लागतात, तसेच जमीन मात्र बाजारभावाने नको असते. ती त्यांना नाममात्र भावानेच मिळाली पाहिजे. सरकारला जर खरोखरच उद्योग वाढावेत आणि विकास व्हावा असे वाटत असेल तर शेतकऱ्यांनी देशोधडीला का म्हणून लागावे? उद्योगांनी बांधावर येऊन शेतीचा भाव ठरवावा. आकर्षक किंमत आल्यास उद्योगांना जमिनी देण्यासाठी शेतकऱ्यांच्याच रांगा लागतील. सरकारला उद्योगांना प्रोत्साहन द्यायचेच असेल तर नंतर त्यांनी उद्योगांना त्या जमिनीची किंमत द्यावी किंवा बाजारभावाने जमीन घेऊन उद्योगांना फुकट द्यावी. शेतकऱ्यांचे काहीही म्हणणे नाही.

### भामा कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड

शेतकऱ्यांचा मालमत्तेचा हक्क हिरावून घेण्यात आला आहे. इतर कुठल्याही उद्योग व्यावसायिकाला मात्र व्यवसायाचे आणि मालमत्ता उभारण्याचे स्वातंत्र्य आहे. वंचित आहे तो फक्त शेतकरी. यातून मार्ग काढण्यासाठी शरद जोशींनी आंबेठाण व परिसरातील म्हणजेच चाकण औद्योगिक वसाहतीला लागून असलेल्या दहा गावांची दहा हजार एकर जमीन एमआयडीसी अधिग्रहीत करणार आहे, असे समजल्यावर या गावांतील शेतकऱ्यांना एकत्र करून ही गावे ज्या भामा नदीच्या खोऱ्यातील आहेत त्या नावाने 'भामा कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.' ही कंपनी स्थापन करून शेतकऱ्यांनाही उद्योजक बनवण्याचा प्रयत्न शरद जोशी यांनी केला. शेतकऱ्यांची जमीन नगण्या भावाने काढून घेतल्यानंतर तो देशोधडीला लागतो. त्याची जमीन हेच त्याचे भांडवल आहे व त्याचा भांडवली हिस्सा (शेअर) उद्योगात कायम राहावा. त्याप्रमाणात त्याला उत्पन्नाचे साधन मिळावे. जमीन कायमची काढून घेतली जाऊ नये. तिचा वापर फक्त उद्योगांनी करावा. जोपर्यंत उद्योग उभा राहत नाही. तोपर्यंत शेतकऱ्याने ती जमीन कसावी. अशा तरतूदी या कंपनीमध्ये करण्यात आल्या व शेतकरी हाही एक उद्योजकच आहे असे त्याचे स्थान निर्माण करण्यात आले. या काळात युतीचे सरकार महाराष्ट्रात होते. बाळासाहेब ठाकरे आणि तत्कालिन मुख्यमंत्री राणे यांच्या हस्ते या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवण्याचे ठरले. फक्त उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. सरकारने या कंपनीसाठी नोटीफिकेशन करणे आवश्यक होते; परंतु त्याला पुन्हा जमीन अधिग्रहण विषयक नववी सूची आडवी आली. शेतकऱ्याने उद्योजक बनण्याचे आणि त्याच्या जमिनीलाही काही भांडवली मूल्य आहे हे मान्य करण्याचे स्वप्न भंगले. युतीचे सरकारही गडगडले आणि हा संपूर्ण देशपातळीवर उदाहरण ठरू शकणारा



प्रकल्प बंद पडला. सध्या चाकण परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर भूखंडखोरांचे राज्य सुरू आहे. जमिनींच्या व्यवहारांत केवळ पलट्या मारणारे कोट्यधीश झाले आहेत. हे दुसरे तिसरे कोणी नसून आपल्याच राज्यातील नेते आणि राज्याचे नेतृत्व करणारे केंद्रातील नेते आहेत. नववे परिशिष्ट काढून टाकले जात नाही याचे कारण हेच आहे. एमआयडीसी, सिडको, हडको आणि इतर शासकीय यंत्रणांमार्फत चालणारा राज्यकर्त्यांचा भूखंडखोरीचा धंदा बंद पडू नये. त्याला अधिकाधिक ऊर्जितावस्था येवो. तेच पैसे पुन्हा निवडणुकीत वापरून पुन्हा पुन्हा सत्ता मिळो.

## माया आणि ममता

उत्तर प्रदेशातील एक्स्प्रेस हायवेसाठी चाललेल्या जमीन अधिग्रहणाच्या विरोधी आंदोलनात राहुल गांधींनी उडी घेतल्यानंतर मायावतींनी त्यांची 'ही राहूलची नौटंकी आहे' अशी संभावना केली. ते खरेही आहे. त्यांनीच पुढे असे म्हटले. 'राहूल गांधी संसदेमध्ये जमीन अधिग्रहणविषयक कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी जे विधेयक पावसाळी अधिवेशनात मांडले जाणार आहे. ते पास होण्यासाठी प्रयत्न करावेत. येथे उत्तर प्रदेशात येऊन येऊ घातलेल्या निवडणुकांवर डोळा ठेवून आंदोलकांना भडकावू नये. त्यांना जर खरेच शेतकऱ्यांचा कळवळा असेल, तर संसदेत ते का तोंड उघडत नाहीत, केंद्र सरकारने जमीन संपादनाबाबतचा नवीन कायदा आणला असता तर देशातील शेतकऱ्यांचे असंख्य प्रश्न केव्हाच सुटले असते...'

इकडे पश्चिम बंगालमध्ये ममतांना लोकांनी भरघोस मतांनी निवडून दिले आणि मुख्यमंत्री पदावर बसविले. सिंगूर येथे टाटांच्या नॅनो प्रकल्पाला विरोध केल्यामुळे त्या खऱ्या गरिबांच्या आणि शेतकऱ्यांच्या कैवारी ठरल्या. ज्या कम्युनिस्टांनी बंगालमध्ये ३४ वर्षे राज्य केले ते भुईसपाट झाले. सिंगुर आणि नंदिग्रामचे आंदोलन करताना अनेकांचे रक्त सांडले. आंदोलनाला यश मिळाले. टाटांचा प्रकल्प गुजरातमध्ये गेला; पण त्या वेळीही ममतांची मागणी ही कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची जमीन घेऊ नये भलेही उद्योग आले नाहीत तरी चालतील अशी होती. त्याही जमीन अधिग्रहण कायदे बदलणे आणि घटनेतील नववी सूची काढून टाकणे याबद्दल चकार शब्दही बोलल्या नाहीत.

## घटनेतील नववे परिशिष्ट

शेतीक्षेत्राला देशांतर्गत वसाहत बनविण्यासाठी घटनेमध्ये परिशिष्ट ९ समाविष्ट करण्यात आले. कल्याणकारी राज्य ही संकल्पना राबविण्यासाठी राजसत्तेच्या पुढाकाराने औद्योगिकीकरण सुरू झाले. औद्योगिकीकरणासाठी शेतीमालाची लूट करणे आवश्यक होते. त्याकरिता देशांतर्गत शेतीक्षेत्राला वसाहत क्षेत्र बनवणे गरजेचे आणि आवश्यक भासू लागले; पण मूळ घटनेच्या तिसऱ्या विभागात नागरिकाला व्यवसाय, उद्योग, व्यापार, धंदा इत्यादी करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे. हा स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तसेच नागरिकाला कलम १९ फ (ग) मालमत्तेचा अधिकारसुद्धा आला आहे. या सर्व अडचणी दूर करण्यासाठी शेतीविषयक जवळजवळ अडीचशे कायदे नवव्या परिशिष्टामध्ये टाकण्यात आले. या परिशिष्टानुसार शेतकऱ्यांना आपले जमीन लोकोपयोगी कामासाठी सरकारला देणे बंधनकारक ठरले. ही जमीन देताना ती जमीन द्यावी किंवा नाही, तिचा भाव काय असावा?, किती जमीन द्यावी? याचा कुठलाही अधिकार शेतकऱ्यांकडे राहिला नाही. अशा कामांसाठी शेतकरी बेदखल झाल्यास त्याचे पुनर्वसन करण्याचे बंधन सरकारवर आहे; पण हे बंधन कधीच पाळले जात नाही. अगोदर याची जमीन काढून टाकली जाते आणि नंतर २५-३० वर्षे त्याच्या पुनर्वसनाचे काम चालते. ते कधीच पूर्ण होत नाही. शेतकरी देशोधडीला लागतो.

## नवव्या परिशिष्टाची होळी

शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवी देवांग यांनी या शेतकरी विरोधी आणि शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या नवव्या परिशिष्टाची होळी दि. १४ एप्रिल २०११ रोजी धुळे येथे केली. हे परिशिष्ट मूळच्या (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या) घटनेत नाही. ते नंतर घुसडण्यात आले आहे. हे परिशिष्ट घटनेतून काढून टाकावे आणि मूळच्या घटनेची पुर्नस्थापना करावी यासाठी हे आंदोलन करण्यात आले. काही वृत्तपत्रांनी घटनेचीच प्रत जाळली आहे अशा अफवा पसरवल्याने काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला. गैरसमजातून एका चांगल्या आंदोलनामध्ये वितुष्ट आले. आता पुन्हा या आंदोलनाला धार द्यावी लागेल. नसता जमीन अधिग्रहणासाठी शेतकऱ्यांना जैतापूर, सिंगूर, भट्टा-परसोल, नंदीग्राम, नालंदा, देहू याप्रमाणे जीव गमवावे लागतील. नववे परिशिष्ट काढून टाकणे हाच आता नागरिकांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा ठरो.

**संदर्भ :** शरद जोशी -बळीचे राज्य येणार आहे, ॲड. सुभाष खंडागळे (शे.संघटक दि. ६ ऑगस्ट २०१०).

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# वनखात्याच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी ऐतिहासिक घटना

**गाववासी आणि जंगल तसेच जंगलवासी आणि जंगल हे नाते कायम होते तोपर्यंत जंगलाची हानी कधीच झाली नाही. त्या काळी वन्यप्राण्यांची मांसासाठी शिकार होत होती; पण वाघ किंवा सिहांची संख्या कधीच कमी झाली नाही. जंगल संरक्षणाचा सबंध या नात्यांशी जोडला आहे. ज्यावेळी हा सबंध तोडून पगारधारी नोकरशहांशी नाते जोडल्या गेले त्या वेळेपासून जंगलाचा व वन्यप्राण्यांचा ऱ्हास सुरू झाला. इंग्रजांनी अशारीतीने जंगलाचे राष्ट्रीयीकरण केले.**

इ. स. १८१८ पर्यंत इंग्रजांनी देश पूर्णपणे ताब्यात घेतला. देशाचा वसाहत म्हणून उपयोग करायचा असे इंग्रज सरकारचे धोरण होते. प्रशासनाचा खर्च भागविण्यासाठी महसूल गोळा करणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांनी देशातील सर्व शेतजमिनीची व जंगले यांची मोजणी केली. त्यावेळी प्रथमच शेतजमिनीच्या मालकी हक्काचे महसूल दप्तर तयार करण्यात आले. हे करत असताना जंगले ही कोणाच्या मालकीची हा प्रश्न निर्माण झाला. एक मोठा जंगलवासी समाज घटक जंगलातील उत्पन्नावर जगतो याची दखल घेतल्या गेली नाही. जंगलवासी समाज हा अन्नसंकलन करणारा समाज. उलट शेतकीसमाज हा उत्पादक समाज त्यामुळे जंगल हे जंगलवासीच्या मालकीचे अशी नोंद केल्या गेली नाही. दुसरीकडे गाव शिवारील जमीन याची मालकीहक्काची नोंद केल्या गेली. त्याच वेळी जेथे जंगलवासी नाही, अशा गावशिवारातील जंगलांची मालकी ही गावाची अशी नोंद केल्या गेली असती; पण तसे केल्या गेले नाही.

इंग्रज येण्याअगोदर शेती गावची, जंगल गावचे- शेती आणि जंगल हे परस्परपूरक होते. ते नैसर्गिक नाते होते. जेथे गाव नाही केवळ जंगले आहेत, ती जंगले ही जंगलवासीयांची अशी व्यवस्था होती. गावाला जंगल आपल्या मालकीचे आहे अशी भावना होती; पण मोजणी झाल्यानंतर जंगल इंग्रज सरकारच्या मालकीचे अशी नोंद केल्या गेली.

### शेती आणि जंगल नात्याची ताटातूट

जंगल हे गाववासीयांचे अशी भावना जोपर्यंत होती तोपर्यंत गाववासी वनसंरक्षकाची भूमिका बजावत होते. जंगल हे आपल्या मालकीचे आहे व त्यापासून आर्थिक लाभ होतो ही त्या मागची मूळ प्रेरणा. महसूल (लगान) गोळा करता यावा या उद्देशाने जमिनीची मोजणी केली खरी; पण जंगल सरकारच्या मालकीचे अशी नोंद केल्यामुळे शेती आणि जंगल हे नाते तुटले. जंगलाशिवाय शेती समृध्द असत नाही अशी ती नाती होती; पण हे नातेच तुटल्यामुळे गाववासीयांची वनसंरक्षणाच्या वृत्तीची भावना नष्ट झाली. देशातील वनसंपत्तीची सरकारी नोकरशाहीने अतिशय क्रूर पध्दतीने लूट केली. दरवर्षी बांबूचा व्यवहार हा ७५ हजार कोटींच्या आसपास आहे. हेच जर जंगल गाववासीयांचे असते तर हा सर्व व्यवहार ग्रामसभेमार्फत झाला असता. गावे व खेडी समृध्द झाली असती. वनोत्पादनाच्या यादीमध्ये बांबू, साग, तेंदूपत्ता, खैर व इतर तत्सम व मौल्यवान लाकडांचा व वनऔषधी वनस्पतींचा समावेश आहे.



ॲड. सुभाष खंडागळे

### जंगलवासी आणि जंगलाच्या नात्याची तूट

जंगल हे सरकारच्या मालकीचे आहे अशी नोंद झाली. त्यामुळे जंगलवासी आणि जंगल ही नाती तोडल्या गेली. जंगल हे

जंगलवासीयांचे नाही असे जेव्हा समजले तेव्हा विरोध करतील म्हणून इंग्रज सरकारने सरसकट जंगलवासीयांना गुन्हेगार जमात समजून तसा कायदा केला. अनेक ठिकाणी इंग्रजांनी औद्योगिकीकरणासाठी झाडांची कटाई प्रथम सुरू केली. त्यामुळे जंगलवासीयांनी प्रचंड विरोध केला होता. इतिहासात 'चिपको आंदोलन' प्रसिध्द आहे. आर्थिक स्वातंत्र्याचे हे पहिले आंदोलन. गाववासी आणि जंगल तसेच जंगलवासी आणि जंगल हे नाते कायम होते तोपर्यंत जंगलाची हानी कधीच झाली नाही. त्या काळी वन्यप्राण्यांची मांसासाठी शिकार होत होती; पण वाघ किंवा सिहांची संख्या कधीच कमी झाली नाही. जंगल संरक्षणाचा सबंध या नात्यांशी जोडला आहे. ज्यावेळी हा सबंध तोडून पगारधारी नोकरशहांशी नाते जोडल्या गेले त्या वेळेपासून जंगलाचा व वन्यप्राण्यांचा ऱ्हास सुरू झाला. इंग्रजांनी अशारीतीने जंगलाचे राष्ट्रीयीकरण केले.

## गायरान जमिनी

प्रथमच मोजणीच्या काळात गाव शिवारात काही मोकळ्या जमिनी होत्या. त्यावर मालकी कुणाचीच आढळली नाही. त्या जमिनीची नोंद गायरान जमीन म्हणजे 'इ' क्लास जमीन म्हणून नोंद केल्या गेली. याचा सबंध दूध उत्पादनाशी होता. गाव-शेती, गायरान आणि जंगल हे शेती संस्कृतीशी जोडले होते. यातील जंगलाचे नाते तोडले. पुढे गायरान जमिनी या ग्रामसभेच्या अधिपत्याखाली आल्या. त्या गायरान जमिनीवर अतिक्रमण करून त्या गायरान जमिनीसुद्धा आता शिल्लक नाहीत. गायरान व शेती हे नातेसुद्धा तोडल्या गेले. सर्व्हे नंबर, 'इ' क्लास आणि 'फ' क्लास अशा नोंदी पहिल्या मोजणीच्या वेळी झाल्या. 'फ' क्लास म्हणजे वनाची जमीन. आता तुकडेबंदीनंतर सर्व्हे नंबरचे गट नंबरमध्ये रूपांतर झाले. एक मात्र खरे, इंग्रजांनी प्रथमच जी देशभर मोजणी केली ती शास्त्रोक्त व अचूक होती. देशभरातील जमिनीच्या नोंदी या पहिल्या मोजणीच्या आधारेच केलेल्या आहेत. त्याचा उपयोग आजतगायत चालू आहे.

## भारतीय वन कायदा - १९२७

जंगल हे सरकारच्या मालकीचे आहे हे इग्रंजांनी वेगवेगळ्या अध्यादेशाद्वारे घोषीत केले. त्याच दरम्यान लष्कर तळे, रेल्वे, सडका, सरकारी नोकरांचे निवासस्थान यासाठी जमिनीची गरज भासली. ती गरज भागविण्यासाठी स.न. १८८४ साली भू-अर्जन कायदा बनविला. देशातील जंगलांचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर वनोत्पादनाचे व्यवस्थापन व्यवस्थीत व्हावे म्हणून २१ सप्टेंबर १९२७ रोजी भारतीय वनकायदा बनविला. देशातील जंगलाचा सर्व कारभार या कायद्याअंतर्गत चालतो. जंगलातील वनउत्पादनाची वाढ, कटाई व विक्री हे सर्व व्यवहार या कायद्याअंतर्गत चालतात. त्या वेळेपासून सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या वनखात्याची मालकी देशातील जंगलावर आहे. या कायद्याद्धारे जंगलावर केंद्र व राज्य सरकारचे संयुक्तीक नियंत्रण व मालकी आहे. या कायद्याद्धारे वनोत्पादनाच्या मौल्यवान यादीमध्ये साग, बांबू, साल, खैर, तेंदूपत्ता व तत्सम प्रकारच्या लाकडांच्या वनस्पतींचा समावेश या कायद्याअंतर्गत केला आहे. गौण उत्पादनाच्या यादीमध्ये गवत, डिंक, मध, जळतण इत्यांदीचा समावेश केला आहे. गौणउत्पादनाचा उपयोग गावकरी तथा जंगलवासी यांना करता येतो; पण त्यासाठी फी आकरणी पास काढावी लागते; पण मौल्यवान वनोत्पादनाच्या वाढीपासून ते विक्रीपर्यंतचे सर्व अधिकार या कायद्यानुसार वनखात्याला आहे. वनखात्याकडून ज्या व्यापाऱ्यांनी मौल्यवान वनोत्पादनाचा माल खरेदी केला, त्या मालाच्या वाहतूकीसाठी ट्रॉझीस पास काही पैसे भरून काढावी लागते. अनेकवेळा बरेच शेतकरी बांबूची लागवड आपल्या शेताच्या बांधावर करतात. अशा बांबूची विक्रीसाठी वाहतूक करताना वनखात्याचे अधिकारी वनोत्पादन समजून ट्रॉझीस पास नाही म्हणून तो जप्त करतात. न्यायालयात खटले दाखल करतात. हा माल खाजगी मालकीचा आहे तसे न्यायालयासमोर सिद्ध करावे लागते आणि मग त्यातून सुटका होते.

## भारतीय संविधान आणि जंगले

संविधानाच्या पहिल्याच कलमामध्ये देशाचे नाव इंडिया म्हणजे भारत असे आहे. त्याच कलमाच्या पोटकलमामध्ये देशाचे घटक म्हणून राज्य आणि केंद्रशासित प्रदेश गृहीत धरले आहेत; पण गाव, शहर, नगरे तथा जगंलातील वनवासी समाजसमूह म्हणून जंगले हा घटक धरण्यात आला नाही. जर पहिल्याच कलमात घटक धरण्यात आले असते तर गाव व गावाभोवतीचे जंगल हे गाववासीयांचे पर्यायाने ग्रामसभेचे जेथे गाव नाही; परंतु जंगलवासी आहेत ती जंगले जंगलवासीयांची अशी नोंद घ्यावी लागली असती. त्यामुळे गाव, शेती, जंगल हा व्यवहार गाववासीयांमार्फत झाला असता. शेतीच्या शेतमालाचा व्यवहार हा 'जीवनावश्यक वस्तुंचा कायदा' यानुसार सरकारमार्फत चालतो. जंगलातील वनोत्पादनाचा व्यवहार हासुध्दा 'भारतीय वन कायदा - १९२७' यानुसार वनखात्यामार्फत म्हणजे सरकारमार्फत चालतो. जंगल व शेती यातील व्यवहाराचे राष्ट्रीयीकरण झाले आहे. दरवर्षी शेतीची लूट १ लाख कोटीपेक्षा जास्त होते हे आपणास समजले. जंगलातील वनोत्पादनाच्या व्यवहारातून दरवर्षी दीड ते दोन लाख कोटींपेक्षा जास्त लूट होते. हा सर्व व्यवहार जर गाववासीयांच्यामार्फत झाला असता तर ग्रामीण भागात शेतीवर आणि वनावर आधारित ग्रामीण औद्योगिकीकरणाचा पाया नवीन संशोधनाचा व तंत्रज्ञानाचा वापर करून केव्हाच झाला असता. खेडीही समृध्द झाली असती. गाववासी व जंगलवासी हे नैसर्गिकरीत्या वन व वन्यप्राण्यांचे संरक्षक म्हणून त्यांची भूमिका असती. त्यामागे आर्थिक लाभ ही खरी मूळप्रेरणा कारणीभूत ठरली असती. शेतीच्या बचतीची लूट आणि जंगलाची लूट करून स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणाचे धोरण आखले त्याचा परिणाम शेतीक्षेत्राचा आणि जंगलाचा ऱ्हास हा होय. याच्या उलट ही लूट न करता ती बचत ग्रामीण भागात राहिली असती. तेथून ग्रामीण औद्योगिकीकरणाला वेग आला असता. शेती आणि जंगले समृध्द झाली असती. जंगलाचा ऱ्हासही झाला नसता.

मूळच्या संविधानामध्ये जंगलाबाबत काहीच उल्लेख नाही. संविधान लागू झाल्यानंतर पहिल्याच घटना दुरुस्तीद्धारे (१८ जून १९५१) रोजी शेतीक्षेत्राला वसाहतक्षेत्र बनविले. जमिनीच्या मालकीचा मूलभूत हक्क काढून घेतला. त्यामुळे भारतातील जंगलाच्या मालकी हक्कासंबंधीचा प्रश्न उपस्थित झाला नाही. हा हक्क काढून घेतल्यानंतर अनेक जमीनदारांनी सर्वोच्च न्यायालयात खटले दाखल केले होते; परंतु जंगल हे गाववासीयांचे तथा जंगलवासीयांचे याबाबत आजपर्यंत कुणीही खटला दाखल केला नाही.

त्यामुळे वन कायद्याच्या घटनात्मक वैद्यतेबाबत कुणीही हरकत घेतली नाही. भूअर्जन कायदा, जीवनावश्यक वस्तुंचा कायदा आणि भारतीय वनकायदा हे शेती व जंगल यांना देशांतर्गत वसाहतक्षेत्र बनविणारे कायदे आहेत आणि या क्षेत्रातील समाजसमूह हे गुलाम आहेत.

इ.स. १९७६ मध्ये देशात आणीबाणी लागू होती. विरोधी पक्षांचे नेते मिसा कायद्याखाली जेलमध्ये होते. त्या काळात ४२वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीद्वारे संविधानाच्या प्रस्तावनेत 'समाजवादी' हा शब्द टाकण्यात आला. या घटना दुरुस्तीच्या आणखी इतर तरतुदी शिवाय घटनेचे कलम ५१ (अ) हे नवीन कलम जोडले. या कलमाच्या एका पोटकलमात जंगलाबाबतचा उल्लेख आहे. त्यामध्ये जंगल, वन्यप्राणी, तलाव, नदी इत्यादींचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे इतकाच काय तो उल्लेख आहे. यामध्ये वनखात्याचा कोठेच उल्लेख नाही. दुसरे म्हणजे ही दुरुस्ती आणीबाणीच्या काळात झाली. त्यावेळी नागरिकांचे विचार स्वातंत्र्याचे हक्क तहकूब केले होते. मते मांडण्यावर बंदी होती. संसदेत कोणताही महत्त्वचा कायदा बनवताना जनतेची त्याबाबत मते मागण्याची पद्धत आहे तसे आणीबाणीच्या काळात झाले नाही. त्यामुळे आणीबाणीच्या काळात झालेली घटनादुरुस्ती कितपत वैद्य आहे हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोर अजूनही आला नाही.

भारतीय वन कायद्याचा उद्देश हा वनाचा विकास, वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे असा आहे. या उद्दिष्टांच्या आड, गाववासी व जंगलवासी यांचे मौल्यवान वनोत्पादनाचा व्यवहार करण्याचा हक्कच काढून घेतला. त्यांना आर्थिक लाभापासून वंचित ठेवण्यात आले. वनाच्या विकासासाठी आणि वन्यप्राण्यांच्या विकासासाठी स्वातंत्र्यानंतर शेकडो योजना वनखात्यामार्फत राबविल्या गेल्या. करोडो रुपये खर्च झाले; पण वनखात्याची नोकरशाही आणि सत्तेतील दलाल यांनी नेहमीच्या सवयीप्रमाणे सर्व पैसा खाऊन टाकला. हजारो जंगलमाफिया तयार केले. प्रचंड प्रमाणात जंगलांची लूट करण्यात आली. अलीकडे व्याघ्र प्रकल्प, सामाजिक वनीकरण, वनविकास महामंडळ आदी योजना हाती घेतल्या. त्यासाठी प्रचंड निधी उपलब्ध केला. हा खर्च होऊनही ना वनाचा विकास झाला ना वन्यप्राण्यांचे संरक्षण. वनाच्या संवर्धन व विकासासाठी गाववासी व जंगलवासी यांचा सहभाग असल्याशिवाय हे शक्य नाही. सहभाग वाढविण्यासाठी त्यांना जंगल हे आपल्या मालकीचे आणि वनोत्पादनाच्या वाढीचा, व्यवहाराचा आपलाच अधिकार आहे. त्यापासून आपल्याला आर्थिक लाभ होतो असे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत वनाचा विकास शक्य नाही. त्यासाठी वनखाते बरखास्त करून वनाचे खाजगीकरण केल्या शिवाय शक्य नाही.

**वनाचे खासगीकरण करून घेणारे मेंढा (लेखा) ता. धानोरा जि. गडचिरोली हे देशातील पहिले गाव**

गडचिरोलीपासून ३२ कि.मी. अंतरावर ८० घरांचे ३५० लोकसंख्येचे गांव १५ डिसेंबर २०१० रोजी १८१० हेक्टर क्षेत्रफळाचे जंगल गावच्या मालकीचे करण्यात आले. या जंगलावरील वनखात्याचा अधिकार काढून घेण्यात आला. आता त्या जंगलातील वनोत्पादनावर गावच्या मालकीची वाटचाल सुरू झाली आहे. त्या वनातील निघणारे बांबू यांची वाढ, कटाई, विक्री व वाहतूक पास देण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे. विक्री व्यवहाराचा पैसा गावकऱ्यांचा वनक्षेत्रात आर्थिक स्वातंत्र्याची पहिली ठिणगी या गावात घडली. सुरुवात बांबूपासून झाली. पुढील वाटचाल तेंदूपत्ता, साग आदिप्रमाणे चालू होईल. वनोत्पादनाच्या किमती खुल्या बाजारपेठेप्रमाणे असतील, की वनखाते नियंत्रित किमती ठरवतील हे प्रश्न मात्र उपस्थित झाले आहेत.

## पार्श्वभूमी

मोहन हिराबाई हिरालाल हे आमच्या सोबत जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीतील एक परिपक्व व्यक्तिमत्त्व, आदिवासी क्षेत्रात काम करावयाचे आणि मूलभूत प्रश्नाला धरून आदिवासींना हक्काची जाणीव करून द्यावी या उद्देशाने त्यांनी स.न. १९७८ पासून मेंढा (लेखा) या गावची निवड केली. त्या गावात राहून तेथील आदिवासींची बोलीभाषा अवगत केली. त्यांच्या चालीरीती, वृत्ती, प्रवृत्ती समजून घेतली. त्यानंतर ते शेतकरी संघटनेशी जोडल्या गेले. भंडारा येथे शेतकरी संघटनेच्या वतीने 'भात परिषद' आयोजित केली होती. त्यामध्ये त्यांनी भाग घेतला होता. शेतकरी चळवळीच्या मुख्य प्रवाहात जंगलवासीयांना कसे आणता येईल यावर त्यांनी माझ्याशी व इतर अनेक सहकाऱ्यांशी चर्चाही केली; पण निष्पन्न काहीच झाले नाही. 'जंगल आमचे, आम्हीच मालक' ही चळवळ मेंढा (लेखा) गावच्या आसपासच्या ५० ते ६० गावांमध्ये चालू केली. अनेक अधिकारी, लोकप्रतिनिधी, मंत्री यांना भेटून चळवळी मागील भूमिका पटवून दिली. पटवून देण्याची त्यांची शैली हे त्यांचे खास वैशिष्ट्य. शेवटी न जाणो, कसे आणि काय, शेवटी केंद्रसरकारने इ.स. २००६ मध्ये 'अनुसुचित जमाती आणि इतर जंगल रहिवाशी (जंगल अधिकार नियमन) कायदा २००६' हा कायदा मंजूर केला. इंग्रजीत त्या कायद्याला "Schedule Tribes & other Forest Dwellers (Regulation of forest Act – 2006)" म्हणतात. थोडक्यात या कायद्याला 'वनअधिकार कायदा'' म्हणतात. या कायद्यानुसार मोहन हिराबाई हिरालाल यांनी मेंढा (लेखा) या गावातील नागरिकांच्या वतीने दावे दाखल केले. ते दावे मंजूर झाले. आज रोजी त्या गावातील वनक्षेत्राचे मालक झाले. या कायद्यात भरपूर त्रूटी आहे. या कायद्याच्या पुस्तीका देशातील जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचेकडे मोफत मिळतात. महाराष्ट्रात इंग्रजी आणि मराठीमध्ये या पुस्तीका उपलब्ध आहेत. मोहन हिराबाई हिरालाल यांचा संपर्क नंबर ९४२२८३५२३४ हा आहे. जंगल अधिकाराचे आंदोलन हे आर्थिक स्वातंत्र्याचे आंदोलन आहे.

**ॲड. सुभाष खंडागळे**
नवचंडिका ॲटोमोबाईल्स, श्रीरामपूर,
पुसद - ४४५ २१५ जि. यवतमाळ
मो.नं. ९८५००१४०३९

■■



# मनमोहना बडे झुटे !

## मनमोहन सरकार : दोन वर्षांचे दुःस्वप्न

**मनमोहनसिंह यानी पंतप्रधान पदावर राहण्याचे कोणतेही औचित्य उरलेले नाही. भलेही ते भ्रष्टाचारात लिप्त नसतील; पण त्यांच्या कार्यकाळातील भ्रष्टाचाराच्या भानगडीतूनच अण्णा हजारे यांच्या उभ्या राहिलेल्या आंदोलनाने देशातील लोकशाही व लोकशाही संस्थांच्या विरोधात धोकादायक लाट निर्माण केली आहे, हे विसरून चालणार नाही. मनमोहनसिंह यानी पंतप्रधान पदावरून पायउतार व्हावे यासाठी यापेक्षा दुसरे कोणतेही सबळ आणि प्रबळ कारण असू शकत नाही.सर्वसामान्य भारतीय जनतेचे दोन वर्षांचे दुःस्वप्न संपविण्याचासुद्धा हाच मार्ग आहे.**

पहिल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात देदीप्यमान कामगिरी केली म्हणून नव्हे तर जनहितासाठी नवे मार्ग चोखाळण्याची प्रामाणिक इच्छा व धडपड लक्षात घेऊन जनतेने दोन वर्षांपूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पंतप्रधान मनमोहनसिंह आणि त्यांच्या काँग्रेस आघाडीच्या सरकारवर आपल्या विश्वासाची मोहोर उमटविली होती. मनमोहनसिंह यांचे सरकार पहिल्या कार्यकाळात डाव्या पक्षांच्या कुबड्यावर अवलंबून होते आणि कोणतीही नवी गोष्ट करायची म्हटली, की त्या सरकारची सतत डाव्यांचा अडथळा पार करून निर्णय घेण्यात वेळ व शक्ती खर्च व्हायची. अणुऊर्जेच्या मुद्द्यावरून सरकारच्या धडपडीवर डावे नेहमीच पाणी फिरवितात असा जनतेचा समज दृढ झाला. या बाबतीत उजवे आणि डावे एकाच माळेचे मणी असल्याची जनभावना निर्माण झाली होती. म्हणूनच डाव्या आणि उजव्यांना धडा शिकवून पंतप्रधान मनमोहन सिंह नेतृत्व करीत असलेल्या काँग्रेस आघाडी सरकारला व त्यातही काँग्रेसला जास्त शक्ती प्रदान करण्याचा निर्णय गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदाराने घेतला. भारतीय मतदार दर निवडणुकीतून शिकून, बोध घेऊन अधिक प्रबुद्धपणे निर्णय घेत असल्याची खात्री पटविणारा कौल असल्याची ग्वाही तेव्हा सर्व राजकीय पंडितांनी व विश्लेषकांनी एकमुखाने दिली होती. यात अजिबात अतिशयोक्ती नव्हती. फक्त हे पंडित एक पुष्टी जोडायला विसरले होते. जनता जरी प्रत्येक निवडणुकीत बोध घेऊन अधिक शहाणी होत असली तरी राजकीय पक्ष व त्यांचे नेते निवडणुकीतून बोध घेतात असा इतिहास नाही हे सांगायला ते विसरले होते. असा बोध घेतला असता तर ना डाव्यांचे पानीपत झाले असते, ना मनमोहन सरकारची विश्वसनियता रसातळाला गेली असती! जनतेचा भ्रमनिरास करण्यासाठीच भारतातील राजकीय पक्षांचा जन्म झाला असावा असे म्हणण्यासारखी परिस्थिती असली तरी मागच्या दोन वर्षांत मनमोहन सरकारने जनतेच्या केलेल्या भ्रमनिरासाला तोड सापडणार नाही.



सुधाकर जाधव

### छोट्या स्वप्नांचे दुःस्वप्नात रूपांतर

मतदारांनी सरकारच्या निर्णय प्रक्रियेतील डाव्यांचा अडथळा दूर केल्याने आणि उजवेही उत्पात करणार नाहीत याची व्यवस्था केल्याने लोकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी तत्परतेने निर्णय घेतले जातील अशी माफक अपेक्षा लोकांनी केली होती. मनमोहन सरकारच्या उदारीकरणाच्या नीतिने उद्योग विकासातील अडथळा दूर होऊन उद्योगाची व उद्योग जगताची भरभराट होत असल्याचे दिसून आल्याने शेतीक्षेत्राचीही दयनीय परिस्थिती बदलेल, उदारीकरणाने शेतीक्षेत्राचा कायापालट होऊन त्याचा लाभ सर्वसामान्यांना होईल असे सर्वसामान्यांचे स्वप्न होते; परंतु सरकारच्या निर्णयाने- नव्हे अनिर्णयाने- सामान्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. आपल्या पहिल्या कार्यकाळात डाव्या-उजव्यांचे अडथळे पार करीत निर्णयासाठी धडपडणारे सरकार आपल्या दुसऱ्या कार्यकाळात अजिबात निर्णय न घेणारे

सरकार ठरले. लोकांनी डाव्याउजव्यांचा अडथळा दूर करून आपल्या हाती सत्ता सोपविली म्हणजे 'आता आपलेच राज्य आहे' या आविर्भावात स्वत: पंतप्रधान व त्यांचे सहकारी वागू लागले. देशातील जनतेप्रती आपली काही बांधिलकी आहे हे मागच्या दोन वर्षांत या सरकारला दाखविता आलेले नाही. सरकारपुढे काही ध्येयधोरणे व उद्दिष्ट आहे हे गेल्या दोन वर्षांत दिसून आले नाही. उदारीकरणाचे प्रणेते समजल्या जाणारे पंतप्रधान चक्क उदारीकरणच विसरून गेले! सरकार पुढे कार्यक्रमच नसेल तर सरकार कार्यक्षम कसे राहील? मनमोहन सरकारच्या या दुसऱ्या दोन वर्षांच्या कालखंडात नेमके हेच घडले आहे. जनता पक्ष व जनता दल यांच्या बजबजपूरीपेक्षाही या सरकारातील अनागोंदी जास्त खूपणारी आहे. जनता पक्ष व जनता दल यांच्या सरकारांच्या कालखंडात पंतप्रधानपदाचे अवमूल्यन झाले होते हे खरे; पण त्याला पंतप्रधानाच्या पक्षाची अत्यल्प ताकद कारणीभूत होती; पण मनमोहन सिंह हे देशातील सर्वाधिक शक्तिशाली पक्षाचे पंतप्रधान आहेत आणि तरीही त्यांनी या पदाची सर्वाधिक अप्रतिष्ठा केली आहे. आपल्या सहकाऱ्यांच्या व सरकारच्या कारभाराकडे लक्ष नसलेला व कोणताही वचक नसलेला पंतप्रधान या देशाने स्वातंत्र्यानंतर मागच्या दोन वर्षांत पहिल्यांदाच पाहिला आहे. परिणामी गेल्या दोन वर्षांत भ्रष्टाचाराने सर्व सीमा पार करून नवे विक्रम निर्माण केलेत. नव नवी क्षेत्रे भ्रष्टाचाराने पादाक्रांत केलीत. या भ्रष्टाचारात पंतप्रधानांचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी त्यांच्यामुळे मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना न भूतो न भविष्यती असा भ्रष्टाचार करता आला हे नाकारता येणार नाही. आजपर्यंतच्या सर्वच सरकारात भ्रष्टाचाराची प्रकारणे झालीत हे खरे; पण भ्रष्टाचाराशिवाय सरकारने काही केलेच नाही असे मात्र मनमोहन सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील गेल्या दोन वर्षांत पहिल्यांदाच घडले आहे. भ्रष्टाचाराबाबत प्रखर रोष निर्माण होण्यामागचे हे खरे कारण आहे... सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मनमोहन सरकारने आपल्या कर्तबगारीचा जो पाढा वाचला आहे त्यातील सर्वच्या सर्व पाढे भ्रष्टाचाराचा गुणाकार करणारे असल्याचे प्रामुख्याने दिसून येईल.

### ही बघा सरकारची कर्तबगारी

शिक्षण हक्क विधेयक पारीत करून घेतल्याबद्दल हे सरकार स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे हे विधेयक वरकरणी स्वागतार्ह वाटते; पण हे विधेयक पारीत होऊन आणि अमलात येऊन वर्ष उलटले तरी विद्यार्थ्यांची संख्या देशभरात कुठेच वाढली नाही. मात्र शिक्षण सक्तीचे केले म्हणून शिक्षणावरील खर्च मात्र अवाच्या सव्वा वाढला.

हां वाढीव खर्च कोठे जिरला याचा अंदाज करणे कठीण नाही. या सरकारचा आणखी एक पराक्रम म्हणजे शाळांतून देण्यात येणारे माध्यान्ह भोजन. या भोजनाचा दर्जा काय असतो हे कोणापासून लपून राहिलेले नाही. परिणामी अध्यर्पिक्षा अधिक विद्यार्थी त्या भोजनाकडे ढुंकूनही पाहत नाहीत. प्रत्यक्षात ही योजना नोकरशाही व संस्थाचालक यांच्या खाण्याचे कुरण बनली आहे.

महाराष्ट्रात 'अर्धे तुम्ही अर्धे आम्ही' अशी कुख्यात असलेली रोजगार हमी योजना राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा भीम पराक्रम याच सरकारचा! उच्च शिक्षणाच्या नावावर जे कुचकामी शिक्षण दिले जाते त्यासाठी नवी विद्यापीठे स्थापून भरमसाट पैसा खर्च करणारे हेच सरकार आहे. जागतिकीकरणाचे भलेमोठे कुंकू कपाळावर लावणाऱ्या मनमोहन सरकारने पे कमीशन नावाच्या जनतेच्या पैशावर राजरोसपणे दरोडा टाकणाऱ्या प्रकाराला कोणताही अटकाव केला नाही.सरकारांच्या अशा प्रकारच्या अनुत्पादक उधळपट्टीवर लगाम घालून हा पैसा शेती व उद्योगक्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक मूलभूत संरचना निर्माण करण्यावर खर्च व्हावा ही खरी तर जागतिकीकरणामागची कल्पना. भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या आणि अनुत्पादक कामावर पैशांची लयलूट असे जागतिकिकरणाच्या विसंगत वाटचाल या दोन वर्षांत मनमोहन सिंह सरकारने केल्याचे दिसून येते. एवढेच नाही तर उद्योग जगताला लक्षावधी कोटींची खिरापत कर सवलतीच्या रूपात वाटून जागतिकीकरणाचे विकृतीकरण केले आहे. जे उद्योगपती स्वत:साठी बंगला बांधायला कोटी रुपये उडवू शकतात त्यांच्या उद्योगांना सरकारकडून नुसत्या करसवलती नाही तर मोफत वीज, मोफत पाणी आणि मोफत जमीनसुद्धा आणि हे सगळे शेतकऱ्याला लुबाडून! आधीपासून उद्योगांना वाटण्यात येणाऱ्या खिरापती कायम ठेवून जागतिकीकरणाचे सर्व लाभही त्या उद्योगांना मिळत राहतील याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष देणारे मनमोहन सरकार शेतकऱ्याला जागतिकीकरणाचा लाभ होऊ नये यासाठी गेल्या दोनवर्षांत युद्ध पातळीवर प्रयत्नशील होते ही मनमोहन सरकारच्या दोन वर्षांच्या कामागिरीची खरी ओळख आहे! कांद्याला देशांतर्गत बाजारपेठेत भाव मिळायला लागला की आयात करून कांद्याचे भाव पाडणारे हेच सरकार आहे. कापसाला जागतिक बाजारपेठेत जास्त भाव मिळायला लागले, की निर्यातबंदी लादणारे हेच सरकार आहे. देशांतर्गत बाजारपेठेत साखरेचे भाव वाढू नयेत म्हणून जागतिक बाजारपेठेत जास्त भाव मिळत असतानाही साखरेची निर्यात होऊ न देणारे हेच सरकार आहे. मनमोहनसिंह सरकारने आपल्या दुसऱ्या कार्यकाळाची घेतलेली शपथ ही औपचारिकदृष्ट्या पद व गोपनियतेची असली तरी प्रत्यक्षात ती शेतकऱ्याला जागतिकीकरणाचा लाभ मिळू न देण्याची होती हे या सरकारच्या दोन वर्षांच्या कामगिरीने सिद्ध केले आहे.

### मनमोहनसिंह पंतप्रधानपदी कशासाठी?

मनमोहनसिंह यांच्या मागे पक्षात किंवा जनतेत संघटित पाठबळ नसल्याने ते गांधी घराण्याला आव्हान देऊ शकणार नाहीत हे जसे त्यांच्या पंतप्रधान म्हणून निवडीचे कारण होते तितकेच किंबहुना त्यापेक्षाही महत्त्वाचे कारण ते देशाला जागतिकीकरणाच्या दिशेने घेऊन जाणारा कुशल सारथी म्हणून त्यांची पंतप्रधानपदी निवड झाली होती. स्वच्छ चारित्र्याचा प्रामाणिक माणूस ही त्यांची प्रतिमा नोकरशहाला राजकीय नेता म्हणून स्वीकारण्यास मदतगार ठरली होती; पण गांधी घराण्याला आव्हान न देऊ शकणारे या गुणाव्यतिरिक्त त्यांचे इतर सर्व गुण या दोन वर्षांच्या काळाच्या कसोटीवर खरे उतरलेले नाहीत हे मान्य करावे लागेल. म्हणूनच मनमोहनसिंह यानी पंतप्रधान पदावर राहण्याचे कोणतेही औचित्य उरलेले नाही. भलेही ते भ्रष्टाचारात लिप्त नसतील; पण त्यांच्या कार्यकाळातील भ्रष्टाचाराच्या भानगडीतूनच अण्णा हजारे यांच्या उभ्या राहिलेल्या आंदोलनाने देशातील लोकशाही व लोकशाही संस्थांच्या विरोधात धोकादायक लाट निर्माण केली आहे, हे विसरून चालणार नाही. मनमोहनसिंह यानी पंतप्रधान पदावरून पायउतार व्हावे यासाठी यापेक्षा दुसरे कोणतेही सबळ आणि प्रबळ कारण असू शकत नाही.सर्वसामान्य भारतीय जनतेचे दोन वर्षांचे दु:स्वप्न संपविण्याचासुद्धा हाच मार्ग आहे.

**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# दोन चेहरे

सकाळी कृषिमंत्र्यांना जाग आली तेव्हा पहाटचे बरोबर पाच वाजलेले होते. रात्री झोपायला कितीही उशीर झाला तरी जाग सकाळी बरोबर पाच वाजता येणारच, ही शालेय जीवनापासून कृषिमंत्र्यांच्या अंगवळणी पडलेली सवय होती. अशा सवयी आजकाल दुर्मिळ झाल्यात. शालेय वयात कर्मवीरांच्या बोर्डींग स्कूलमध्ये राहून शिक्षण घेतल्याचा हा परिणाम. उठल्या नंतर जॉगींग मशीनवर मंत्रीमहोदयांनी अर्धा तास जॉगींग केले. शाळेत असताना दंड-बैठकाही ते काढायचे. आता वेळेअभावी व वयानुसार एवढा व्यायाम शक्य होत नाही. जॉगींग मात्र ते न विसरता करतात. त्याने पोटाचा घेर आणि वजन दोन्ही नियंत्रणात राहते. दिवसभर उत्साही वाटते. राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्वांत 'फिट' मंत्री हा त्यांचा लौकीक गेली कित्येक वर्षे त्यांनी सार्थ ठरविला होत. हा 'फिटनेस' केवळ शरीरप्रकृतीपुरताच नव्हता. राजकीय संदर्भातही होता. प्रयत्न करूनही गेल्या पाच निवडणुकांत त्यांना कुणी पराभूत करू शकले नव्हते, कारण मतदारसंघातील आपल्या सर्व गावपातळीवरील मंत्रीमहोदयांनी आपली पाळेमुळे आपले कार्यकर्ते, सहकारी संस्था इत्यादींद्वारे घट्ट रुजवलेली होती. हे दिल्लीतील त्यांच्या पक्षश्रेष्ठींनाही माहिति होते. पुढेमागे ते या राज्याचे मुख्यमंत्री निश्चित होणार अशी भाकिते सर्वच राजकीय विश्लेषक, पत्रकार करीत होते. त्याची अर्थातच कृषीमंत्र्यांना पर्वा नव्हती. मतदारसंघातील आपली पाळेमुळे ढिली होता कामा नयेत याची पुरेपूर दक्षता ते सातत्याने घेत होते. त्यामुळे सकाळच्या व्यायामानंतरचा त्यांचा कार्यक्रम म्हणजे मतदारसंघातील आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांशी अर्धापाऊणतास मोबाईलद्वारे संपर्क साधून, तिकडची माहिति घेणे आणि कार्यकर्त्यांना आवश्यक ते निर्देश देणे. एवढी दोन कामे ते सुर्योदयापूर्वी करीत. त्याच्यानंतर मग 'रूटीन' सुरू होई. त्यांचा सचिव

**एकूण अहमदाबादेतील ही बैठक सर्वांचेच 'चांगभलं' करणारी होती. बिचाऱ्या शेतकऱ्याच्या खिशातून मात्र यंदा पाकिटामागे दोनशे रुपये अधिक जाणार होते; पण ते कसे योग्य आहे इत्यादी त्यांच्या गळी उतरविण्याचीही एक कम्युनिकेशन योजनाही तयार होती. त्यासाठी निवडक प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे, सरकारच्या या निर्णयाचे समर्थन कशी करतील त्याचेही फिक्सींग महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांनी मोठ्या खुबीने अगोदरच करून ठेवलेले होते.**

बंगल्यावर येई. पेपरात काय छापून आलय याचं 'ब्रिफिंग' ते त्यांचे एक जुने स्नेही जे पत्रकारिता विषयाचे प्राध्यापक होते त्यांच्याकडून घेत. चहाही त्यांच्याचसोबत होई. एकूण एक अत्यंत 'प्रोफेशनल' आणि स्मार्ट जीवनशैली त्यांनी अंगिकारल्यामुळे राज्याच्या राजकारणात नव्हे, तर देशपातळीवरील राजकारणातही दिल्लीतील श्रेष्ठी त्यांच्याशी जवळीक साधून असत.

काही दिवसांपूर्वीचा दिल्लीतील श्रेष्ठींचा निरोप त्यांना आठवला. श्रेष्ठी मानसिंगरावांची चौकशी करीत होते. मानसिंगराव गेल्या विसर्जित मंत्रिमंडळाचे सदस्य होते; परंतु त्यांची राजकीय वाटचाल विरोधी पक्षात सुरू झालेली होती. त्यांची वैचारिक बैठकही वेगळी होती; परंतु मानसिंगराव हा 'लंबी रेसका घोडा' आहे हे पक्षश्रेष्ठींनी ओळखले होते. येत्या निवडणुकीतही त्यांनाच तिकीट द्यायचे असे बहुधा पक्षश्रेष्ठींच्या मनात असावे हे कृषिमंत्र्यांनी लगेच ओळखले होते; परंतु गेले काही महिने मानसिंगराव काहीसे 'पॅसिव्ह' वाटत होते. त्यांना 'ॲक्टिव्ह' करण्याचा तो श्रेष्ठींचा निरोप होता. अनुभवी कृषिमंत्र्यांनी हा इशारा ओळखून मानसिंगरावांना ॲक्टीव्ह करण्यासाठी तुमच्या मतदारसंघात कृषिप्रदर्शन आयोजित करा असे सुचविले होते. या सुचनेचा अर्थ मानसिंगरावांनी उमजला होता. हेलिकॉप्टरचा इंतजाम कोरे सचिवाने करून ठेवला होता. शिवाय त्यानंतर लगेच अहमदाबादेत सभोवतीच्या चार राज्यांच्या कृषिमंत्र्यांच्या बैठकीसही त्यांना हजर राहायचे होते. कार्यक्रमाची नियोजित वेळ अकराची होती. ती केव्हाच टळून गेली होती. कृषिप्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी येणारे कृषिमंत्री अजूनही कार्यक्रमस्थळी पोचले नव्हते. अर्थात मंत्र्यांचे कार्यक्रम म्हटले, की विलंब ठरलेलाच. त्याची आता लोकांनाही सवय झालेली आहे. त्यामुळे अकराचा कार्यक्रम बाराला सुरू होणार या अपेक्षेनेच लोक त्याप्रमाणे जमत होते; पण साडेबारा वाजले तरी मंत्र्यांचा अजून पत्ता



सुधीर सेवेकर

नव्हता. 'मंत्रिमहोदय थोड्याच वेळात सभास्थानी पोचत आहेत. सर्वांनी कृपया बसून घ्यावं.' कार्यक्रमाच्या संचलनाची जबाबदारी सांभाळणाऱ्या प्रा. दिपीकाबाई वारंवार माईकरून उद्घोषणा करीत होत्या. ऊन वाढत चालले होते. अनेकदा तीच तीच घोषणा करून दिपीकाबाई कंटाळल्या होत्या. दर घोषणेनंतर 'बिसलेरी'चे एक घोट पाणी त्यांना घ्यावे लागत होते, एवढा उकाडा वाढलेला होता. ऐन उन्हाळ्यात कृषिप्रदर्शन आयोजित करण्यामागे मानसिंगराव पाटील यांचा एक सार्वजनिक उद्देश होता; परंतु त्या पाठीमागे त्यांचा एक अंतस्थ राजकीय महत्त्वाकांक्षेचाही हेतू होता. मानसिंगराव त्या मतदारसंघाच माजी खासदार होते. एक तडफदार, आक्रमक आणि तरुण खासदार म्हणून त्यांनी आपल्या कारकीर्दीत नावलौकीक मिळविलेला होता. व्यवसायाने वकील असलेल्या मानसिंगरावांना नव्यानेच स्थापन झालेल्या राज्यस्तरीय पक्षाने उमेदवारी दिली आणि आपल्या युवावर्गातील कार्यकर्त्यांच्या बळावर व स्वतःच्या तडफदार व्यक्तिमत्त्व व घणाघाती वक्तृत्वकौशल्याने त्यांनी सारा मतदारसंघ पिंजून काढला. जनसामान्यांना एकत्र केले. विशेषतः 'ओबीसी' गटात मोडणाऱ्या विविध जाती-जमातीतील छोट्यामोठ्या कार्यकर्त्यांना मानसिंगरावांनी एकत्र केले होते. 'गेली कित्येक दशके सत्तेत असणारा पक्ष आज केवळ धनदांडग्यांचा, भांडवलदारांचा आणि घराणेशाही चालविणाऱ्यांचा पक्ष झालेला आहे. त्या पक्षात आपल्याला कधीच स्थान मिळणार नाही. आपण सत्तेने माजलेल्या या धनदांडग्या भ्रष्ट पक्षाला छेद दिला पाहिजे. तव्यावरची भाकरी वेळेवर जर उलटली नाही तर भाकरी जळते, भाकरी उलटण्याची वेळ आता आली आहे. तेव्हा जनसामान्यांचे प्रतिनिधित्व खऱ्याखुऱ्या पद्धतीने करणाऱ्या आमच्यासारख्या उमेदवाराला संसदेत पाठवा. आयाबहिणींनो भाकरी करपू द्यायची नसेल तर ती उलटली पाहिजे. तसेच राजकारणाचे आहे. तेव्हा यावेळी तुम्ही ती उलटलीच पाहिजे.

या भाषेत मानसिंगराव आणि त्यांचे कार्यकर्ते जीव तोडून प्रचार करीत होते. सत्ताधारी पक्षाने मानसिंगरावांच्या खच्चीकरणासाठी सर्वप्रकारचे प्रयत्न केले. साम-दाम-दंड-भेद; पण मानसिंगराव या सगळ्यांना पुरून उरले. नुसते उरलेच नाहीत तर भरघोस मताने निवडून आले. सर्वसामान्य आर्थिक स्थितीतला एक तरुण, त्याच्या सारख्याच स्तरातील कार्यकर्ते आणि मतदारांच्या पाठिंब्यामुळे दिल्लीत पोचला. दिल्लीतला सत्ताधारी पक्ष या विजयाने स्तिमित झाला. पैसा, जात-पात, आमिषे यांची बरसात करूनही सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराने निवडणुकीत सपाटून अपयशाचा मार खाल्ला. सत्ताधारी पक्षाच्या श्रेष्ठींना मानसिंगरावांची गुणवैशिष्ट्ये, नेतृत्वगुण ध्यानात यायला वेळ लागला नाही. त्यांना आपल्या पक्षात सामील करून घेतले नाही, तर त्या मतदारसंघात मानसिंगरावांना टक्कर देईल असा उमेदवार आपल्याजवळ नाही हेही त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी 'आमच्या पक्षात या तुम्हाला मंत्री करतो!' या आमिषाचे जाळे मानसिंगरावांवर टाकले. तरुण, तडफदार, महत्त्वाकांक्षी मानसिंगराव त्या जाळ्यात बरोबर फसले. कारण त्यांच्या पक्षाचे सरकार संख्याबळाअभावी सत्तेत येणे दुरापास्तच होते. मानसिंगरावांकडे सत्तेची खुर्ची नाही. खासदारकी नाही. ज्या पक्षाने त्यांना तिकीट देऊन निवडून आणले, तो पक्ष त्यांनी सत्तेच्या हव्यासापाई सोडलेला आहे. ज्या पक्षात ते गेले, तिथेही त्यांना आता कुणी विचारीत नाही. 'ना घर का ना घाट का' अशी त्यांची आज स्थिती झालेलीआहे. त्यांना आता त्यांचे नाणे पुन्हा एकदा खणखणीतपणे वाजवून दाखवायची, आपली लोकप्रियता आजामावून पाहण्याची वेळ आलेली आहे. ती लोकप्रियता श्रेष्ठींना पटली तरच त्यांना आगामी निवडणुकीत तिकीट मिळेल. अन्यथा ते बाजूला फेकले जाणार. एवढे कळण्याइतके मानसिंगराव हुशार होतेच. म्हणून त्यांनी स्वतःच्या शक्तीप्रदर्शनाचे एक माध्यम म्हणून या कृषिप्रदर्शनाचा घाट घातला. उन्हाळ्यात शेतीत फारशी कामे नसतात. शेतकरी मोकळा असतो म्हणून उन्हाळ्यात प्रदर्शन भरविले तर त्याचा त्याला उपयोग होईल. त्याच्या ज्ञानात भर पडेल. नवी उत्पादने, नवी कृषितंत्रे, नवी कृषि अवजारे इत्यादींची त्याला माहिती होईल. मानसिंगरावांनी त्यांच्या शिक्षणसंस्थेतील सगळी मंडळी कामाला लावली. दिसायला सुंदर आणि लाघवी निवेदन शैली असलेल्या दिपीकाबाईंकडे निवेदनाची, रेडिओ आणि स्थानिक टीव्ही चॅनेलवरून जाहिरात करण्याची जबाबदारी दिली. प्रत्येक प्राध्यापक, विद्यार्थी यांना त्यांच्या त्यांच्या गावाकडे प्रदर्शनाचा प्रचार-प्रसार करण्याचे काम दिले. साऱ्या स्थानिक पत्रकारांना एक शानदार 'पार्टी' देऊन वृत्तपत्रातून बातम्या-जाहिराती-लेख यांचा मारा सुरू केला. मतदारसंघातील कृषिसाहित्याचे ठळक विक्रेत्यांना हाताशी धरून ते विकत असलेल्या कृषिसाहित्याच्या कंपन्यांवर प्रदर्शनात 'स्टॉल' घेण्याच दबाव आणला. शेकडो 'स्टॉल्स'चे बुकिंग झाले. मतदारसंघातील ग्रामपंचायतींचे सरपंचांची बैठक घेतली, कृषिविद्यापीठवाल्यांना सामील करून घेतले. एकूण हे कृषिप्रदर्शन म्हणजे त्यांच्या लोकप्रियतेची, त्यांच्या शक्तीची, त्यांच्या संभाव्य उमेदवारीची एक चाचणी परीक्षाच होती. त्या परीक्षेची उत्तम तयारी मानसिंगरावांनी केली. राज्याचे कृषिमंत्री जे मानसिंगरावांचे जवळचे मित्र होते, ते आज कृषिप्रदर्शनाचे उद्घाटन करणार होते. शहरभर आणि मंत्री ज्या मार्गाने येणार त्या मार्गावर फ्लेक्स बॅनर्स आणि स्वागताच्या कमानी जागोजाग उभ्या केल्या होत्या. कृषिमंत्र्यांना एकदा का आपल्या राजकीय आणि संघटकीय कौशल्याची खात्री पटली तर ते दिल्लीतील श्रेष्ठींजवळ मानसिंगरावांना तिकीट देण्याची वकिली करणार हे ठरले होते.

पंचक्रोशीतून गाड्या भरभरून आणलेले शेतकरी प्रदर्शनाच्या मैदानावर जमले होते. अनेक जातीजमातींच्या महिला मोठ्या उत्साहाने आपल्या पारंपरिक पोशाखात सभास्थानी आल्या होत्या; परंतु एवढ्या मोठ्या संख्येने आलेल्या शेतकऱ्यांसाठी केलेली पाण्याची व्यवस्था कमालीची अपुरी पडली. चहानाश्ता आणि बिसलेरीचे बाटलीबंद पाणी विकणाऱ्या व्यापाऱ्यांना हॉटेले, दुकानदारांसाठी प्रस्तूत प्रदर्शन ही मोठीच पर्वणी ठरली होती. खेड्यात दाराशी आलेल्या वाटसरूला गुळपाणी देणारा शेतकरी या प्रदर्शनस्थळी मात्र घोटभर पाण्यासाठी मोताद झाला होता. पंधरा रुपयाला एक लिटर पाण्याची बाटली हा व्यवहार त्यांच्या आकलनाबाहेरचा होता. खिशाला न परवडणारा होता; पण बिचारा करतो काय? तहानलेला पंधरा रुपये देऊन बाटलीबंद पाणी घेत होता. दुकानदारांचे त्यात चांगलेच फावले.

'मंत्रीमहोदय आणि आपले सन्माननीय पाहुणे थोड्याच वेळात सभास्थानी पोचत आहेत. शेतकरी, बंधुभगीनींनी कृपया स्थानापन्न व्हावं.' दीपिकाबाई त्यांचे उद्घोषणेचे काम पार पाडत होत्या. खास

उद्घाटनसोहळ्यासाठी बोलावलेले वाजंत्रीवाले, बॅण्डवालेही गाणे वाजवून वाजवून कंटाळून गेले होते. सर्वांत पंचाईत झाली होती ती महिलावर्गाची. प्रदर्शनाची सजावट, थाटमाट, आकर्षक कमानी, पोस्टर्स, बॅनर्स यांवर लाखो रुपये खर्च करणाऱ्या आयोजकांनी महिलांच्या स्वच्छतागृहाची पुरेशी व्यवस्था कार्यक्रमस्थळी केलेली नव्हती. त्यापाई सगळ्या आयाबहिणी अवघडून गेल्या होत्या.

'मंत्रीमहोदय सभास्थळी पोचत आहेत आणि कार्यक्रमानंतर ते लगेच शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेतील. ज्यांना निवेदने, अर्ज द्यायचे आहेत, त्यांनी ते लेखी रुपात तयार ठेवावेत.' दीपिकाबाईंनी घोषणा केली आणि थोड्याच वेळात आकाशात मंत्रीमहोदयांचे हेलीकॉप्टर दिसू लागले. मरगळलेल्या, कंटाळलेल्या गर्दीत उत्साह संचारला. हेलीकॉप्टरसाठी सभास्थानापासून जवळच्याच शिवारात तात्पुरते हेलीपॅड तयार केले होते. तिथे हेलिकॉप्टरमधून उतरून मंत्रीमहोदय ढोलताशा, लेझिमपथकाच्या घोषात मिरवणुकीने सभास्थानी पोचणार होते. सजवलेल्या बैलगाडीत उभे राहून जनतेला अभिवादन करीत मंचावर येणार होते. दीपिकाबाईंनी त्याप्रमाणे उद्घोषणा करून लोकांना कल्पना दिली. हेलीपॅडवर जमलेले ढोलताशावाले, झांजापथक, लेझिमपथक सगळे उठून उभे राहिले. धुराळा उडवित हेलिकॉप्टर जमिनीवर उतरले. ठरल्याप्रमाणे झांज, ढोलताशे वाजू लागले. पुढे होऊन तत्परतेने मानसिंगरावांनी हेलिकॉप्टरमधून उतरलेल्या मंत्रीमहोदयांचे भलामोठा हार गळ्यात घालून स्वागत केले. फोटोग्राफर्स, मीडियावाले यांच्या कॅमेऱ्यांचे फ्लॅश उडाले. मंत्री व मानसिंगरावांनी परस्परांना आलिंगन दिले. तेही कॅमेऱ्यात कैद करण्यात आले. त्याचवेळी मंत्रीमहोदय मानसिंगरावांच्या कानात काय कुजबुजले माहीत नाही; परंतु मानसिंगराव आणि मंत्री बाजूच्याच एका मोटारगाडीत बसले आणि पोलिस एस्कॉर्ट जीप पाठोपाठ दोन मिनिटात सभास्थानी पोहोचले. मिरवणूक, उद्घाटनाची फित कापणे, बैलगाडीतून वाजत गाजत प्रदर्शनाची पाहणी हे सगळेच कॅन्सल झाले आणि थेट मंचावर मंत्रीमहोदय येऊन पोहोचले.

हे मानसिंगरावांसह सगळ्यांनाच अनपेक्षित होते. दिपीकाबाईंची तर एकच तारांबळ उडाली. मंत्रीमहोदयांनी स्वागताचा म्हणून केवळ एकच प्रातिनिधीक हार मानसिंगरावांच्या हस्ते स्वीकारला आणि पूर्वनियोजित कार्यक्रमपत्रिकेला बाजूला सारत दीपिकाबाईंना त्यांचे प्रास्तविक पूर्णही करू न देता मंत्रीमहोदयांनी थेट माईकचाच ताबा घेतला.

'उशिरा आल्याबद्दल सर्वप्रथम मी अंत:करणापासून दिलगिरी व्यक्त करतो. तुम्ही बराच वेळापासून माझी वाट पाहत आहात. जगाच्या पोशिंद्याला असे ताटकळत ठेवण्यात पातक माझ्या हातून आज घडले आहे आणि त्याची आपण द्याल ती शिक्षा मला मंजूर आहे.' मंत्रीमहोदयांचे असे थेट सुरू झालेल्या भाषणामुळे अवाक् झालेल्या गर्दीसाठी मंत्रीमहोदयांचे हे उद्गार आणखीनच आवाक् करणारे ठरले. भाबड्या जनतेने त्यांचे झालेले हाल, गैरसोय आणि उन्हाचा त्रास हे सगळे विसरून मनापासून जोरदार टाळ्या वाजवल्या. मंत्रीमहोदय गालातल्या गालात हसले. त्यांनी मानसिंगरावांकडे एक नजर टाकली. मानसिंगरावही टाळ्या वाजवित होते. कारण गर्दीची नाराजी मंत्र्यांनी मोठ्या चतुराईने केवळ दोन चमकदार वाक्याने दूर केली होती. सभा आता आपल्या काबूत आली आहे हे अनुभवी मंत्र्यांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यांनी पुढं बोलायला सुरुवात केली :

'बंधूंनो सध्याचं युग हे ज्ञानाधिष्ठीत शतीचं आहे. परंपरागत शेतीतून भागत नाही. शेतीचा खर्च आणि मिळणारं उत्पन्न यांची तोंडमिळवणी करणं अवघड झालं आहे याची कृषिमंत्री या नात्यानं मला नक्कीच कल्पना आहे; परंतु नव्या तंत्रज्ञानाची कास धरली तर भारत जगाची 'फुडबास्केट' बनण्याची क्षमता असणारा जगातला एकमेव देश आहे, एका दाण्याचे शंभर दाणे करण्याची किमया केवळ तुमचे कष्ट आणि ही काळी आईच करू शकते!'

गर्दीने पुन्हा एकदा भाबडेपणाने उत्स्फुर्तपणे टाळ्या वाजवल्या. लोकांना आपलय वक्तृत्वाने आपण प्रभावित केले आहे, याची मंत्रीमहोदयांना खात्री पटली. मानसिंगरावांकडे माहेरा वळवित त्यांनी आपले भाषण आणखीनच जोषात पुढे चालू ठेवले : 'शेतीतील नवे तंत्र, नवे मंत्र शिकण्याची, पाहण्याची संधी आज मानसिंगरावांनी तुम्हाला उपलब्ध करून दिलेली आहे. तिचा पुरेपूर फायदा घ्या. मानसिंगरावांसारखे तरुण, तडफदार नेतृत्व तुमच्या भागाला मिळाले आहे, त्या नेतृत्वाचे हात बळकट करा. त्याचा योग्य उपयोग करून घ्या.

हे उद्गार मानसिंगरावांना सुखाऊन गेले. कारण घाबरू नका, मी तुमच्या पाठीशी आहे. तिकीटे तुम्हालाच देऊ हाच 'मेसेज' या उद्गारातून त्यांनी दिलेला आहे, हे मानसिंगरावांनी बरोबर ओळखले. तेवढी राजकीय समज त्यांच्याजवळ नक्कीच होती. त्यावर मानसिंगरावांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. त्यांनी वाजविल्या म्हणून मग साऱ्या सभेनेही वाजवल्या. 'ज्ञानवर्धन करणाऱ्या आणि शेतीवरील विश्वास जागवणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन इथे झाले आहे असे मी औपचारिकपणे घोषीत करतो!'

या त्यांच्या उद्गारांवर टाळ्यांचा कडकडाट आणखीनच वाढला. नंतर व्यासपीठावर बसलेल्या कृषिविद्यापीठाच्या कुलगुरुंकडे एक दृष्टीक्षेप टाकत मंत्रीमहोदय बोलू लागले.

'आज कुलगुरुसाहेब आणि त्यांच्या विद्यापीठातील अनेक तज्ज्ञ शास्त्र इथे उपलब्ध आहेत. माझी कुलगुरुंना अशी विनंती आहे, की त्यांनी आपल्या भागाचे प्रश्न विचारात घेऊन संशोधन कार्य केले पाहिजे. आपल्या संस्कृतीत आईवडिलांना गुरुचे स्थान असते असे म्हटले आहे. तेव्हा कुलगुरुसाहेब तुम्हीच या शेतकऱ्यांची माऊली आहात, असे संशोधन करा, की एकाही शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची पाळी आली नाही पाहिजे!' त्यांच्या या उद्गारांनी कुलगुरुंना काय प्रतिसाद द्यावा ते उमजेना ते कसेनुसे हसले; परंतु जमलेली जनता मात्र उत्स्फुर्तपणे टाळ्या वाजवत राहिली.

'मंडळी शेतीप्रश्नाबाबत आपल्या शेजारच्या राज्यांच्या कृषिमंत्र्यांसोबत माझी एक लगेच बैठक अहमदाबादला आहे. तिथेही आम्ही सगळे मिळून याचेच प्लॅनिंग करणार आहोत, की शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधी सगळे वाजवी दरात आणि वेळेवर उपलब्ध कसे करून देता येईल. त्यामुळे मला आपली रजा घेतली पाहिजे. बळीराजाचे भले होवो अशी ईश्वरचरणी मी प्रार्थना करतो. आपली रजा घेतो. जयहिंद-जय महाराष्ट्र!' असे जोरकसपणे भाषण करून मंत्रीमहोदय लगेच मंचावरून खाली उतरले. पोलिसांनी तत्परतेने त्यांना

त्यांच्या मोटारीत बसवले. पाठोपाठ मानसिंगरावही मोटारीत बसले आणि मोटार हेलीपॅडकडे निघाली. सभेसाठी आलेले हजारो लोक, ज्यामध्ये कृषिमंत्र्यांना भेटाण्यास आणि आपापली निवेदने देण्यास उत्सुक असणारे शेकडो लोक होते, त्या कुणाच्या काही ध्यानात यायच्या आत गाड्या हेलिपॅडवर पोचल्यादेखील. मानसिंगरावांशी कानगोष्टी करून कृषिमंत्री हेलिकॉप्टरमध्ये बसलेही.

इकडे सभास्थळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. लोक उठून पांगू लागले. त्यावर 'कृपया बसून घ्या. कृषिविद्यापीठाच्या कुलगुरुंचे आज भाषण होणार आहे.' अशा घोषणा दीपिकाबाई माईकवरून करीत होत्या. कार्यकर्तेही लोकांना 'बसून घ्या, बसून घ्या' म्हणत होते; पण कुणीच कोणाचे काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. काही क्षणांपूर्वी मंत्रीमहोदयांना भाषणाला टाळ्या वाजवणारी पब्लिक त्यांच्या अशा अवघ्या काही मिनिटांत निघून जाण्यामुळे परेशान झाली होती. खट्टू झाली होती. मंत्रीमहोदयांचे हेलिकॉप्टर आकाशात उडाले. मानसिंगरावांच्या चेहऱ्यावर 'जिंकलो एकदाचे' अशा प्रकारचे भाव दिसत होते. सभास्थानी ते परतले आणि त्यांनी भाषण सुरू केले; परंतु त्या भाषणात ना त्यांचे लक्ष होते, ना जनतेचे. एकूण उद्घाटन सोहळा हा असा 'पार' पडला. तिकडे अहमदाबादेच्या विमानतळावर बियाणे उद्योग संघटनेचे अध्यक्ष आणि एका बड्या बियाणे कंपनीचे मालक श्री सुब्बाराव, खते-औषधी उत्पादक संघटनांचे पदाधिकारी इत्यादी मंडळी महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांच्या स्वागतासाठी आता मोठा हार आणि वातानुकूलित गाड्यांचा ताफा घेऊन वाटच पाहत होता. कारण शेजारच्या आंध्र, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, या राज्यांचे मंत्री काल रात्रीच डेरेदाखल झाली होती. त्यांच्या ऐषेआरामाची उत्तम बडदास्त ठेवली गेली होती. महाराष्ट्रासारख्या एका मोठ्या राज्याचे कृषिमंत्री येऊन पोचले, की पंचतारांकित हॉटेलात बैठक आणि मेजवानी ठरली होती.

महाराष्ट्राचे कृषिमंत्री अहमदाबाद विमानतळावर उतरले. पुन्हा स्वागत, मीडियाचे फ्लॅशेस, भलेमोठे हारतुरे इत्यादी पार पडले. मोठ्या चपळाईने कृषिमंत्र्यांच्या इशाऱ्यानुसार सुब्बाराव साहेब कृषिमंत्र्यांच्या गाडीत बसले. गाड्या पंचतारांकित हॉटेलकडे निघाले.

'हाऊ आर यू मिस्टर सुब्बाराव?'

सुब्बाराव साहेबांनी इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषा येत नाहीत. मोडकेतोडके हिंदी येते हे ओळखून कृषिमंत्र्यांनी इंग्रजीत संभाषण सुरू केले.

'आय ॲम फाईन सर?' सुब्बाराव उत्तरले.

'एव्हरीबडी हॅज कम?' कृषिमंत्री.

'याऽ, सर... इनफॅक्ट दे आर वेटिंग फॉर यू सर!'

सुब्बारावांनी विनम्रतेने उत्तर दिले आणि काल रात्रीच्या मेजवानीत सगळी चर्चा झालीय. सर्वांची सहमती आहे; पण गुजरातचे कृषिमंत्री हसमुखभाई मात्र अजून ऐकत नाहीत. ही माहिती सुब्बारावांनी कृषिमंत्र्यांना सांगितली.

हीज डिमांड इज अनरिझनेबल सर! अशी शेवटी पुस्तीही जोडली.

'डोण्ट वरी आय विल टॉक हसमुखभाई! अरे, हमारी पार्टी है, परंतु नोट किसे नही चाहिये? यू ॲग्री टू हसमुखभाईज डिमांड!' कृषिमंत्र्यांनी सुब्बारावांना दोन ओळीत आपला सल्ला दिला.

'बट सर...' सुब्बारावांनी बोलीण्याचा प्रयत्न केला.

'नाऊ, नो बट!' कृषिमंत्र्यांनी सुब्बारावांना गप्प केले.

गाड्या पंचतारांकित हॉटेलात पोचल्या. वातानुकूलित कॉन्फरन्स रूममध्ये सगळे जमलेलेच होते. महाराष्ट्राचे कृषिमंत्री तिथे पोचताच सगळ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

'कमे छो हसमुखभाई?' असे गुजराथी भाषेत बोलत महाराष्ट्राचे कृषिमंत्री थेट हसमुखभाईंच्या शेजारच्या सोफ्यात जाऊन बसले. इकडे सुब्बाराव साहेबांनी स्वागताची औपचारिकता पूर्ण केली आणि ते आपल्या पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनकडे वळले. कोटाला कॉलर माईक लावला आणि स्लाईड्स दाखवायला सुरुवात केली.

नव्या तंत्रज्ञानामुळे कपाशी उत्पादनात कशी वाढ झालीय. यंदा कपाशीला सात हजारापर्यंत बाजारभाव मिळतोय, त्यामुळे शेतकरी वर्ग कसा खुश आहे इ. इ. त्यांनी आकडेवारी व छायाचित्रांसह पडद्यावर दाखवायला सुरुवात केली. त्यांच्या त्या अस्खलीत हायफाय इंग्रजी 'प्रेझेंटेशन'कडे कुणाचेच लक्ष नव्हते.

महाराष्ट्राचे कृषिमंत्री हसमुखभाईंशी कानगोष्टी करीत होते. त्या गोष्टी संपल्या तशा हाताच्या खुणेने महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांनी सुब्बारावसाहेबांना थांबण्याचा इशारा केला. तसे वीज गेल्याने माईक बंद व्हावा तसे सुब्बारावसाहेब बोलायचे थांबले.

'सुब्बाराव, प्लीज कम टू द पॉईंट! तुमचे काय म्हणणे आहे? आपको क्या मंगता है?'

महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांनी सरळ सवाल केला आणि अन्य राज्यांच्या कृषिमंत्र्यांकडे नजर टाकली. या थेट सवालामुळे अन्य राज्याचे कृषिमंत्री खुश झालेले दिसले. कारण उगाच लंबीचौडी भाषणे ऐकणे, चर्चा करणे त्यांनाही पसंत नव्हते. कधी एकदा मीटिंग संपते आणि आपण शॅम्पेनचा आस्वाद घेतो, असे त्यांना झाले होते. शिवाय ज्याला त्याला आपापल्या राज्यात परतण्याची घाईही झाली होती.

'सर, वुई वॉण्ट ए हाईक ऑफ थ्री हंड्रेड रूपीज पर पॅकेट ऑफ सीड!' सुब्बाराव साहेबांनी कपाशी बियाणे पाकीटाच्या विक्री किंमतीत तीनशे रुपयांची वाढ करावी अशी आपली मागणी निःसंदिग्धपणे सर्वांसमोर ठेवली. काही क्षण निस्तब्धतेत गेले. कुणीच काही बोलेना. त्यावर पुन्हा एकदा पुढाकार घेत महाराष्ट्राचे कृषिमंत्री बोलू लागले. 'नॉट पॉसिबल! सुब्बारावसाहेब इतना हाईक हम दे नहीं सकते. अरे, हमे भी तो किसानों को जवाब देना पडता है. एकदम तीनशेची वाढ कशी देणार? प्रतिपॅकेट दोनशेची वाढ आम्ही पाची राज्यांचे कृषिमंत्री तुम्हाला देऊ. त्या बदल्यात तुम्ही काय करायचे ते तुम्हाला हसमुखभाईंनी सांगितलेलेच आहे. दॅट यु मस्ट फॉलो फर्स्ट.' महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांनी निर्णय सांगितला. त्याला अन्य चार राज्यांच्या कृषिमंत्र्यांनी माना डोलावल्या.

'बट सर...' सुब्बारावांनी बोलण्याचा प्रयत्न केला खरा; पण त्यांना थांबविले गेले. 'नाऊ चिअर्स...' महाराष्ट्राचे कृषिमंत्री म्हणाले आणि हॉटेलच्या स्टाफने तत्परतेने गारेगार शॅम्पेन सर्व्ह करायला सुरुवात केली.

**पान २८ पाहा**

मधोमध

# राष्ट्र'वादी'




दत्ता जोशी
media.care.abd@gmail.com











**दादर रेल्वे स्थानकाचे नामांतर करण्याचा वाद पुन्हा एकदा उकरून काढून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सामाजिक स्वास्थ्य बिघडविण्याची नवी घृणास्पद खेळी खेळली आहे. वैयक्तिक किंवा पक्षीय स्वार्थासाठी समाजहिताचा बळी देण्याची ही त्यांची प्रवृत्ती इंग्रजांपेक्षाही घातक ठरणारी आहे. 'डिव्हाईड अँड रुल'चा वापर इंग्रजांनी भारतात हिंदू-मुस्लिमांमध्ये दुही माजवण्यासाठी केला आणि त्या बळावर आपले सत्तास्थान बळकट ठेवले. पवारांची 'राष्ट्रवादी' याच पद्धतीने दलित आणि दलितेतरांमध्ये पुन्हा एकदा आग लावण्याचा प्रयत्न करून त्या आधारावर स्वतःच्या सत्तेची पोळी भाजण्याच्या प्रयत्नात आहे. ही 'राष्ट्रवादी' की 'राष्ट्रभेदी' असा प्रश्न पडावा, अशी ही स्थिती आहे. त्यांची ही खेळी समजावून घेऊन त्याकडे संपूर्ण समाजानेच सध्या सोयिस्कर दुर्लक्ष करणे आणि मतपेटीतून या प्रवृत्तीला कायमची मुठमाती देणे ही काळाची खरी गरज आहे...**

दिनांक १३ जानेवारी १९९४ च्या सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा करण्यात येत असल्याची घोषणा केली आणि मराठवाड्यासह साऱ्या महाराष्ट्रातील समंजस समाजाने नामविस्ताराचा हा 'तिळगुळ' आनंदाने स्वीकारला. शहिद गौतम वाघमारे यांच्या बलिदानानंतर दलित समाजाने राज्यभर केलेल्या कायदेशीर उठावानंतर अनेक वर्षांचा हा प्रश्न अखेर निर्णयाप्रति आला. याचे सारे श्रेय श्री. पवार यांनी उपटले. प्रत्यक्षात, दलित समाजाने सुमारे दोन दशके चालविलेल्या अविरत संघर्षाचे हे फलित होते. यासाठी या समाजाने अनन्वित अत्याचार सहन केले होते, अनेकांच्या सर्वास्वाची होळी झाली होती. एकेकाळी समाजाच्या अनेक स्तरांतून प्रखर विरोध असलेला हा मुद्दा हळूहळू निवत गेला आणि अखेरच्या टप्प्यात विविध सामाजिक संघटनांनी मराठवाड्याच्या गावांगावांतून संवादपथके पाठवून डॉ. बाबासाहेबांच्या प्रति समाजाच्या सर्व स्तरांमध्ये अभिमान जागविण्याचे काम केले. प्रसंगी अनेक ठिकाणी या कार्यकर्त्यांवर हल्लेही झाले. तरीही त्यांनी नेटाने हे काम सुरू ठेवले. सामाजिक अभिसरणात या पथकांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली. आधी दलित समाजावर आणि नंतर या पथकांवर हल्ले करणारे कोण होते? कोणत्या समाजाचे होते? ते कोणत्या पक्षाशी व कोणत्या नेत्यांशी संबंधित होते हे सारे उघड आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचा नामविस्तार हा या एकत्रित प्रयत्नांचे फलित होते. याचे 'क्रेडिट' स्वतःच्या खात्यावर जमा करून समाजाचे लक्ष महत्वाच्या मुद्द्यावरून वळविण्याचा हा श्री. पवार यांचा डाव होता. हा डाव ते यशस्वीपणे खेळले पण निवडणुकीत त्यांना त्याचा लाभ समाजाने त्यांच्या पदरात टाकला नाही. निवडणुकीत ते हरले आणि युतीची सत्ता आली. पण सत्तेचे कुलुप युतीचे असले, तरी त्याच्या चाव्या मात्र पवार गटाकडेच होत्या. युतीला पाठिंबा देणारे सर्वच्या सर्व 'अपक्ष' आमदार पुढे 'राष्ट्रवादी'तच गेले!

या कालखंडातील काही घटना आपण पाहू या. १९९४ च्या जानेवारीमध्ये नामविस्ताराचा निर्णय जाहिर झाला. त्या आधी वर्षभरच मुंबईत बॉम्बस्फोट मालिका झाली होती. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात त्यामुळे संतापाची लाट

# की राष्ट्र'भेदी' ?






उठलेली होती. मुख्यमंत्रीपदी असलेल्या श्री. सुधाकरराव नाईक यांना पायउतार व्हावे लागले होते आणि त्यांच्या जागी श्री. शरद पवार यांना नेमण्यात आले. श्री. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर काँग्रेसमध्ये आलेली निर्नायकी अवस्था, श्री. पी. व्ही. नरसिंह राव यांची पंतप्रधानपदी झालेली नियुक्ती, श्री. पवार यांचे पंतप्रधानपदावर लक्ष, बळ कमी पडल्याने स्वीकारावे लागलेले केंद्रातील कॅबिनेटमंत्रीपद आणि मुंबईतील बॉम्बस्फोटांचे निमित्त करून श्री. नरसिंहराव यांनी श्री. पवार यांची महाराष्ट्रात केलेली बोळवण असा हा सारा घटनाक्रम होता. मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतरचा श्री. पवार यांचा प्रवास सुरळीत नव्हता. याच काळात बॉम्बस्फोटाच्या आरोपींना श्री. शरद पवार यांच्या सोबत त्यांच्या विमानातून प्रवास घडविल्याची घटना उघडकीस आली. मुंबई महापालिकेचे माजी आयुक्त श्री. गो. रा. खैरनार यांनी श्री. पवार यांच्यावर भ्रष्टाचारांच्या आरोपांची आघाडीच उघडली होती आणि याच मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी त्यांना धारेवर धरले होते. 'एन्रॉन' प्रकरणी श्री. गोपीनाथ मुंडे यांनी केलेले गौप्यस्फोट सरकारला हादरविणारे ठरले आणि त्यांच्या 'संघर्षयात्रे'ला राज्यभरात मिळालेला प्रतिसाद सत्ताधाऱ्यांच्या छातीत धडकी भरविणारा ठरला. या घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर नामविस्ताराच्या निर्णयाकडे पाहिल्यानंतर 'शरद पवार' या व्यक्तीच्या राजकीय निर्णयांतील हेतुंविषयी मनात शंका निर्माण होऊ लागते. राजकीय स्वार्थ तर प्रत्येकजणच साधत असतो, पण श्री. पवार यांच्या स्वार्थाची 'जातकुळी' वेगळी आहे.

मुस्लिम असोत की दलित समाज, त्यांच्या एकगठ्ठा मतांचा वापर सत्ता मिळविण्यासाठी करायचा आणि त्यांच्या नेत्यांच्या तोंडावर चार तुकडे फेकून त्यांना मिंधे करून ठेवायचे, ही खास 'काँग्रेसी' परंपरा आहे. श्री. शरद पवार हे ही याच काँग्रेसी परंपरेचे एक खंदे पाईक आहेत. ज्या काँग्रेसने साक्षात बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत पराभूत करण्यासाठी जंग जंग पछाडले, त्यांच्या पराभवातच आपल्या पक्षाचे हित मानले, त्या काँग्रेसकडून आणि त्या वृत्तीतून जन्मलेल्या इतर कोणत्याही राजकीय पक्षाकडून दलित समाजाने न्यायाची अपेक्षाच करणे चुकीचे आहे. देशाची राज्यघटना तयार करणाऱ्या समितीच्या अध्यक्षांना अमेरिकेसह इतर देशांनी त्या त्या वेळी सन्मानाने आपल्या प्रतिनिधीगृहात सदस्यत्व बहाल केले.

## पुन्हा एकदा पवार?.... कंटाळा आला...!

खरे तर सलग तिसऱ्या आठवड्यात श्री. पवार यांच्याबद्दल मला लेखन करावे लागत आहे. वास्तविक, या अंकातील लेखनासाठी माझ्या मनात वेगळा विषय होता. पण श्री. रामदास आठवले यांनी राज्यात वेगळ्या राजकीय परिमाणांची जुळणी करीत शिवसेना-भाजपासोबत जाण्याचा निर्णय घेताच राष्ट्रवादी काँग्रेसने खेळलेली ही समाजस्वास्थ्य बिघडविणारी, बुद्धीभेद करणारी खेळी राज्याला काही दशके मागे घेऊन जाऊ शकते असे जाणवले. एकीकडे, बिहारसारखे राज्य आपले जुने रुप पालटून नव्या जोमाने पुढे येत असताना महाराष्ट्राचा बिहार करणारी श्री. पवार यांची ही विषारी खेळी मनाला अस्वस्थ करून गेली. या लेखनाच्या अंति श्री. पवार यांना आणि त्या प्रवृत्तीला एकच आवाहन... *स्वतःचे स्वार्थ आपण आज-वर खूप साधलेत. 'सर्वच' दृष्टीने आपण एव्हरेस्ट उभे केलेत. आता विश्रांती घ्या. 'राष्ट्रवादा'च्या नावाखाली सोनियांच्या विरोधात जाऊन स्थापलेल्या पक्षाला राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी अखेर त्यांच्याच पदराखाली आश्रय घ्यावा लागला, याची थोडी शरम वाटू द्या. सत्ता नसेल तर आपले अस्तित्व शून्य आहे, याची आपणास जाणीव आहेच. या शून्यात प्रवेशाची तयारी करा. आपण आपल्या जुन्या भूमिका प्रत्येक वळणावर सोयिस्करपणे विसरत असाल, पण त्या काळातील आपले प्रत्येक वाक्य समाजाच्या स्मरणात आहे. समाज जेव्हा एखाद्याची सगळी 'थकबाकी' चुकविण्याचे ठरवितो ना, तेव्हा काय अवस्था होईल याची कल्पनाही आपण कदाचित करू शकणार नाही. दिल्ली दरबारात 'वजन' असलेला मराठी नेता म्हणून आमच्या मनात आपणाबद्दल नक्कीच आदर आहे. हा आदर कायम राखण्यासाठी आता आपण विश्रांती घेणे आवश्यक आहे... त्यातच आपले आणि राज्याचे भले आहे.*




इथे मात्र पंडित नेहरू यांनी डॉ. बाबासाहेबांना खासदार या नात्याने आयुष्यभरात संसदेत प्रवेश करू दिला नाही. त्या आधी बाबासाहेबांना खच्ची करण्याचा यशस्वी प्रयत्न म. गांधी यांनी केला. त्यासाठी त्यांनी उपोषणाद्वारे आपले आयुष्य पणाला लावले आणि त्या 'महात्म्या'च्या प्राणासाठी देशभरातून आलेल्या दबावापुढे डॉ. बाबासाहेबांना नाईलाजाने झुकावे लागले. दलितांना मानवतेचे हक्क मिळवून देण्यापेक्षा पं. नेहरु यांना राजकीय लाभ मिळवून देण्याकडे म. गांधी यांचा कटाक्ष होता. या परंपरेची जपणूक करणाऱ्या काँग्रेसने आणि त्यांचाच राजकीय वारसा चालविणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसने शिर्डी लोकसभा मतदारसंघात श्री. रामदास आठवले यांना पराभूत केले, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पराभवापासून सुरू झालेले एक दुष्ट वर्तुळ पूर्ण झाले.

श्री. आठवले यांच्या युतीसोबत जाण्याच्या निर्णयामागे हा मोठा कॅनव्हास आहे. आपल्या दावणीला बांधलेली दुभती गाय अशी दुसऱ्याच्या संगतीने जाते, हे श्री. पवार यांना खपणारे नाही आणि चालणारेही नाही. त्यामुळे त्यांनी या संभाव्य युतीमध्ये मतभेद व्हावेत, या दृष्टीने त्यांनी अनेक प्रयत्न केले. तत्कालीन मराठवाडा विद्यापीठाला असलेला श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या विरोधाचा मुद्दा उगाळून झाला, रिडल्सचे प्रकरण काढून झाले, शिवसेना-भाजप आणि रिपब्लिकन विचारसरणीतील मतभेदांवर चर्चा करून झाली पण तरीही ही संभाव्य आघाडी बिघडत नाही हे पाहून आता बहुदा दादर स्टेशनच्या नामांतराचे प्रकरण काढण्यात आले असावे, असे दिसते. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराला एक पार्श्वभूमी होती. समाजातून या मागणीचा रेटा होता. या विषयाला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी होती. दादरबाबत असे फारसे काही दिसत नाही. बरे, नव्याने मागणी करणारा पक्ष स्वतः सत्तेत आहे, मग ही मागणी ते कोणाकडे करीत आहेत? जशी भ्रष्टाचार निर्मुलनासाठी कटोर पावले उचलण्याची मागणी श्रीमती सोनिया गांधी यांनी पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग यांच्याकडे केली तशीच ही करमणुकीची मागणी वाटते. हे नेते मागणीचे फार्स उभे करून जनतेची दिशाभूल करण्याऐवजी थेट निर्णयच का घेत नसावेत? सामान्य माणसाला झुलविण्याचाच हा प्रकार आहे. 'राष्ट्रवादी'ने मागणीचे गुऱ्हाळ न घालता थेट मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय जाहिर केला असता, तर चांगले झाले असते. श्री. पवार यांचे केंद्रातही चांगले वजन आहे. रेल्वे खात्यात चर्चा करून या नावाला तत्काळ मंजुरी मिळविणेही त्यांना सहज शक्य आहे. असे असताना ही मागण्यांची नाटके कशासाठी? थेट निर्णयच का घेतला जात नाही? समाजात दुही माजविणे, हा एकच हेतू यातून दिसतो आहे.

ज्याप्रमाणे मराठवाडा विद्यापीठाच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' या नामविस्ताराच्या प्रसंगीची पार्श्वभूमी आपण विचारात घेतली, तशीच स्थिती यावेळीही दिसते आहे. रिझर्व्ह बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून तेथे प्रशासकाची नियुक्ती केली आहे. या आर्थिक महाघोटाळ्यांची पाळेमुळे अखेरीस राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांच्याच आसनाखाली रुजलेली दिसत आहेत. यावरून सध्या रान माजलेले आहे. 'आयपीएल'मधील राजकारणाने सध्या ललित मोदींचा बळी घेतलेला असला तरी यदाकदाचित हा विषयही शरद पवार यांच्यापर्यंत पोहोचू शकतो. ते मंत्री असलेल्या कृषी आणि सार्वजनिक वितरण या दोन खात्यांमधील व्यवहारांवरही अनेक आक्षेप आजपर्यंत घेण्यात आलेले आहेत. हे आणि असे विषय चर्चेत येत असताना सर्वांचे लक्ष यावरून दूर व्हावे हा हेतूही दादर स्थानकाच्या नामांतराच्या मागणीचा विषय पुन्हा एकदा उचकविण्यामागे असू शकतो.

राज्यातील आणि देशातील विद्यमान सरकारे सर्वाधिक भ्रष्टाचार करणारी ठरली आहेत, यात आता काहीही शंका उरली नाही. या पक्षांना पर्याय असलेल्या भाजपाप्रणित आघाडीचे सरकार केंद्रात आले किंवा युतीचे सरकार राज्यात सत्तेवर आले, तर सारे काही अलबेल होईल असे मानण्याएवढे आम्ही दुधखुळे नाही. युतीच्या काळातही भ्रष्टाचार होताच. सत्तेत बदल झाल्यानंतर कदाचित भ्रष्टाचाराचा वेग थोडा कमी होईल आणि समाजसेवेची चार कामे मार्गी लागतील एवढीच अपेक्षा आता उरली आहे. कारण समाजानेही भ्रष्टाचार मान्य केला आहे. निवडून आलेल्या नगरसेवक, आमदार, खासदारांच्या करोडोंच्या मालमत्तांच्या स्त्रोतांवर कोणीही आक्षेप घेत नाही. या नेतेमंडळींनी भ्रष्टाचार करावा, पण कामेही करावीत एवढेच आता समाजाचे म्हणणे आहे. कामे न

**पान २२ पाहा**

# जमीन अधिग्रहणासाठी पाच उपाय



एन. के. सिंग
खासदार राज्यसभा

**जमीन अधिग्रहणासाठी भारतात सरकारने काय करायला पाहिजे याचा विचार करताना आपण हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की भारतात जगाच्या १८% लोकसंख्या आहे आणि केवळ २% जमीन. दरडोई ०.०८ हेक्टर एवढेच वन आहे जेव्हा जगाची सरासरी ०.८% आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता जमिनीची मागणी वाढतच जाणार आहे हे ध्यानी घेतले पाहिजे. म्हणून खालील पाच मुद्द्यांचा विचार करूनच भारताचे जमीन अधिग्रहणाचे धोरण राबविण्यात यावे.**

सरकारने अधिग्रहीत केलेल्या जमिनीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे आणि तोही चुकीच्या कारणांसाठी. उत्तर प्रदेशातील नोएडा भागातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे मायावती सरकारने अधिग्रहण केले. त्यात शेतकऱ्यांऐवजी ज्यांच्यासाठी जमीन अधिग्रहीत केली त्या उद्योगपतींचेच हीत पाहिल्याचा नेहमीचाच आरोप सरकारवर करण्यात आला आहे. मर्यादीत प्रमाणात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संपत्तीचे न्याय्य वाटप कसे करावे ज्यायोगे निसर्गाचा समतोल राखत कोणाचे नुकसान न होता आर्थिक प्रगती कशी साधता येईल यावर सखोल विचार करण्याची गरज असल्याचे पुन्हा लक्षात येते.

जमीन अधिग्रहणासाठी भारतात सरकारने काय करायला पाहिजे याचा विचार करताना आपण हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की भारतात जगाच्या १८% लोकसंख्या आहे आणि केवळ २% जमीन. दरडोई ०.०८ हेक्टर एवढेच वन आहे जेव्हा जगाची सरासरी ०.८% आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता जमिनीची मागणी वाढतच जाणार आहे हे ध्यानी घेतले पाहिजे. म्हणून खालील पाच मुद्द्यांचा विचार करूनच भारताचे जमीन अधिग्रहणाचे धोरण राबविण्यात यावे.

एक- जमिनीची किंमत योग्य प्रकारे ठरविण्यात आली पाहिजे. जास्त दराने द्यावे लागणारे मुद्रांक शुल्क आणि इतर कर चुकविण्यासाठी म्हणून जमिनीचे व्यवहार काळ्या पैशांत होतात. सरकार जेव्हा जमिनीचे अधिग्रहण करते तेव्हापासून प्रकल्प सुरू होण्यास बराच काळ जातो आणि त्यामुळे जमिनीच्या किमती वाढत जातात. तसेच वेगवेगळ्या जागी जमिनीच्या किमती वेगवेगळ्या असतात. हे सर्व लक्षात घेऊन जमिनीच्या किमती ठरविण्यात याव्यात. या करिता ऑस्ट्रेलिया किंवा इंग्लंड या देशांतील धोरणांचा अभ्यास करण्यात यावा.

दोन- सरकारने जमिनीचे अधिग्रहण कशाकरीता केले आहे हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. रस्ता- विमानतळ वगैरेंसाठी जेव्हा जमीन घेतली जाते ते वेगळे आणि सरकार जेव्हा एखाद्या उद्योगासाठी जमीन अधिग्रहीत करते ते वेगळे. सरकारने घेतलेल्या जमिनीचा वापर करून जर एखादी खासगी कंपनी स्वत:चा फायदा करून घेणार असेल तर मूळ मालकाला त्यात हिस्सा का मिळू नये? याचा विचार जरूर व्हावा.

तीन- जमिनीचे अधिग्रहण खासगी कंपन्यांनाच करू देणे जास्त योग्य राहील. ७०-८०% जमीन मालकांनी आपली जमीन विकण्यास संमती दिल्यावर जर काही जमीन मालक अडेलतट्टूपणा करत असतील तरच सरकार मध्ये पडून प्रश्न सोडवावा.

चार- ज्यांची जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे त्यांना रोजगाराची हमी, प्रकल्पात हिस्सेदारी, तसेच विस्थापित व्हावे लागत असेल तर त्यांची जीवन पद्धती न बदलता त्याच सामाजिक-सांस्कृतिक वातावरणात जगण्याची खात्री देऊन विस्थापनास होणारा विरोध कमी करण्यात यावा.

पाच- आपल्या देशाच्या प्रगतीसाठी भविष्यात जास्त जमिनीची गरज भासणार आहे. जमीन अधिग्रहणाचा प्रश्न सोडवताना केवळ दादागिरी किंवा भावनांचा अतिरेक योग्य नाही. त्यासाठी सर्वांचे हित बघणारे धोरण विवेकाने ठरविणे गरजेचे आहे. कारण त्यावरच आपले भविष्य आधारित आहे.

**(दि. ३ जून दै. दी इंडियन एक्स्प्रेसमधून साभार. स्वैर अनुवाद - संघटक ब्युरो)**

# हत्या करायला शिक

**[ पाठीशी पोट जाऊन शरीराने कृश झालेले लाखो शेतकरी अहिंसक मार्गाने हात छातीशी बांधून हक्काची भाकर मागण्यासाठी जेव्हा रस्त्यावर उतरले तेव्हा मायबाप सरकारने त्यांच्या पाठीवर गोळ्या घालून मुडदे पाडलेत. घालायच्याच असेल तर छातीवर गोळ्या घाला असे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांची एवढी साधी इच्छादेखील पूर्ण केली नाही. शासन आणि प्रशासनाला जर बंदुकीचीच भाषा कळत असेल तर आत्मग्लानी व आत्महत्या निरुपयोगीच ठरतात, असे म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत इच्छा असो नसो, स्वतःला बदलावेच लागेल. आत्महत्या नव्हे तर हत्या करायला शिकावेच लागेल. ]**

'विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले,' असे महात्मा जोतीबा फुले म्हणायचे. शेतकऱ्यांची मुलं शाळा-कॉलेजात शिकायला गेली की शिकून-सवरून शहाणी होतील आणि मग शिकून-सवरून शहाणी झालेली शेतकऱ्यांची मुले आपल्या घरातल्या, गावातल्या म्हणजे पर्यायाने शेतकरी समाजातल्या दारिद्र्याचा समूळ नायनाट करतील, असे महात्मा जोतीबा फुलेंना वाटायचे.

विद्या आली की मती येईल, मती आली की नीती येईल, नीती आली की गती येईल, गती आली की वित्त येईल आणि वित्त आले की अस्मानी-सुलतानी संकटांशी लढण्याचे सामर्थ्यही आपोआपच येईल आणि शेतकऱ्यांचा दिवस उजाडेल असाच दुर्दम्य आशावाद जोपासत म. फुले जगले.

म. फुले गेल्याला शंभरावर वर्षे लोटली. वाहत्या काळाच्या ओघात बऱ्याच उलथापालथी झाल्यात. शिक्षणाचा प्रसार झाला. सर्वदूर शाळा निघाल्यात. महाविद्यालयीन शिक्षणाची व्यवस्था झाली. भरीसभर म्हणून रात्रीच्या शाळाही निघाल्यात आणि शूद्र शेतकऱ्यांची पोरं शिकून मोठी झालीत. उच्चपदावर गेलीत. राजकारणात सत्तास्थानी विराजमानही झाली; पण एकंदरीत शेतकरी समाजाची दुर्दशा काही खंडीत झाली नाही. शेतकऱ्यांची मूठभर पोरं गलेलठ्ठ पगार मिळवती झाली किंवा शेतकऱ्यांची मूठभर पोरं लाल दिव्याच्या गाडीत फिरायला लागली याचा अर्थ एकंदरीत संपूर्ण शेतीमध्येच समृद्धी आली असा कसा घेता येईल?


गंगाधर मुटे

मग शिक्षणाने नेमके काय केले? याचा जरा शोध घेऊन बघितला तर मोठे मजेदार निष्कर्ष बाहेर यायला लागतात. झाले असे की, शिक्षणाने विद्या आली. विद्येमुळे मतीही आली; पण मतीमुळे नीती येण्याऐवजी थेट गती आणि वित्त आले. नीती नावाचा मधला एक टप्पाच गहाळ झाला. शिवाय वित्त आले की लढण्याचे सामर्थ्यही आपोआपच येईल, असा जोतीबांनी केलेला कयासही शेतकरीपुत्रांनी-शुद्रपुत्रांनी उताणा-उपडा-तोंडघशी पाडला. शूद्राचा पोरगा जेवढा अधिक शिकला तेवढा तो आपल्या इतर शेतकरी बांधवांपासून दूर गेला आणि आत्मकेंद्रीत झाला असेच समीकरण दृग्गोचर झाले. संपूर्ण देशात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू झाले; पण हा उच्चशिक्षित शेतकरीपुत्र हादरला नाही, पाझरला नाही, विव्हळला नाही आणि पेटून वगैरे तर अजिबातच उठला नाही. शेतकऱ्याच्या जळणाऱ्या चिता पाहतानाही तो ढिम्मच्या ढिम्मच राहिला.

'एकजुटीची मशाल घेऊनी पेटवतील हे रान' या साने गुरुजींच्या ओळी साकार करण्याचा शिकल्या-सवरल्या-शहाण्या आणि बऱ्यापैकी वित्तप्राप्ती केलेल्यांनी कधी प्रयत्नच केला नाही किंवा चुकून कधी त्या मार्गालाही शिवले नाहीत. कदाचित यात त्यांचा दोषही नसावा. जळत्या घरात आगीचे चटके सोसल्यानंतर त्या घरातल्या एखाद्याला त्या पेटत्या घरातून जर बाहेर पडायची संधी मिळाली तर तो स्वतःचा जीव मुठीत घेऊन जीवाच्या आकांताने पळत सुटतो. पुन्हा मागे वळून त्या घराकडे पाहण्याच्या फंदात पडत नाही किंबहुना मागे वळून त्या घराकडे पाहण्याची त्याच्यामध्ये इच्छाशक्ती उरलेलीच नसते. कदाचित अशाच तऱ्हेच्या सामूहिक मानसिकतेतून शेतीच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी झगडण्याऐवजी आहे त्या व्यवस्थेत स्वतःला समरस

करून घेण्याच्या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून ही शिकली-सवरली शेतकऱ्यांची मुले 'अडवणूक त्या करणारांची उडवू दाणादाण' असे स्वप्नातही म्हणायला धजावली नसावीत.

'किसान-मजूर उठलेले, कंबर लढण्या कसलेले' असे दृश्य अनेक पाहायला मिळते; पण लढण्यासाठी कंबर कसणाऱ्यांमधे अशिक्षित आणि अर्धशिक्षित लोकांचाच जास्त भरणा असतो. उच्चशिक्षितांची संख्या मोजायला एका हाताची बोटेदेखील पुरेशी ठरतात किंवा तितकेही नसतात आणि असलेच तर ते लढण्यासाठी नव्हे तर लढणाऱ्यांना हुसकावून लावण्यासाठी असतात, लाठ्या घालण्यासाठी असतात किंवा गोळीबाराचे आदेश देण्यासाठी असतात आणि नेमका येथेच म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणातून क्रांती घडेल या तत्त्वाचा पराभव झाला असावा, असे समजायला बराच वाव आहे.

हे खरे आहे की, एकूण लोकसंख्येपैकी दहा-वीस टक्के लोकांच्या आयुष्यात शाळा-महाविद्यालयीन शिक्षणाने आमूलाग्र बदल घडत असतो. स्वातंत्र्याच्या फळांची चवही चाखण्यात त्यांचाच हातखंडा असतो. आयुष्यही समृद्ध आणि वैभवशाली होत असते. त्यांच्या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याच्या कक्षाही नको तेवढ्या रुंदावायला लागतात; पण उरलेल्या सत्तर-अंशी टक्के जनतेचे काय? शेतीवर जगणाऱ्या शेतकरी-शेतमजुरांचे काय? त्यांना ना जगण्याची हमी, ना मरण्याची हमी. मरण येत नाही म्हणून जगत राहायचे, एवढेच त्यांच्या हातात असते. ज्या देशात हजारो कोटी रुपयांचे गैरव्यवहार सहज पचवले जातात त्याच देशातल्या शेतकऱ्यांना केवळ काही हजार रुपयांच्या कर्जापायी आत्महत्या करावी लागते. शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ का येते, या प्रश्नाचे तपशीलवार उत्तर शोधण्याची शिकून शहाणा झालेल्या आणि शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेऊन उच्च शासकीय पदावर कार्यरत असणाऱ्या शुद्रपुत्रांना अजिबातच गरज वाटत नाही, हा इतिहास आहे.

असे गैर ती आत्महत्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी
परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी

आता शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घेतलेली काही मुले उच्चशिक्षण घेऊन प्रशासनात उच्चपदावर पोहोचतील, काही मुले राजकारणात शिरून सत्तास्थानी विराजमान होतील त्यामुळे संपूर्ण शेतीव्यवसायाचे भले होऊन गरिबीचा आणि दारिद्र्याचा निःपात होईल, अशी आशा बाळगणे यापुढे भाबडेपणाचे व मूर्खपणाचे ठरणार आहे. कुणीतरी प्रेषित जन्माला येईल आणि आपल्या घरात दिवे लावून जाईल, हा आशावादही चक्क वेडेपणाचा ठरणार आहे. ज्याचे जळते, त्यालाच कळते हेच खरे असून त्यावरील इलाजही ज्याचे त्यानेच शोधले पाहिजेत.

कवी इंद्रजित भालेराव म्हणतात,

शीक बाबा शीक लढायला शीक
कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक

शालेय शिक्षणातून मिळणाऱ्या विद्येवर विश्वास ठेवल्याने व त्यानुसार कृती केल्याने जर शेतकऱ्याचे काहीच भले होणार नसेल तर शेती कसणाऱ्या व शेतीवर जगणाऱ्या शेतकरीपुत्रांच्या-कुणब्याच्या पोरांच्या नव्या पिढीला स्वतःचे मार्ग स्वतःलाच शोधावे लागतील. जुन्या समजुती व विचारांना फाटा देऊन नव्या वास्तववादी व परिणामकारक विचारांचा अंगिकार करावाच लागेल. लढणे हाच जर एकमेव पर्याय उरला असेल तर कुणब्याच्या पोराने आता लढायला शिकलेच पाहिजे.

लाजरेपणा बुजरेपणा बाजारात ईक
घेऊ नको फाशी बाबा खाऊ नको इख
मागं मागं नको पुढं सरायला शीक
आत्महत्या नको हत्या करायला शीक

हत्या करणे हा शेतकरी समाजाचा धर्मच नाही. लाथेखाली तुडवू इच्छिणाऱ्यांशीसुद्धा अदबीने वागण्यातच त्याचे आयुष्य गेले. व्यक्तिगत जीवनात प्रसंग आला तर ज्या व्यवस्थेने त्याच्या आयुष्यात माती कालवली, त्या जुलमी व्यवस्थेला जाब विचारायचे सोडून स्वतःच आत्मग्लानी स्वीकारून विषाची बाटली घशात ओतली किंवा गळ्यात दोर लटकवून जीवनयात्रा संपविली. नेमका याच चांगुलपणाचा सर्वांनी गैरफायदा घेतला. नक्षलवाद्यांचे नाव काढल्याबरोबर थरथरायला लागणारे प्रशासकीय अधिकारी निरुपद्रवी शेतकऱ्यांवर नेहमीच मर्दुमकी गाजवताना दिसतात. एका हातात एके ४७ रायफल व दुसऱ्या हातात हॅन्ड ग्रेनेड घेतलेले दोन तरुण बघून सरकारे हादरलीत. डोईवर लाल-पिवळा दिवा मिरवणारे माजघरात दडलीत. टीव्ही चॅनल आणि वृत्तपत्रे एकाच विषयावर रेंगाळलीत. जनजीवन ठप्प झाले, असे अनेकवेळा घडल्याचा इतिहास सांगतो. याउलट पाठीशी पोट जाऊन शरीराने कृश झालेले लाखो शेतकरी अहिंसक मार्गाने हात छातीशी बांधून हक्काची भाकर मागण्यासाठी जेव्हा रस्त्यावर उतरले तेव्हा मायबाप सरकारने त्यांच्या पाठीवर गोळ्या घालून मुडदे पाडलेत. घालायच्याच असेल तर छातीवर गोळ्या घाला असे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांची एवढी साधी इच्छादेखील पूर्ण केली नाही. शासन आणि प्रशासनाला जर बंदुकीचीच भाषा कळत असेल तर आत्मग्लानी व आत्महत्या निरुपयोगीच ठरतात, असे म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत इच्छा असो नसो, स्वतःला बदलावेच लागेल. आत्महत्या नव्हे तर हत्या करायला शिकावेच लागेल.

कोट्यवधी कर्ज घेती दलालांची पोरं
बुडिविती त्याचा कधी करिती ना घोरं
तुला टाळून जाणाऱ्याला आडवायला शीक
घेतलेली कर्जे सारी बुडवायला शीक

जे जे आलेत ते शेतकऱ्यांच्या नरडीला नख लावूनच गेले. तलाठ्यापासून तहसीलदारापर्यंत, दलालापासून व उद्योगपतीपर्यंत आणि गावच्या सरपंचापासून ते देशाच्या पंतप्रधानापर्यंत सर्वांनीच त्याने पिकविलेल्या मालास उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव देऊन शेतमालाची लयलूट करण्यासाठी हातभार लावला. त्यांच्या चुकीच्या धोरणाच्या फटक्यानेच शेतकऱ्यांचा संसार उध्वस्त झाला. आता हेच बघा, यंदा डिसेंबरमध्ये कापसाचे भाव रु. ७०००/- प्रतिक्विंटल होते. ते काही सरकारच्या कृपेमुळे नव्हते. आंतरराष्ट्रीय बाजारात तेजी आहे म्हणून होते; पण केंद्र सरकारने मे महिन्यात कापसाच्या निर्यातीवर बंदी लादली आणि कापसाचे भाव रु. ३०००/- प्रतिक्विंटल एवढे कोसळलेत. मग शेतकऱ्याने एवढा तोटा कसा भरून काढायचा? कर्जे कशी फेडायचीत? मग तो कर्जबाजारी झाला तर त्याच्या कर्जबाजारीपणाला तोच एकटा दोषी कसा? त्यामुळे आता काही नाही, एकच सरळसोपा मार्ग आणि तो म्हणजे घेतलेली कर्जे सारी बुडवायला शिकणे. पिकलं तवा लुटलं म्हणून देणंघेणं फिटलं.

उंटावून शेळ्या हाकी सरकारं शहाणं
त्याच्यामुळं जीव तुझा पडला गहाण
तुझं ऐकत नाही त्याला झाडायला शीक
तूच दिली सत्ता त्याला पाडायला शीक

शेतीला अवकळा येण्याला केवळ आणि केवळ शासनयंत्रणाच कारणीभूत आहे. शेतीचे प्रश्न सुटत नाहीत, कारण शेतकरी कधी शेतीच्या मुद्द्याच्या आधारावर मतदानच करीत नाही. जाती-पाती, धर्म-पंथाच्या आधारावर मतदान करण्याचा या देशातल्या लोकशाहीला रोगच जडला आहे. निदान शेतकऱ्याने तरी यातून बाहेर यावे. जो शेतीचे प्रश्न सोडविणार नाही त्याला मतदानच करायचे नाही, मग तो उमेदवार त्याच्या जाती-धर्माचा का असेना, असा निश्चय करायलाच हवा. दिलेले आश्वासन पूर्ण न करणाऱ्याला निवडणुकीच्या मैदानात लोळवायलाच हवे.

जातील हे दिस आणि होईलही ठीक
उद्या तुझा शेतामधी उधाणेल पीक
गाळलेल्या घामासाठी रस्त्यावर टीक
हक्कासाठी लढ बाबा मागू नको भीक

प्रत्येक अवस्थेला अंत असतोच. कोणतीही व्यवस्था चिरकाल टिकत नाही. आजचा दिवस कालच्यासारखा असत नाही आणि उद्याचा दिवस आजच्यासारखा असत नाही. स्थित्यंतरे घडतच राहतात. त्याचप्रमाणे कोणतीही व्यवस्था निर्दोष असू शकत नाही. एका दोषास्पद व्यवस्थेकडून दुसऱ्या दोषास्पद व्यवस्थेकडे आपण वाटचाल करीत असतो; पण दुर्दैव हे की, बळीराजाला पाताळात गाडल्यानंतर निर्माण झालेल्या सर्व व्यवस्थांमध्ये शेतकरी केंद्रस्थानी कधीच नव्हता. त्याला कधी शूद्र म्हणून हीनतेची वागणूक दिली तर कधी औद्योगिकीकरणाच्या उत्कर्षासाठी कच्चा माल म्हणून त्याची पिळवणूक केली गेली; पण हे आता थांबायला हवे.

हे शेतकऱ्याच्या पोरा, आता गाळलेल्या घामाची रास्त किंमत कशी वसूल करायची हेच तुला शिकायचे आहे. त्यासाठी ठाण मांडून बसायचे आहे आणि प्रश्न निकाली निघेपर्यंत तसूभरही न ढळता अंगिकार केलेल्या रस्त्यावर टिकायचेही आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४

■■

**पान १८ वरून पुढे**

करताच पैसा हडपण्याचे कौशल्य दादा-काका-बाबा मंडळींना चांगलेच अवगत झाले आहे. सत्तेचे नवे शिलेदार आले तर ही कौशल्ये अंगी बाणवण्यात काही वर्षे जावी लागतील, तेवढ्या वेळात काही चांगली कामे मार्गी लागतील, एवढीच अपेक्षा आहे. बाकी, शिवसेना-भाजप-रिपब्लिकन युतीची भलावण करणे हा या लेखाचा हेतू अजिबात नाही. हेतू एवढाच, की स्वतःच्या राजकीय स्वार्थापलिकडे काहीही पाहू न शकणाऱ्या राष्ट्रवादी कंपूपासून समाजाने सावध राहावे आणि योग्य वेळी मतपेटीतून त्यांना कायमचा धडा शिकवावा.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होताना श्री. यशवंतराव चव्हाण यांनी हे राज्य मराठ्यांचे नव्हे तर मराठी लोकांचे असेल, याची ग्वाही दिली होती. प्रत्यक्षात स्थिती काय आहे? शरद पवार यांचे उत्तर देतील काय? शरद पवार यांच्या पक्षाची स्थिती काय आहे? त्यांनी वाटलेल्या सत्तेच्या खिरापतींचा किती वाटा कोणत्या समाजाला मिळाला आहे? यात दलितांच्या पदरात काय पडले? दलितांची राज्यातील स्थिती काय आहे? दलितांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी काही नेमके प्रयत्न झाले का? या आणि अशा प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी राष्ट्रवादी कंपूकडून भावना भडकविणाऱ्या विषयांची उजळणी केली जाते, ही प्रवृत्ती समाजविघातक आहे.

आणखी एक मुद्दा जाताजाता आठवला. 'बाळासाहेबांनी किती कारखाने उभारले-किती शिक्षणसंस्था उभारल्या?' असा एक बालिश सवाल राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी विचारला आहे. खरे तर श्री. शरद पवार यांनीच या विषयी एक मार्गदर्शक तत्व घालून दिले आहे. 'पोरासोरांच्या प्रश्नांना मी उत्तरे देत नाही' असे एक उत्तर श्री. पवार यांनी श्री. उद्धव ठाकरे यांना दिले होते. अशाच उत्तराची अपेक्षा त्यांनी आता श्री. ठाकरे यांच्याकडून ठेवायला हवी! आणि कारखाने-शिक्षणसंस्था काढून कोणी काय काय केले आहे, याचा लेखाजोखा मांडायचा ठरला तर हीच पिलावळ अडचणीत येईल, हे नक्की. 'दंडुके', 'टगे' अशी भाषा वापरणाऱ्या आणि विरोधकांचा 'बाप' काढणाऱ्या आपल्या पुतण्याला खरे तर काकांनी आता रोखायला हवे. (की, पुतण्याचा परस्पर काटा काढायचा काकांचा हा खास डाव आहे?)

भावना भडकविणारी वक्तव्ये, निर्णय, कृती या गोष्टी आता या पुढे वेगाने घडत जाणार आहेत. निवडणुका जवळ आल्या की आपल्याकडे हे सारेच होते. पण आता परिपक्व लोकशाहीच्या दृष्टीने आपण विचार करायला हवा. आपण निवडून दिलेल्या नेत्यांना आपल्याला पाच वर्षे सहन करावे लागणार आहे, याची जाणीव ठेवून मत द्यावे लागणार आहे तसाच विचार मागच्या पाच वर्षांतील कामगिरीबद्दलही करावा लागणार आहे. कोणत्या खोऱ्यात किती निधी जिरला, कोणत्या खात्यात किती उलाढाली झाल्या, टोलनाक्यांतून किती जणांच्या तिजोऱ्या भरल्या, वरिष्ठ पदांच्या नियुक्त्यांतून किती उलाढाली झाल्या? मंत्रालयाच्या कडेकोट तपासणीतूनही करोडोंच्या नोटा केबिनपर्यंत कशा पोहचविल्या जातात? या आणि अशा अनेक सुरस व चमत्कारिक प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. उत्तरे मिळत नसतील तर किमान प्रश्न तरी पडले पाहिजेत आणि या प्रश्नांतून सावधगिरीचे इशारे समजून घेतले पाहिजेत. भावनेच्या आहारी न जाता राजकीय स्वार्थांच्या विषयाकडे समंजस दुर्लक्ष केले पाहिजे. यातच देशाचे, राज्याचे आणि समाजाचे हित आहे.

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# सांप्रदायिक हिंसाविरोधी कानून या देश का बटवारा

**इसका सीधा और सरल अर्थ है कि यदि एक ही सांप्रदाायिक दंगा बहुसंख्यक वर्ग और अल्पसंख्यक वर्ग दोनो ही करते है तो अल्पसंख्यक वर्ग पर यह कानून लागू नही होगा और केवल बहुसंख्यक वर्ग ही इस कानून की सख्त सजा का हकदार होगा. क्या मजाक है? इस कानून की मानो यह मान्यता है कि सभी दंगे केवल और केवल अल्पसंख्यकों के विरुद्ध बहुसंख्यकोंद्वारा शुरु किये जाते है, और अल्पसंख्यक केवल उसके शिकार होते है.**

मीडिया में भारतीय जनता पार्टी के नेता शहनवाज हुसैन का बयान था कि कांग्रेस सांप्रदायिकता विरोधी कानून के द्वारा देश में फिर से सांप्रदायिक तनाव पैदा करने की कोशीश कर रही है और देश के बहुसंख्यक समाज को पहले से अपराधी मान कर चल रही है. कुछ ही घंटों में इस हिंदुवादी पार्टी के विद्वान नेता अरुण जेटली का भी बयान आ गया, जो लगभग इसी लय में था. पहली नजर में मुझे यही लगा कि भारतीय जनता पार्टी हिंदुवादी पार्टी होने के कारण बेकार का प्रलाप करके कॉंग्रेस को उसके सही काम के लिये  भी कटघरे में खड़ा कर रही है. अत: मैंने इस कानून का ड्राफ्ट हासिल करके इसका सखोल अध्ययन करने का निश्चय किया. पहली नजर में ऐसे लगा कि यह कानून देश में इधर उधर उपजते साम्प्रदायिक उन्माद को रोकने का एक प्रभावी माध्यम है और नरेंद्र मोदी जैसो को बचाने वाली भाजपा बेवजह ही इसे सांप्रदायिक रूप दे रही है. दंगों की जाँच, सख्त सजा, शारीरिक और मानसिक हिंसा की नुकसान भरपाई, लोक सेवक की जिम्मेदारी और जिम्मेदारी का पालन न करने पर होनेवाली सख्त कार्यवाही, इत्यादि तमाम बातें निश्चित रूप से इसे एक प्रभावी कानून बता रही थी. फिर इतना बवाल क्यों है?

और फिर अचानक इस कानून की धारा ३(ई) हाथ लगी और सारा मामला स्पष्ट हो गया. इस एकमात्र धारा ने इस कानून को आजाद भारत के इतिहास का सबसे काला कानून बनाने में कोई कसर नहीं छोड़ी है. इस धारा के बल पर यह कानून इस देश के बहुसंख्यक समाज को सदा के लिये कटघरे में खड़ा करते हुये उनके गरिमापूर्ण जीवन के अधिकार को छीन लेता है. यह कानून ऐसे ही कई अन्य सामाजिक सुधार कानूनों की तरह भारतीय जनमन में स्थायी भेदभाव पैदा करके, एक समाज या वर्ग को पैदाईशी पवित्र गाय और दूसरे समाज या वर्ग को पैदाईशी दुष्ट या राक्षस का दर्जा देता है. और वह भी बिना किसी ऐतिहासिक पृष्ठभूमी के. यह धारा इसे सांप्रदायिकता विरोधी कानून न बनाते हुये केवल बहुसंख्यकों की सांप्रदायिकता का विरोध करने वाला कानून बनाती है और अल्पसंख्यकों की किसी भी सांप्रदायिक क्रिया या प्रतिक्रिया को इस कानून के दायरे से मुक्त कर देती है. इस कानून की प्रत्येक सजा या जाँच कार्यवाही केवल एक समूह के विरूद्ध होनेवाले अत्याचारों को प्रतिबंधित करती है. इस कानून की धारा ३(ई) के अनुसार समूह की परिभाषा है, संविधान की धारा ३६६ के अंर्तगत देश के किसी भी राज्य में भाषायी और धार्मिक अल्पसंख्यक का दर्जा प्राप्त समूह तथा सूचीबद्ध अनुसूचित जाति एवं जनजातियाँ.



ॲड. दिनेश शर्मा

इसका सीधा और सरल अर्थ है कि यदि एक ही सांप्रदाायिक दंगा बहुसंख्यक वर्ग और अल्पसंख्यक वर्ग दोनो ही करते है तो अल्पसंख्यक वर्ग पर यह कानून लागू नही होगा और केवल बहुसंख्यक वर्ग ही इस कानून की सख्त सजा का हकदार होगा. क्या मजाक है? इस कानून की मानो यह मान्यता है कि सभी दंगे केवल और केवल अल्पसंख्यकों के विरूद्ध बहुसंख्यकोंद्वारा शुरू किये जाते है, और अल्पसंख्यक केवल उसके शिकार होते है.

इसमें कोई शक ही नहीं है कि देश में रामजन्म भूमी विवाद के पश्चात हुये ज्यादातर दंगों में

बहुसंख्यक समाज ने ज्यादा बलप्रयोग किया है. किंतु देश में चारों ओर हो रहे आतंकवादी हमले, बम विस्फोट और पाकिस्तानप्रेरित कार्यवाहीयाँ क्या बहुसंख्यक समाज करवा रहा है? और यदी शेष भारत में मानो यह काम बहुसंख्यकों के ईशारे पर हो रहा है तो जम्मू और काश्मीर में इन राष्ट्रघाती कामों को कौन अंजाम दे रहा है? सारी दुनिया जिस समय आतंक की जकड़ में हो, राष्ट्रों की पहचान धर्म से करनेवाली मानसिकता हमारे ही चारों ओर बल पकड़ रही हो, ऐसे में केवल हमारे देश में राष्ट्र की बहुसंख्यक आबादी को हमलावर बताने वाला ऐसा कानून ला कर सरकार आखिर इस देश को क्या संदेश देना चाहती है? जिस देश में पिछले बीस सालों में आतंकवादी हमलों में बीस हजार से ज्यादा लोग मारे जा चुके हो और बीस लोगों को भी सजा नहीं हुयी हो, उस देश में सरकार इस कानून के द्वारा किसे धमकाना चाहती है और किसे पुचकारना चाहती है? जब दंगे नहीं हो रहे, तब भी दंगों को रोकनेवाला कानून बनानेवाली सरकार, सतत जारी आतंकवादी हमलों के विरूद्ध क्यों ऐसा सख्त कानून नहीं लाती है, यह प्रश्न समझ से परे हैं. सरकार की ये तमाम हरकतें हमें एक राष्ट्र के रूप में मजबूत करती है या शर्मिंदा करती है, यह प्रश्न प्रत्येक भारतीय ने अपना धर्म, जाति या भाषायी पहचान भूलकर अपने आप से पूछना चाहिये.

ऐसे समय में जब कि देश अपने सबसे लंबे सांप्रदायिक शांति के दौर से गुजर रहा है, गुजरात के गोधरा कांड के बाद देश में कहीं किसी सांप्रदायिक उभार के दर्शन नहीं है, अर्थव्यवस्था तेजी से देश को समृद्ध कर रही है, ममता बनर्जी, नितिश कु मार और मायावती जैसे सभी वर्गो को स्वीकार्य नेता देश की राजनीति में मुख्य स्थान की ओर तेजी से बढ़ते जा रहे है, भाजपा भी अपने धार्मिक एजेंडे को आगे लाने में हिचक रही है, इस कानून की जरूरत क्या है? और तो और नरेंद्र मोदी जैसे एक दौर के हिंदुवादी प्रतीक भी अपनी छबी सर्वस्वीकार्य बनाने के लिये अल्पसंख्यकों से दोस्ती का माहौल पैदा कर रहे हो, तब ऐसी कौन सी तात्कालिक आवश्यकता सरकार को मजबूर कर रही है कि वह देश को मंडल और मंदिर वाले दौर में फिर ले जाकर खड़ा कर दें, जब देश आजादी के बाद सबसे ज्यादा मानसिक और भावनात्मक रूप से विभाजित था?

पिछले बीस सालों में अनुसूचित जाति या जन जाति के विरूद्ध वैसे भी किसी संघठित अपराध की सूचना देश के किसी भी हिस्से से आयी नहीं है. यूँ भी यह वर्ग इससमय देश की मुख्यधारा में तेजी से उभर रहा है, अतः उसके विरूद्ध होनेवाले अपराधों में संघठित अपराध नहीं के बराबर है. जो थोड़ी बहुत घटनाएँ हुई भी है वे व्यक्तिगत वैमनस्य के कारण ज्यादा, जातीय भेदभाव के कारण कम हुई है, ऐसा मानने के पर्याप्त से ज्यादा कारण मौजूद है. अत यह निष्कर्ष निकालने के संदेह मौजूद है कि यह कानून केवल देश के अल्पसंख्यक समाज को बेवकूफ़ बनाने के लिये लाया जा रहा है.

जिस राजनैतिक वातावरण में यह कानून सामने आया है वह भी गहरी चिंता पैदा करने वाला है. देश इससमय राष्ट्रकु ल खेल, २ जी स्पेक्ट्रम और आदर्श घोटाले जैसे अनेकानेक राष्ट्रीय तिजोरी की लूट से संबधित घटनाओं से आहत है. इन सभी में या तो कांग्रेस के या उसके सहयोगी दलों के नेता फँसे हुये है. और वह भी सरकार की पहल पर नहीं बल्कि न्यायालय और मीडिया की जागरूकता के चलते. इसके पहले के तमाम घोटाले सैकड़ो करोड़ से ज्यादा के नहीं थे. पहली बार ऐसा हुआ है कि देश के कई बड़े राज्यों के वार्षिक बजट से ज्यादा के घोटाले जनता के सामने है, जनता भीतर से आहत है और अपराधियों को सजा देने को ऊतारू दिखती है. उधर देश अपने इतिहास के सबसे बढ़े आंतकवादी हमलो से हर दो चार महिनों में दो चार हो रहा है. हमारी अर्थव्यवस्था, विधायिका और राष्ट्रीय अस्मिता और सम्मान के केंद्र आंतकवादी हमलों की पहुँच में है. अफजल गुरू जैसे संसद पर हमले के आरोपियों को न्यायालय द्वारा दी जा चुकी सजा देने का भी नैतिक सामर्थ्य सरकार गँवा चुकी है. ऐसे में समूचे देश में जारी सत्ता विरोधी रूझान किसी भी सरकार को डिगा देने के लिये काफी है. विरोधी पक्ष यदि कमजोर या विभाजित भी दिखाई दे रहे है, तो जनता, अन्ना हजारे या बाबा रामदेव जैसे नये नायको के साथ खड़ी दिखाई दे रही है.

इन तमाम उभारों को देश का सांप्रदायिक बंटवारा किये बगैर कु चला जाना लगभग असंभव है. इस बंटवारे से निश्चित रूप से कोई भी फायदा अल्पसंख्यकों को होने वाला नहीं है. और तो और, उनका केवल और केवल नुकसान होनेवाला है, किंतु इससे शासक वर्ग को निश्चित रूप से राजनैतिक फायदा होने की संभावना बनती दिखाई दे रही है. दुनिया का कोई भी शासक वर्ग बहुसंख्यकों को नाराज करके अल्पसंख्यकों को बचा ही नहीं सकता है क्योंकि सरकार का मतलब ही बहुसंख्यकों का शासन होता है. लेकिन सरकार ऐसी चालबाजीयाँ करके देश के सामने जारी बहस का रूख मोड़ सकती है और उसे होने जा रहे ज्यादा से ज्यादा नुकसान को कम कर सकती है. यही गल्ती कभी या राजीव गांधी या व्ही.पी.सिंह ने की थी जब उन्होंने अपने तात्कालिक फायदे के लिये धार्मिक या जातीय विभाजन के विष वृक्ष को खाद पानी डाला था, जिसकी प्रतिक्रिया में देश मे पहली बार बहुसंख्यक राजनीति का उदय हुआ और देश की कई विधानसभाओं में अल्पसंख्यक गिनती के लिये भी चुन कर नहीं आ सके. मध्यप्रदेश की विधानसभा में तो पिछले बीस सालों में एक भी मुस्लिम अल्पसंख्यक चुन कर नहीं आ सका है क्योंकि वहाँ की बहुसंख्यक जनता चुनावी राजनीति के लिये उनके दरवाजे बंद कर चुकी है. यही हाल अनुसूचित जाति और जनजाति के विरूद्ध होनेवाले अत्याचारों को प्रतिबधिंत करने वाले कानून का हुआ है. समूचे देश में इस कानून के अंतर्गत आज तक शायद ही किसी को सजा हुई हो, किंतु इस कानून के दुरूपयोग से दुखी जनता ने इस वर्ग के नेताओं को चुनावी मैदान से लगभग बाहर कर दिया है. महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य में पिछले विधानसभा चुनाव में रिडालोस का एक भी दलित नेता चुनाव में चुन कर आने में असमर्थ रहा है. स्वयं इसके संयोजक रामदास आठवले को शिरडी लोकसभा चुनाव में कांग्रेस की सीट पर हार का मुँह देखना पड़ा था. शिरडी के कांग्रेसी नेता बाळासाहेब विखे पाटील ने उनकी हार का ठीकरा दलित अत्याचार प्रतिबंधक कानून के गाँवों में होनेवाले दुरूपयोग पर फोड़ा था. आज रामदास आठवले शिवसेना के साथ खड़े होने को मजबूर है.

दलित अत्याचार प्रतिबंधक कानून के हुये दुरूपयोग किसी भी सभ्य समाज की आँखें खोल देने वाले है. नांदेड़ में शेतकरी संघठन के कार्यकर्ता जब एक बैंक की वसुली का विरोध करने के लिये पहुँचे तो उस बैंक ने एक दलित अफसर, सुधाकर भालेराव को आगे कर दिया. उस दलित अफसर ने संघठन के नेताओं के विरूद्ध पोलिस मे रिपोर्ट दाखल कर दी कि उन कार्यकर्ताओं ने, जो वास्तव में एक गरीब किसान, सुदाम धुमाल की जमीन बचाने गये थे, उसे जातिसूचक गालियाँ देकर उसके विरूद्ध दलित अत्याचार किया है. पुलिस ने संघठन के नेताओं, श्रीमति शोभा वाघमारे और श्री गुणवंत पाटील सहित ६ नेताओं के विरूद्ध मुकदमा दायर कर दिया और उन्हें इस गैरजमानती अपराध में गिरफ्तार होने से बचने के लिये इधर उधर भागना पड़ा. बाद में उस मुकदमे की सुनवाई के बाद उन सभी आरोपियों को छोड़ दिया गया.

कमजोर को यदि आप बचाना चाहते है तो उसे मजबूत किजीये. किंतु उसे इतना मजबूत भी मत किजीये कि वह दूसरों का शोषण शुरू कर दें. क्योंकि इससे समाज में कु ल शोषण कम नहीं होता बल्कि सिर्फ अपनी जगह और रूप बदल देता है. देश के ज्यादातर समाज सुधार वाले कानून दुर्जनों की दुष्टता को बढ़ाते है और सज्जनों को परेशान करते हैं. वे समाज को निर्भय नहीं बल्कि केवल भयभीत करना जानते है. और सबसे बड़ी बात, ये कानून, किसी भी व्यक्ति की आजादी का फैसला, संवैधानिक संस्थानों पर नहीं बल्कि दूसरे व्यक्ति की ईच्छा के अधीन कर देते है. हमने काफी मुश्किलों से यह आजादी हासील की है. विदेशी शासकों से हासील आजादी क्या देश के किसी सामान्य नागरिक की ईच्छाओं के अधीन करने की अनुमति दी जा सकती है? ज्यादातर मामलों मे फिर्यादी पोलिस में रिपोर्ट देकर बाजु हट जाते है और आरोपी जीवन भर कोर्ट के चक्कर काटता रहता है. एक व्यक्ति के द्वारा सरकाया गया एक कागज दूसरे की सारी जिंदगी को दाँव पर लगा देता है. कई बार तो ये फिर्यादी भूल भी जाते है कि उन्होंने कोई फिर्याद भी दी थी. कितने लोगों की जिंदगियाँ इसीतरह बरबाद कर दी गई है.

ऐसे कई दुरूपयोग के उदाहरण आपको देश के हर कोने में सुनायी दे जायेंगें. ऐसे कानूनों के दुरूपयोग की नुकसान भरपाई का हमारे यहाँ कोई कानून नहीं है. इसलिये यदि वर्षों की मुकदमेबाजी के बाद आप छूट भी जाते है तो न्यायालयीन खर्च इत्यादि से तबाह हो चुके होते है. आजादी के बाद किसी एक वर्ग के शोषण को रोकने के लिये दूसरे वर्ग के शोषण को बढ़ावा देनेवाले ऐसे समस्त कानूनों ने वास्तव में देश की जनता के एक बढ़े वर्ग की अस्मिता और प्रतिष्ठा को दूसरे वर्ग की सनक के अधीन करके रख दिया है. पतिपत्नि के विवादों में जब से सरकार ने अपने कदम रखे, तब से इसके प्रावधान मानों सिर्फ बदला लेने के औजार बन चुके है. एक महिला के अधिकार बचाने के लिये पति के घर की तमाम महिलाओं के अधिकार कु चले जा रहे है. बुजुर्गों की बात का वजन समाप्त हो चुका है और दांपत्य रिश्तें एक यातनदायी कथानक बन चुके है. समाज में कु ल शोषण बढ़ने के स्थान पर कई गुणा बढ़ चुका है. अच्छे अच्छे घरों की महिलायें पुलिस थानों और न्यायालयों के सीढ़ियों पर बैठी दिखाई देती है. यह सारा कु छ केवल पुलिसवालों, वकीलों, न्यायालयीन कर्मचारियों और वहाँ रेंगते कुछ दलालों के फायदे का तो हो सकता है किंतु किसी भी रूप में सारे समाज को भीतर से जार जार रोने पर मजबूर कर देने वाला है.

मान लो, यदि सांप्रदायिक हिंसा विरोधी कानून का जरा सा भी दुरूपयोग देश के बहुसंख्यक समाज के विरूद्ध होता है, तो उसके राजनीतिक परिणाम क्या होंगे? क्या वह वर्ग चुनाव में उसका बदला नहीं लेगा? निश्चित रूप से कोई भी समझदार व्यक्ति यही उत्तर देगा कि एक जगह का बदला बेहद ज्यादा किंमत पर दूसरी जगह लिया जायेगा. ऐसा कोई भी कानून जो एक वर्ग के सम्मान की किंमत पर दूसरे वर्ग को अपमानित करता है, उसकी प्रतिक्रिया भी उतनी ही घातक और गंभीर होने की संभावना है. दूसरा विश्वयुद्ध हुआ ही इसलिये था कि पहले विश्वयुद्ध के पश्चात मित्र राष्ट्रों ने कई प्रतिबंध लगाकर जर्मनी को अपमानित करने की कोशीशें की थी. नतीजतन वहाँ उभरे राष्ट्रवाद ने दुनिया को विश्व इतिहास के सबसे गंभीर खतरे के मुहाने पर ला खड़ा किया था. मान लो, कि कल इस कानून के अन्यायी प्रावधानों से देश में अल्पसंख्यकों के खिलाफ कोई राष्ट्रवादी ज्वार उठता है, तो इस वर्ग की सुरक्षा कौन करेगा? फिर सरकार राजनीतिक रूप से अल्पसंख्यकों का खत्मा करने वाला कानून लाकर क्या हासील करना चाहती है?

यहीं जाकर सरकार की नीयत पर शक होता है. इस कानून का फायदा केवल सरकार के उन्हीं नेताओं को होगा जो खुद तो बहुसंख्यक समाज में पैदा हुये है किंतु राजनीति अल्पसंख्यक समाज के हितों की करने का नाटक करते है. निर्णायक रूप से इस कानून का सबसे ज्यादा नुकसान उन अल्पसंख्यक नेताओं को होगा जो समग्र देश के बारे में सोचते है और वास्तव में हमारी भारतीयता के बेहतरीन नगीने माने जाते है. भाजपा को तो इसका नुकसान होने की दूर दूर तक कोई संभावना ही नहीं है. उल्टे उसे देश की बहुसंख्यक जनता को एकजूट करके एक बड़ा वोट बैंक तैयार करने में आसानी हो जायेगी. किंतु यह कानून देश के अल्पसंख्यकों को सदा के लिये ऐसे नेताओं का गुलाम बना देगा जो उनकी ही लाशों की किंमत पर अपनी राजनीति की रोटीयाँ सेंकते रहेगें. इसलिये इस कानून का सबसे प्रबल प्रतिरोध बहुसंख्यकों की ओर से नहीं बल्कि अल्पसंख्यकों की ओर से किया जाना चाहिये. यह कानून उनको सदा के लिये एक खिलौना बना देने वाला कानून है.

कानून कैसा हो?

यदि सरकार वास्तव में सांप्रदायिक दंगे रोकने के बारे में ईमानदार सोच रखती है, तो उसे दंगाईयों को जाति और धर्म के चश्में से देखने से बचना चाहिये. दंगाई, फिर वह किसी भी जाति या मजहब को मानने वाला हो, अपनी समाजविरोधी और राष्ट्रविरोधी करतूतों के लिये देश की अदालतों के सामने उत्तरदायी होना चाहिये. सरकार का अपना कोई चश्मा नहीं होना चाहिये.

**पान २९ पाहा**

# नभाच्या कल्याणा द्रविडी विभूती

**राजाभाऊंनी विचार केला होता, की कविला असे किती लागते? कवी-कवयित्रीला जर 'प्यायला वारा, खायला गारा' असे असले तरी पुरेसे असते. हे त्यांना माहीत होते. इकडे तो लिपिक मात्र एका थ्रीजी स्पेक्ट्रमच्या अलॉटमेंट सेरेमनीला एका पंचतारांकीत हॉटेलात जाऊन आलेला होता. त्याने तिथे 'थ्री. जी.' म्हणजेच तीन ग्लास कोरीकरकरीत इंधनरूपी इथाईल अल्कोहोलची संथा घेतलेली होती. या कारणानेच त्याने २ या संख्येपुढे ३चा वर्ग म्हणून ९ शून्ये टाकून दिली आणि ती रक्कम दोनशे कोटी झाली.**

**लग्नासाठी जाणे घडले**
**जरी असूनी गर्दी**
**थंड जळाला तिथे प्राशले**
**म्हणून जाहली सर्दी**

आज थंडा महाराजांना थंड जळाने थंड केल्याचे भक्तगण पाहत आहेतच. महाराजांचे आम्हीही परमभक्त असल्याने महाराजांच्या पाक्षिक कीर्तनात खंड पडणे आम्हाला कासाविस करणारे ठरले असते. महाराजांना आज आम्हीच विनंती केली आहे, की 'महाराज, तुम्ही थंड बसा आणि तुमच्या सोबत आज जे तामिळ भाषिक, शुभ्र लुंगीधारी मित्र आहेत. त्यांनाच आज तामिळ संत साहित्यातील आधुनिक कवियित्री कनिमोळी हिची माहिती द्यायला सांगा.

आम्हाला तामिळ येते म्हणून थंडा महाराजांचे 'तामी' म्हणजेच 'तामिळ मित्र' श्री. दोन्नो गुंठो यांनी सांगितलेली माहिती या कीर्तनापुरती 'मायक्रोसॉफ्ट वर्ड'मध्ये वाचावी...

कनीमोझी ऊर्फ कन्यामाझी नावाची एक चांगली दाक्षिणात्य कवियित्री आहे. या कवियित्रीचे आजकाल वास्तव्य तिहार जेलमध्ये आहे. हा तिहार जेल म्हणजे आधुनिक भारताचे संभाव्य तीर्थक्षेत्र होणार आहे. कन्नीमोझी या तिथे पोहोचण्याचे कारण म्हणजे कविचा भाबडेपणा आहे हे विधान सार्थ करण्यासाठी या सार्थकतेसोबतच कोणत्याही क्षेत्रात महिलांना आरक्षण असायला हवे ही कल्पनासुद्धा रास्त आहे, याची प्रचिती त्यांच्यामुळे आली. नुकतेच त्यांचे पिताश्री त्यांच्या भेटीसाठी उत्तरभ्रमण करण्याआधी थोडावेळ भेटून गेले. मोतीबिंदूची बाधा असलेल्या या पित्याने आर्तपणे जे गाणे म्हटले ते ऐकून त्यांच्या पितृहृदयातील 'करुणा' साऱ्यांनाच कळाली. ते गात होते :

''कन्या मोरीऽऽ
वो नहीऽऽ स्पेक्ट्रम खायो!!''



शे.भ.प. शेती भक्त परायण)
-'थंडा' महाराज देगलूरकर

आपल्या पित्याला सावरावे म्हणून कन्नीने एक काव्यरूपी दोनोळी त्यांना ऐकवली. ती म्हणाली :

'' पक्षी करतात आकाशात विहार
मला मात्र आवडे जेल तिहार''

हा जेल तिला इतका आवडला आहे म्हणे की, तिथे वास्तव्याला असलेल्या एका पंजाबन महिलेसोबत ती जामीन मिळाल्यानंतर एक नवा धंदा सुरू करण्याची कल्पना करीत आहे. या तिहार जेलमध्ये याआधी एकही दाक्षिणात्य महिला वास्तव्यास नव्हती. कन्नीताईंनी हा अनुशेष भरावा म्हणून प्रथम आपले पवित्र पाऊल तेथे टाकले आहे. ही तर सुरुवात आहे... असे त्या मानतात. उत्कृष्ट दर्जाचे साहित्य कारागृहातच निर्माण होते. याला जगभरात मान्यता आहे. कन्नीताईंचा हाच एक सुप्त मुख्य हेतूही असावा. त्यांचे व्यक्तीविशेष सांगायचे झाले तर, त्या एका अल्पदृष्टी असलेल्या जराजर्जर नेत्याच्या कितीव्या तरी पत्नीच्या कोणत्यातरी कन्या आहेत. यांचे पतीदेवही कथा-कादंबरीकार आहेत म्हणे. कोणतीही नोकरी न करता जे कुटुंब केवळ लिखाण कर्मावर जगतो म्हणते त्याचे फार हाल होतात. खायचे वांदेही असतात. याच कारणाने कन्नीमोझीचे पतीदेव हे चरितार्थाला मदत म्हणून सिंगापूरला लेखनकर्म व शब्दांकनाचा उद्योग करत



बसले आहेत. आपल्या मानलेल्या या भगिनीचे हे हाल पाहून कन्नीचे मानलेले बंधूराज तथा स्पेक्ट्रम ग्रुपचे माजी प्रवर्तक आणि राजकीय उद्योगपती म्हणून प्रसिद्ध असलेले राजाबाबू व्यथित झाले होते. या राजाबाबूंचा खरा व्यवसाय हा आकाशाचे तुकडे विकण्याचा होता. या उदात्त व्यवसाय कल्पनेमागील जी भूमिका त्यांची होती. तिचा नेमका अंदाज कोणालाच आजही आलेला नाही. या कारणानेच त्यांनाही त्याच तिहार जेलमध्ये स्थानबद्ध करून ठेवण्यात आलेले आहे. काही काळापूर्वी असे घडले होते, की आपल्या या राजाभाऊकडून कन्यामाझी ताईंनी घरखर्चासाठी काही रुपये घेतले होते. पती सिंगापूरला चरितार्थासाठी असल्याने आपल्या भगिनीची अडचण दूर व्हावी म्हणून राजाभाऊंनी आपल्या रोखपाल तथा लिपिकाला सांगितले, की ताईच्या खात्यावर दोनशे रुपये जमा कर.

राजाभाऊंनी विचार केला होता, की कविला असे किती लागते? कवी-कवयित्रीला जर 'प्यायला वारा, खायला गारा' असे असले तरी पुरेसे असते. हे त्यांना माहीत होते. इकडे तो लिपिक मात्र एका थ्रीजी स्पेक्ट्रमच्या अलॉटमेंट सेरेमनीला एका पंचतारांकीत हॉटेलात जाऊन आलेला होता. त्याने तिथे 'थ्री. जी.' म्हणजेच तीन ग्लास कोरीकरकरीत इंधनरूपी इथाईल अल्कोहोलची संथा घेतलेली होती. या कारणानेच त्याने २ या संख्येपुंढे ३चा वर्ग म्हणून ९ शून्ये टाकून दिली आणि ती रक्कम दोनशे कोटी झाली.

उद्योगपती भावाच्या खात्यात कितीही रक्कम असणारच हे तर सत्य आहे. तिकडे ऑफलाईन दिली आणि इकडे ऑनलाईन आली, असे घडले.

ज्या कवियित्रीला फक्त २० किलो तांदूळ आणायचा होता तिला विनाकारण २०० कोटी रुपये घ्यावे लागले. ही अप्रत्यक्ष ओवाळणीच होती. बरे, न घ्यावे तर भाऊ नाराज होण्याची भीतीही होती. दुर्दैवाने हा सारा व्यवहार लाचलुचपतीचा ठरविण्याचे पापकर्म राजाभाऊच्या विरोधकांनी संगनमत करून सिद्ध केल्याचा आव आणला. खरे तर हे पाश्चिमात्य देशांचे काम आहे. त्यांना पृथ्वीची काळजी नाही. ही काळजी कशी नाही हे तथ्य शोधण्याआधी आमच्या कन्याताईचा चेहरा आवर्जून आठवा. इतके पावित्र्य त्यांच्या चेहऱ्यावर दाटून आलेले नेहेमीच दिसेल, की त्यांच्या विरोधकांनाच कारागृहात टाकावेसे वाटेल. पाश्चिमात्यांना असेच साधे आणि निर्मळ लक्ष्य लागतात. साधी माणसंच पृथ्वी वाचवण्याचे कार्य करून जातात. पाश्चिमात्यांना हे नको आहे. ही पश्चिमेकडील मंडळी ग्लोबल वॉर्मिंगला कारणीभूत ठरली आहेत हे आपण जाणतोच. आपल्या राजाभाऊंनी जो आकाशखंड विकण्याचा व्यवसाय सुरू केला आणि ज्यांना 'स्पेक्ट्रम'रूपी तुकडे त्यांनी विकले त्यांना राजाभाऊंनी ही अट टाकली होती, की आकाशात जिथे ओझोन पातळीला छिद्रे पडली आहेत आणि जिथून अतिनील किरणे पृथ्वीवर येऊन ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परिणाम सिद्ध करणार आहे. तिथेच त्यांनी आपले विशाल सॅटेलाईट लावावेत. या छिद्र बुजवाबुजवीमुळे पृथ्वीचे पुढे चांगले घडले असते. हे फक्त राजाभाऊंना कळाले होते. हे चांगले घडले नको होते म्हणून पाश्चिमात्यांनी साऱ्या उत्तरवासियांना हाताशी धरून आधी राजाभाऊंना तिहारात पाठवले आणि आता भगिनी कन्यामाझी यांना पाठवून त्यांना

**ओवाळिते भाऊराया**
**तुझा लागू दे डोळा**
**स्पेक्ट्रम जावो खड्ड्यात**
**म्हणून देशाला जाळा**

ही आरती तयार करायला लावताहेत. असेही स्पष्ट झाले आहे. हे स्पष्ट चित्र असले तरी या थ्रीजीमुळे महाराजांचे तामिळमित्र मा. दोन्नो गुंठो यांनी महाराजांना किसान सीमकार्ड भेट म्हणून दिले आहे. टूजी फॅसिलिटीचे अर्थात दोन गुंठ्याच्या किमतीच्या या कार्डावर महाराजांना भक्तांनी एसेमेस करायला हरकत नाही. हे कार्ड तात्पुरते म्हणून दोन्नोभाऊ यांनी दिले आहे ज्याचा नंबर शेवटी फक्त या कीर्तनापुरताच दिला आहे.

तिकडे तिहारधामी कन्नीमोझी म्हणत आहेत :

**स्वर्गासारखी सुखे तिहारी**
**जरी किती तो दंड**
**करीन कविता तिथे बसूनी**
**मनी पेटते बंड**
**स्पेक्ट्रम खाऊनी दाह वाढला**
**जीवा वाटू दे थंड**
**रोज कविता लिहिन म्हणते**
**चघळत पैसे अखंड**

टेम्परारी टूजी कार्ड संपर्क क्र.
९४२१८३९६६९
(व्हॅलिडीटी १५ डेज ओन्ली)

- **शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com

■■

पान १५ वरून पुढे

वातावरणातला तणाव निवळला. सुब्बारावसाहेब आणि बियाणे उत्पादक संघटनेलाही खरे तर एवढीच वाढ पाहिजे होती. त्यामुळे वरकरणी नाराजी दाखवित तेही 'चिअर्स' करू लागले. पुढच्या कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या हितासाठी आमचे सरकार कसे दक्ष आहे त्याचे मुद्दे महाराष्ट्राचे कृषिमंत्री आठवू लागले. तसेच दोनशे रुपयांची वाढ देणे कसे अनिवार्य आहे. बियाणे उत्पादनाचा खर्च कसा वाढलाय याचे सुब्बाराव साहेबांच्या प्रेझेंटेशन्सची सीडीज त्यांनी तत्परतेने सर्व कृषिमंत्र्यांना दिल्या.

त्या अभ्यासानुसार या सर्व मंत्र्यांना या दरवाढीसाठी त्यांच्या त्यांच्या मंत्रीमंडळाची परवानगी घ्यायची होती. ती अर्थातच मिळणारही होती, कारण ज्याचा त्याचा या निर्णयासाठीचा वाटा काय असेल, किती असेल त्याचेही प्लॅनिंग व्यवस्थितपणे झालेलेच होते.

एकूण अहमदाबादेतील ही बैठक सर्वांचेच 'चांगभलं' करणारी होती. बिचाऱ्या शेतकऱ्याच्या खिशातून मात्र यंदा पाकिटामागे दोनशे रुपये अधिक जाणार होते; पण ते कसे योग्य आहे इत्यादी त्यांच्या गळी उतरविण्याचीही एक कम्युनिकेशन योजनाही तयार होती. त्यासाठी निवडक प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे, सरकारच्या या निर्णयाचे समर्थन कशी करतील त्याचेही फिक्सींग महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांनी मोठ्या खुबीने अगोदरच करून ठेवलेले होते.

शॅम्पेन आणि मेजवानीचा आस्वाद घेऊन महाराष्ट्राचे कृषिमंत्री हेलीकॉप्टरमध्ये बसले. शॅम्पेनमुळे डोके हलके होऊन मंदपणे हवेत तरंगत होते आणि आजच्या मिटींगमुळे पाची राज्यात कृषिसंदर्भात आपणच कसे कुशल आहोत तेही त्यांनी सिद्ध केलेले होते. अशा दुहेरी आनंदात कृषिमंत्री मुंबईत परतत होते. एकूण आजचा दिवस त्यांच्यासाठी महत्त्वाचा आणि यशाचा होता यात वाद नाही.

**सुधीर सेवेकर**
'मांगल्य', पांडुरंग कॉलनी,
खोकडपूरा, औरंगाबाद-४३१००१
मो. ०९३२६१४७५०४

■■

पान २५ वरून पुढे

अल्पसंख्यकों को क्या चाहिये?

वास्तव में आजादी के बाद देश के अल्पसंख्यकों के साथ केवल और केवल ठगी हो रही है. जो समाज कभी हिंदुस्तान पर राज करता था, जिसने कला, साहित्य और संस्कृति को नये आयाम दिये थे, आज आर्थिक और सामाजिक रूप से टूट कर महज वोट बैंक में तब्दील हो चुका है. कल के बादशाहों के वंशज आज रिक्शे या ऑटो चला रहे है, सब्जियाँ बेच रहे है या चाय पान के ठेले चला रहे है. वहाँ भी कभी उन्हें पुलिस लूट लेती है तो कभी नगरपालिका वाले लूट लेते है. वे जब खतरे में होते हैं, उन्हें कोई नहीं पूछता. जब नेता लोग खतरे में हो तो उनकी पूछ परख बड़ जाती है. वे वास्तव में तराजु के उन सिंदूर लगे पत्थरों या बाट के जैसे उपयोग में लाये जाते है, जिनका उपयोग केवल सत्ता का संतुलन इधर उधर करने के लिये है, उससे अधिक कुछ भी नहीं, मलाई दूसरे काटते है. जबकि आज भी देश के अनेक शहरों में लगभग सारे लघु उद्योग या कुटीर उद्योग यही लोग चला रहे है. यदि हम वास्तव में इन्हें कुछ देना चाहते है तो बस हमने उनकी मेहनत का सम्मान करने वाली व्यवस्था उन्हें देना चाहिये. लायसेंस कोटा परमिट राज वाली और केवल कागजी घोड़े दौड़ाने वाली व्यवस्था ध्वस्त कर देनी चाहिये.

देश के अल्पसंख्यक समाज के हुनर का देश निर्माण में ज्यादा से ज्यादा उपयोग करने के लिये प्रत्येक राज्य और केंद्र सरकार के बजट में उनकी आबादी के अनुपात का हिस्सा उनके विकास, प्रशिक्षण और ईस्लामी शून्य ब्याज वाली कर्ज योजनाओं के लिये सुरक्षित रखा जाना चाहिये. उच्च शिक्षा के ईस्लामी विश्वविद्यालय सारे देश में खोले जाने चाहिये जिससे यह महान समाज अपना खोया हुआ गौरव फिर से हासील कर सकें. आजादी के पश्चात देश में फैले सांप्रदायिक वातावरण ने अल्पसंख्यकों के बीच के राष्ट्रवादी नेतृत्व को लगभग समाप्त कर दिया है और आज जो भी नेता इस समाज का प्रतिनिधित्व करते है, वे केवल अपना अपना वोट बैंक बचाते दिखते है. यह बात इतने विशाल अल्पसंख्यक वर्ग के लिये कदापि सम्मानीय नहीं है.

यह देश आज वैश्विक अर्थव्यवस्था में बड़ी ताकत बनने जा रहा है. १५ अगस्ट १९४७ को हमने धर्मनिरपेक्ष सार्गभौमिक गणतंत्र की ओर काफी सोच समझकर ही कदम बढ़ाये थे, जिसके प्रत्यक्ष फायदे हमें आज होते दिखाई दे रहे है. हमारा सप्तरंगी सर्वसमावेशक बहुभाषायी रूप हमारी ताकत है, कमजोरी नहीं. इस बात को अल्पसंख्यकों के साथ साथ बहुसंख्यकों ने भी समझना वक्त की पुकार है. कोई भी सरकार या पार्टी यदि किसी भी तरीके से हमारी गरिमा के साथ समझौता करते हुये यदि हमारी युगों पुरानी विरासत को नष्ट करना चाहती है, तो यह हमारा फर्ज बनता है कि हम हर मौजूद तरीके से उसका विरोध करें और उसे उसकी जगह बतायें.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# चंद्रपूरमध्ये शेतकरी संघटनेचे धरणे आंदोलन

## कापूस, साखर व तांदळावरील निर्यातबंदी उठविण्यासाठी संघटना आक्रमक



**अभय दिकोंडवार । चंद्रपूर**

कापूस तांदुळ आणि साखर या शेतमालावरील निर्यातबंदी तातडीने उठवावी, या प्रमुख मागणीसह इतर ९ मागण्यांसाठी शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी येथील जेटपुरा गेटजवळील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापुढे धरणे आंदोलन केले. यावेळी कापूस, साखर, तांदुळ यावरील निर्यातबंदी तातडीने उठवावी, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भू-अर्जन कायदा व कोलबेअरींग अॅक्टमध्ये बदल करून योग्य मोबदला मिळाला पाहिजे, एक सातबारा, एक नौकरी प्रकल्पग्रस्तांना मिळालीच पाहिजे, थकीत वीजबील माफ झालेच पाहिजे. इत्यादींसह अनेक घोषणा कार्यकर्त्यांनी यावेळी दिल्या.

या धरणे आंदोलनाचे नेतृत्व शेतकरी संघटनेचे नेते माजी आमदार अॅड. वामनराव चटप, शे.सं. जिल्हाप्रमुख प्रभाकर दिवे, स्वभाप जिल्हाध्यक्ष प्राचार्य अनिल ठाकूरवार, जि.प.सदस्य अशोक मुसळे, अॅड. नि.गो. मोरांडे, अॅड. शरद कारेकर, सौ. पौर्णिमा निरंजने, श्रीधर बलकी, दादा नवलाखे, सुधीर सातपुते, राजुरा नगराध्यक्ष रमेश नळे, प्रभाकर ढवस, शेषराव बोंडे, व्यंकटेश मल्लेलवार, तुकेश वानोडे, भाऊजी कन्नाके, अभय दिकोंडवार, दत्तुजी ढोके, सेवक पहानपटे, सुभाष रामगीरवार, बंडू डोंगे, दिवाकर माणुसमारे, मधुकर चिंचोलकर इत्यादी नेत्यांनी केले.

कापूस, साखर व तांदुळ या पिकावरील निर्यातबंदी केंद्र सरकारने तातडीने उठवावी, शेतकऱ्यांना भू-अर्जन कायदा १८९४ व कोल बेअरिंग अॅक्ट १९५७ च्या तरतुदीनुसार बाजारभावाने कारखाने, खाणी, धरणे, रस्ते प्रकल्प याकरीता जमिनी घेतल्यानंतर मोबदला मिळत नाही, म्हणून या दोन्ही कायद्यांत तातडीने बदल करून बाजारभावाने प्रत्यक्ष मिळणारी रक्कम देण्याची तरतूद करावी व शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने काढू नये, शेतकऱ्यांवरील सर्व कर्जे अनैतिक व बेकायदेशीर असून शासनाने रास्त भाव न दिल्याने हे कर्ज झाले आहे. म्हणून ते तातडीने माफ करावे आणि शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून त्याची बाजारात पत निर्माण करावी, स्थानिक या शब्दाची व्याख्या बदलवून उद्योगखात्याने कारखाना अथवा प्रकल्प परिसरातील युवक आणि बेरोजगारांना न्याय द्यावा. थकीत वीज बिल माफ करावे, २६ जानेवारी १९५० ला लागू झालेल्या देशाच्या मूळ राज्यघटनेत नसलेले आणि दि. २८/६/१९५१ ला जोडलेले शेतकरी विरोधी परिशिष्ट वगळण्यात यावे, सर्व जबरानजोत शेतकऱ्यांना तत्काळ जमिनीचे पट्टे देऊन त्यांना मालक करावे इत्यादी मागण्यांचे निवेदन शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मा. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना पाठविण्यासाठी चंद्रपूरचे जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन देण्यात आले.

यावेळी बोलताना माजी आमदार अॅड. वामनराव चटप म्हणाले, की केंद्रसरकारने निर्यातबंदीचा निर्णय घेऊन कापसाचे भाव पाडल्याने जगातील चढत्या भावाच फायदा येथील शेतकऱ्यांना झाला नाही. कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत असताना केंद्र सरकारचा निर्यात बंदीचा निर्णय निषेधार्ह आहे. गतवर्षी २९५ लाख गाठी रुईचे उत्पादन होऊन ८७ लाख गाठ्यांची निर्यात झाली होती तरीही देशांतर्गत गरज असलेली १६८ लाख गाठी वगळता ४० लाख गाठी शिल्लक आहे. यावर्षी ३२५ लाख गाठींचे उत्पादन झाले असताना केवळ ५५ लाख गाठ निर्यातीची परवानगी देण्यात आली. अजून देशात ३१० लाख गाठी कापूस शिल्लक असून यावर्षीची १६८ लाख गाठींची निर्यात झाल्याने आणखी ११९ लाख गाठींची निर्यात झाल्यास देशात सन २०१२-१३ साठी २३ लाख गाठी शिल्लक राहतात. म्हणून तातडीने निर्यात बंदी उठविण्याची मागणी माजी आमदार अॅड. वामनराव चटप यांनी केली. देशात जय श्रीराम, एचएमटी, सोनम व इतर बिगर बासमती तांदळावरील निर्यातबंदी उठवावी तसेच ३० लाख टन साखरेची निर्यात करणे शक्य असल्याने त्यालाही केंद्र सरकारने परवानगी द्यावी अशीही मागणी अॅड. चटप यांनी यावेळी बोलताना केली.

या धरणे आंदोलनासाठी चंद्रपूर, राजुरा, कोरपना, गोडपिंपरी, वरोरा, भद्रावती, पोंभुर्णा, बल्लारपूर इत्यादी तालुक्यांतील ग्रामीण भागातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोषणा देऊन या धरणे आंदोलनाचा समारोप करण्यात आला. ■

# सांगली येथे महावितरण कार्यालयावर मोर्चा



**शीतल राजोबा** (सांगली) : दि. ३१ मे रोजी सांगली येथील महावितरणच्या कार्यालयावर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला.

शेतकरी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रमुख संजय कोले यांच्या नेतृत्वाखाली विश्रामबाग येथील क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चास सुरूवात झाली. काँग्रेस शासनाने निवडणुकीपूर्वी 'पुन्हा सत्तेत आल्यास कृषीपंपांना मोफत वीजपूरवठा करू' असे वचन दिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषीपंपांची बिले थकविली. आता तेच सरकार वसुलीसाठी जबरदस्तीने वीजजोडणी तोडत असून शेतकऱ्यांची उभी पिके वाळत आहेत. वीजजोडण्या तोडू नये, तोडलेल्या पूर्ववत जोडून द्याव्यात. तसेच अपुरा वीजपुरवठा असल्याने वीज बिल थकबाकी आम्हास मान्य नाही. ही शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक आहे. आम्हास 'कृषिसंजीवनी योजना -२०११' मान्य नाही. संपूर्ण थकबाकी माफ करावी. आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

निवडणुकीपूर्वी दिलेले मोफत वीज देण्याचे वचन आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, पंजाब राज्यांतील सरकारांनी पाळलेले आहे. महाराष्ट्र सरकारनेही ते पाळावे, असे निवेदनात सांगितले. प्रत्यक्ष मोर्चा महावितरणच्या गेटवर गेल्यानंतर पोलिसांनी गेट बंद करून मोर्चा अडवला. यावेळी घोषणांनी संपूर्ण आवार दणाणून गेले होते. शेतकऱ्यांनी आम्हाला गेटच्या आत येऊ द्या असे सांगितल्यानंतरही गेट उघडले गेले नाही. यावेळी पोलिस आणि कार्यकर्त्यांत बाचाबाची झाली. म्हणून संजय कोले यांनी शेतकऱ्यांना गेटसमोरच ठिय्या मारण्यास सांगितले. त्याच ठिकाणी मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी शेतकऱ्यांना कडेगाव तालुकाप्रमुख नवनाथ पोळ, स्वतंत्र भारत पक्षाचे एम. के. माळी, माजी प्रदेशाध्यक्ष जयपालअण्णा फराटे, अशोक पाटील, गुंडा माळी यांनी मार्गदर्शन केले. त्याच वेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता जे. टी. पाटील व एस. डब्ल्यू क्षीरसागर मोर्चाच्या समोर आले. तसेच पोलिस निरीक्षक शेवाळे हेही उपस्थित होते. यांच्याशी चर्चा करताना मोठी वादावादी झाली.

संजय कोले यांनी वीज कनेक्शन तोडणार नाही, तोडलेली जोडून द्यावी अशी लेखी मागणी केली; परंतु अधिक्षक अभियंता रजेवर आहेत, आम्ही लिहून देऊ शकत नाही असे जे. टी. पाटील म्हणाले. यावर संजय कोले यांनी अतिशय आक्रमक भूमिका घेत महावितरणच्या अधिकाऱ्यांसमक्ष शेतकऱ्यांना सांगितले, की यापुढे वीज तोडण्यास जर कोणी आपल्या शेतात आला तर सरळ त्याचे हातपाय तोडून टाका. आता ही लढाई आपण आपल्या शिवारात लढायची आहे.

यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हा प्रमुख शीतल राजोबा, रावसो दळवी, धनपाल गळतगे, रामचंद्र कणसे, तानाजी चव्हाण, संजय पाटील, अनिल पाटील, अल्लाउद्दीन जमादार, दादा शेशाप्पा दुधगावे, चंद्रकांत वंजाळे, महेश कापसे, चंद्रकांत शिरोटे यांसह ३०० ते ३५० शेतकरी उपस्थित होते. मोठा पोलिस बंदोबस्त मोर्चासोबत ठेवण्यात आला होता.

■

# शेतकरी संघटनेच्या सौ. मंगला मेश्राम बिनविरोध सरपंचपदी



सौ. मंगला मेश्राम

**मधुकर चिंचोलकर । राजूरा**

चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यातील विरूर (स्टेशन) या आंध्र सीमेवरील मोठ्या गावात शेतकरी संघटनेचा झेंडा फडकला असून शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्या सौ. मंगलाताई मेश्राम यांची बिनविरोध निवड झाली. विरूर (स्टे.) येथे काँग्रेसच्या सरपंच सौ. वच्छला मडावी यांचेवर अविश्वास ठराव पारीत झाल्याने त्या पायउतार झाल्या. त्यांच्या ठिकाणी सौ. मंगलाताई मेश्राम बिनविरोध विजयी झाल्या. या ग्रामपंचायतीत १३ सदस्य आहेत.

सौ. मंगला मेश्राम एकमताने विजयी झाल्याबद्दल माजी आमदार ॲड. वामनराव चटप, जिल्हाप्रमुख प्रभाकर, स्वभाप जिल्हाध्यक्ष प्राचार्य अनिल ठाकूरवार, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रभाकर ढवस, राजुरा नगराध्यक्ष रमेश नळे, जि.प. सदस्य सौ. तेजस्विनी कावळे, पं.स. सदस्य आबाजी ढवस व शेषराव बोंडे, सौ. पौर्णिमा निरंजने, सतीश कोमरवेल्लीवार इत्यादींनी अभिनंदन केले आहे.

■

# शेतकऱ्यांना बाजारभावाबरोबर व्यक्तीस्वातंत्र्य मिळावे - रवि देवांग

**धुळे :** नवीन भूसंपादन कायद्यामध्ये शेतकऱ्यांना केवळ बाजारभावाचे गाजर उपयुक्त नसून त्यांना शेतजमिनी विक्रीचे स्वातंत्र्य मिळावे अशी भूमिका शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवि देवांग यांनी मांडली आहे.

ग्रेटर नोएडा येथील शेतकऱ्यांनी जमिनीचा बाजारभावाने मोबदला मिळावा म्हणून जे आंदोलन केले त्यात ४ शेतकऱ्यांचा बळी गेला. यामुळे भूसंपादन कायदा ऐरणीवर आला आहे. हे विधेयक येत्या पावसाळी अधिवेशनात संसदेत पारीत होऊ शकेल अशी परिस्थिती आहे. धुळ्यात शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने मालकीहक्कावार गदा आणणारे व त्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा गळा घोटणारे, शेतकऱ्यांच्या जमिनीला बाजारभाव नाकारणारे आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ घटनेत नसलेले परिशिष्ट ९ जाळण्याचा प्रयत्न केला. त्याचे राज्यात तीव्र पडसाद उमटले. शेतकरी संघटनेची सेझविषयीची भूमिका स्पष्ट असून ज्या शेतकऱ्यांना आपली जमीन कोणालाही विकायची नसेल तर ते स्वातंत्र्य त्याला आहे. जमीन सुपीक असो, की नापीक हा प्रश्न गौण आहे. ज्या शेतकऱ्यांना आपली जमीन विकायची असेल त्यांची शेतजमीन बाजारभावाने व मर्जीनुसारच घेता येईल. त्याला कोणीही प्रतिबंध करू शकणार नाही. यात बाजारभावापेक्षाही शेतकऱ्यांची मर्जी व व्यक्तीस्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. म्हणून नवीन भूसंपादन कायद्यात मर्जीला महत्त्व असावे, त्यासाठी घटनेतील परिशिष्ट -९ वगळण्याची, त्यावर संशोधन होण्याची हीच योग्य वेळ आहे. खा. राहुल गांधी शेतकरी संघटनेची भाषा बोलत आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. केंद्रीय ग्रामविकास मंत्री विलासराव देशमुख यांना शेतकरी संघटनेची भूमिका कळविण्यात आली आहे. या निमित्ताने शेतकऱ्यांना घटनात्मक नव्हे तर मालमत्तेचा मूलभूत अधिकार मिळावा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मूळ राज्य घटना पुर्नस्थापीत व्हावी यासाठी शेतकरी संघटना आंदोलन करणार आहे. ■



**“ शेतकऱ्यांना घटनात्मक नव्हे तर मालमत्तेचा मूलभूत अधिकार मिळावा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मूळ राज्य घटना पुर्नस्थापीत व्हावी यासाठी शेतकरी संघटना आंदोलन करणार आहे.**

---



**श्री. एम. के. माळी**
रा. नरवाड, ता. मिरज, जि. सांगली.

## शेतकरी संघटक स्थिर निधी

| | |
|---|---|
| श्री. एम. के. माळी | रु. ५००० |
| ॲड. आशीषराव गोदमगावकर | रु. १००० |
| श्री. गंगाधर बाबूराव तांबे | रु. १००० |
| यापूर्वी जमा निधी | रु. ५२,००० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ५९,००० |

सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.
स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.
**-कार्यकारी संपादक**

**ॲड. अशोक द. पटेल**
१, पारिजात कॉलनी,
देवपूर, धुळे ४२४००२
दि. ५ मे २०११

मा. जोशीसाहेब
सप्रेम नमस्कार

'शेतकरी संघटक' वर्धापनदिन अंक वाचला, त्यातील आपले खुले पत्र वाचून आपणास शुभेच्छा देण्यासाठी हे पत्र आहे. आधीच्या अंकातील लेखातून शेतकरी संघटकसह 'संघटने'च्या खडतर प्रवासातील कठोर व वेगळे सत्य मनाला चटका लावणारे होते. १९८० पासून आपण सुरू केलेल्या ग्रामीण भारतासह शेतकऱ्याच्या आर्थिक उत्थानाच्या लढ्यातून, ३० वर्षांच्या तपश्चर्येतून भारत व इंडियाच्या व्यवस्थेविषयीचे वैचारिक आंदोलन देशभर 'भारताचा खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचा दुसरा लढा' म्हणून फोफावले. त्यातून फेकलेले बियाणे देशभर रुजले. आपल्याबरोबर आलेल्या मावळ्यांसह आपण सतत ३० वर्षे चालवलेल्या या स्वातंत्र्यलढ्यातून सामान्य माणसापर्यंत आर्थिक स्वातंत्र्यासह स्वतंत्रतेचा विचार बऱ्यापैकी रुजला. राजकारण्यांसह तथाकथित विचारवंतांत व मध्यमवर्गातही, सोयीस्कर हितसंबंध जपत का होई ना, जागतिकीकरण व खुलीकरण यांच्यासह स्वतंत्रताही रुजली. कालानुरूप व्यवस्थेत बदलही होताना दिसून येत आहेत. हा आपला, संघटनेच्या विचाराचा तसेच स्वतंत्रतावाद्यांचा विजय आहे. आपल्या त्यागातून व संपूर्ण योगदानातून हे साध्य झाले. भारतातील १२० कोटी अनन्यसाधारण व्यक्तींच्या समूहाला, आपणासह शेतकरी संघटनेला अभिप्रेत असलेली 'स्वतंत्रता' परिपूर्णरित्या कितपत व केंव्हा उमजेल हा अभ्यासाचा विषय आहे. व्यक्तिस्वातंत्र्य निखळ अध्यात्माच्या उमजेतून प्राप्त होते असे वाटते. आपण अध्यात्मवादाची मांडणी करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या या अथक प्रवासातून एक वर्षाचा विराम घेतला आहे. आपण ३० वर्षे सतत, न थांबता अथक केलेला महाप्रवास, आपले ऋषितुल्य जीवन, त्याग व घेतलेले परिश्रम यांतून आपला संकल्प फलदायी होईलच. आपणास अभिप्रेत असलेले 'स्वातंत्र्य' सामान्यांपर्यंत पोहोचेल असा विश्वास वाटतो. आपल्या या संकल्पास शुभेच्छा देतो. त्यासाठी आपणास शरीर व मन यांचे उत्तम आरोग्य चिंतितो.

मंगल कामनांसह, आपला स्नेहांकित,
(अशोक पटेल)

**शरद जोशी**
बोपोडी, पुणे ४११०२०
२० मे २०११

प्रिय मित्र,
ॲड्. अशोक पटेल,
स. न. वि. वि.

आपले ५ मे २०११चे पत्र पोहोचले.

माझा आजवरचा प्रवास आपल्यासारख्या सहृदय माणसांच्या सहकार्याने व उत्तेजनानेच चालला आहे. माझी अध्यात्माची व्याख्या मी शक्य तितक्या स्पष्टपणे मांडली आहे. फुकुयामाने लोकशाही स्वतंत्रतावादानंतर इतिहासाचा अंत झाला आहे अशी मांडणी केली. अलीकडच्या निवडणुकांचे निकाल पहाता यातील कटु सत्यता जाणवते. हे जर टाळायचे असेल तर 'सर्व माणसे समान आहेत' या गृहीतकाला कोठेतरी आव्हान देणे आवश्यक आहे आणि त्याबरोबरच, स्वतंत्र भारत पक्षाच्या मूलभूत तत्त्वांतील 'सर्व माणसे समान आहेत, पण त्याहीपेक्षा एकमेवाद्वितीय आहेत' या तत्त्वाची स्थापना होणे आवश्यक आहे.

त्या दृष्टीने आधुनिक जैवशास्त्र काही उलथापालथी घडवून आणेल अश्या मोठ्या आशेत मी होतो. परंतु, डीन हॅमरची 'लिव्हिंग वुईथ अवर जीन्स्' व 'द गॉड जीन' आणि रिचर्ड डॉकिन्स्‌ची 'द सेल्फिश जीन' व 'द गॉड डिल्युजन' ही पुस्तके वाचल्यानंतर जैवशास्त्रही अंधारातच चाचपडत आहे असे लक्षात येऊन चुकले आहे. त्यामुळे, 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' अशी अवस्था प्राप्त झाली आहे. अशाच प्रकारच्या अंधारात तीस वर्षांपूर्वी मी शेतकरी संघटनेच्या कामाला सुरुवात केली होती एवढी आठवणच फक्त माझ्या या नव्या धाडसाला थोडीफार ताकद देते.

अध्यात्म विषयातील माझे कुतुहल तसे मर्यादित आहे. अनेकांनी मी आता काही मूलभूत अध्यात्मक्रांती घडवून आणणार आहे अश्या अपेक्षा बाळगायला सुरुवात केली आहे. या पत्रोत्तराच्या निमित्ताने माझी भूमिका स्पष्ट होण्यास मदत व्हावी. तुमच्यासारख्या सुहृदांचे सहकार्य व प्रेम यांची यापुढील वाटचालीतही अपेक्षा आहे.

पत्राबद्दल धन्यवाद.
आपला,
(शरद जोशी)

**ॲड. द. गं. गोदमगावकर**, नांदेड
दि. १३ मे २०११

मा. शरद जोशी साहेब
स. न. वि. वि.

मी शेतकरी संघटकचा नियमित वाचक आहे. ६ मे २०११चा अंक वाचला.

'महाराष्ट्राच्या दुर्दशेची पन्नाशी' लेख अप्रतीम, वस्तुस्थिती दर्शविणारा आहे. श्री. यशवंतरावबद्दलचे मत यथार्थ आहे. त्यांनी महाराष्ट्राची समाजबांधीलकी विस्कळित केली. जातीची पेरणी करून एकमेकांविरुद्ध उभे केले. ब्राह्मणद्वेषाची वाढ केली. गुणवत्तेची हानी केली. महाराष्ट्र कितीतरी मागे गेला आहे. त्यांचे शिष्य श्री. शरदराव यांनी कळस गाठला आहे. पैसा, संपत्ती, सत्ता यांची दहशत निर्माण करून लोकांना लाचार केले. अश्या अधोगतीत बेळगाव काय, कुणीही येणे कसे शक्य?

आपणास दीर्घायु चिंततो व हे कार्य दीर्घ काळ चालू ठेवावे ही अपेक्षा व्यक्त करतो.

आपला हितचिंतक,
(द. गं. गोदमगावकर)